Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

MONDAY, 14TH FEBRUARY 1898.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

खालीं दिलेला मसुदा आणि त्यासोबतचें हेतु व कारणें यांचें निरूपण हीं, मुंबईचे गव्हर्नर यांच्या कायदे व कानू करणाऱ्या कौन्सिलाच्या सभांच्या वेळीं काम चालविण्याबाबतच्या कानूंपैकीं २२ व्या कानूअन्वयें प्रसिद्ध केलीं आहेत:—

### सन १८९८ चा मसुदा नंबर १.

### सन १८९८ चा मुंबई शहर सुधारण्याविषयीं आक्टाचा मसुदा.

### अनुक्रमाणिका.


| | कलम. |
|---|---|
| **१.—प्रारंभींचे ठराव.** | |
| सरनामा, व्याप्ति व सुरुवात ... ... | १ (१) |
| हिंदुस्थानच्या रेलवेंबाबत आक्टाचे ठराव कायम ठेवणें ... ... | " (२) |
| संज्ञांच्या व्याख्या ... ... | २ |
| **२.—ट्रस्टींच्या बोर्डाबाबत.** | |
| **बोर्डाची रचना.** | |
| हा आक्ट अमलांत आणण्याचें काम बोर्डाकडे सोंपण्याबाबत ... ... | ३ |
| बोर्डाची रचना ... ... | ४ |

| | कलम. |
|---|---|
| **२.—ट्रस्टींच्या बोर्डाबाबत—(पुढें चालू).** | |
| **बोर्डाची रचना—(पुढें चालू).** | |
| निवडून नेमावयाचे ट्रस्टी, कार्पोरेशननें, चेंबर ऑफ् कामर्सनें व मुंबईच्या पोर्टाच्या ट्रस्टींनीं निवडून नेमणें ... ... | ५ |
| ट्रस्टी ह्मणून निवडून नेमला जाण्याची लायकी. | ६ |
| निवडीचा रिपोर्ट करण्याबाबत ... | ७ |
| निवडून नेमण्यास कसूर झाल्यास त्या प्रसंगीं काम चालविण्याची रीति ... ... | ८ |
| नेमावयाचे ट्रस्टी व चेअरमन यांची नेमणूक. | ९ |

| | कलम. |
|---|---|
| **२.—ट्रस्टींच्या बोर्डाबावत—(पुढें चालू).** | |
| **बोर्डाची रचना—(पुढें चालू).** | |
| पहिल्या ट्रस्टींच्या हुद्याची मुदत केव्हां सुरू होते ... ... ... | १० |
| नेमलेल्या व निवडून नेमलेल्या ट्रस्टींनीं पाळीपाळीनें आपला हुद्दा सोडणें ... | ११ |
| पहिल्या ट्रस्टीचीं निवड व नेमणूक ... | १२ |
| चेअरमनानें सरकारची मर्जी असेल तोंपर्यंत हुद्दा धारण करणें ... ... | १३ |
| ट्रस्टी, पुनः निवडून नेमले जाण्यास किंवा पुनः नेमले जाण्यास लायक असणें ... | १४ |
| नैमित्तिक खाली झालेल्या जागा ... | १५ (१) |
| तीन महिन्यांहून ज्यास्त मुदतीपर्यंत आक्टिंग ट्रस्टी ... ... ... | ,, (२) |
| जरूर असेल तेव्हां आक्टिंग नेमणूक तीन महिन्यांहून कमी मुदतीसाठीं करण्याबाबद विशेष ठराव ... ... ... | ,, (३) |
| **ट्रस्टींची नालायकी.** | |
| नालायकीचीं कारणें ... ... | १६ (१) |
| विशेष ठराव ... ... ... | ,, (२) |
| ट्रस्टींनीं ज्या कारणांसाठीं हुद्दा सोडावयाचा तीं कारणें ... ... ... | १७ (१) |
| विशेष ठराव ... ... ... | ,, (२) |
| ट्रस्टींचा ज्यांत हितसंबंध असेल त्या बाबतींत त्यांना मत देण्याचा अगर वाद करण्याचा अधिकार नाहीं ... ... | ,, (३) |
| **ट्रस्टींचा पगार.** | |
| चेअरमनाचा पगार सरकारानें ठरविणें .. | १८ |
| चेअरमन खेरीजकरून इतर ट्रस्टींना ज्या फी मिळण्याचा हक्क आहे त्या फी... ... | १९ |
| **बोर्डानें चालवावयाचीं कामें.** | |
| बोर्डानें चालवावयाच्या कामांसंबंधीं ठराव ... | २० |
| जागा खाली झाल्याच्या कारणानें, चालववायाच्या कामांस व्यत्यय येऊं नये ... | ,, (१) |
| बोर्डानें एकत्र जमून आपणास योग्य वाटेल त्याप्रमाणें काम करण्याची तजवीज करावी. | ,, (२) |
| साधारण सभा दर महिन्यास एकदा भरलीच पाहिजे, किंवा ... .. | ,, ,, (अ) |
| जरूर असेल तेव्हां तेव्हां विशेष सभा ... | ,, ,, (ब) |

| | कलम. |
|---|---|
| **२.—ट्रस्टींच्या बोर्डाबावत—(पुढें चालू).** | |
| **बोर्डानें चालवावयाचीं कामें—(पुढें चालू).** | |
| काम चालविण्यास आठ ट्रस्टी असले पाहिजेत ... ... | २० (२(क) |
| चेअरमनानें प्रत्येक सभेंत अध्यक्षस्थानीं बसावें ... ... ... | ,, ,, (ड) |
| सर्व बाबतींचा निकाल बहुमतानें केला पाहिजे ... ... ... | ,, ,, (इ) |
| मतें मागण्याचा अधिकार आहे .. | ,, ,, (फ) |
| टिपणें ठेविलीं पाहिजेत ... ... | ,, ,, (ग) |
| बोर्ड आपला अधिकार कमिट्यांकडे देण्यास मुखत्यार आहे ... ... | ,, (३) |
| प्रत्येक कमिटींत चेअरमन हा अध्यक्ष असणें. | ,, (४) |
| कमिट्यांनीं केव्हां सभा भरावी ... ... | ,, (५) |
| कमिटींतील बाबतींचा निकाल बहुमताप्रमाणें केला पाहिजेः काम चालविण्यासाठीं दोनतृतीयांश सभासद हजर असले पाहिजेत... | ,, (६) |
| बोर्ड वगैरेचीं कृत्यें पद्धतीविरुद्ध झाल्यामुळें अव्यवहारोपयोगी होत नाहींत ... | ,, (७) |
| कंट्राक्टें करण्याची रीति ... ... | २१ |
| कंट्राक्ट मोडल्याबद्दल तोडजोड करण्याचा अधिकार ... ... ... | २२ |
| **चेअरमन.** | |
| चेअरमनाचीं कामें ... .. | २३ |
| कामावरून गैरहजर राहण्यासाठीं रजा व आक्टिंग चेअरमनाची नेमणूक; रजा व आक्टिंग अलावन्स देणें ... .. | २४ |
| **३.—कामें व अधिकार.** | |
| **सुधारणेसंबंधीं योजना.** | |
| एकाद्या मोहोल्याच्या किंवा क्षेत्राच्या रोगकारक स्थितीविषयीं अधिकारपरत्वें लिहून आल्याच्या योगानें खात्री झाली असतां बोर्डानें त्याच्या सुधारणेसाठीं योजना करणें | २५ |
| अधिकारपरत्वें लिहून पाठवावयाचा मजकूर कोणी लिहून पाठवावा ... .. | २६ |
| सुधारणेसंबंधी योजनेंत कोणकोणत्या गोष्टींचा समावेश करावा व कोणकोणत्या गोष्टी निर्दिष्ट केल्या पाहिजेत त्याचा तपशील .. | २७ |

| | कलम. |
|---|---|
| **३.—कामें व अधिकार—(पुढें चालू).** | |
| **सुधारणेसंबंधी योजना—(पुढें चालू).** | |
| योजना तयार करतांना कोणत्या गोष्टींकडे जास्त लक्ष दिलें पाहिजे ... ... | २८ |
| योजना पुरी झाल्यावर काम चालविण्याची रीति ... ... ... | २९ |
| नोटिसा प्रसिद्ध करणें ... ... | ,, (अ) |
| योजना अमलांत आणतेवेळीं घ्यावयाच्या मिळकतीच्या मालकांवर नोटिसा बजाविणें. | ,, (ब) |
| बोर्डानें, नोटिसा प्रसिद्ध केल्यानंतर व बजाविल्यानंतर, योजना पुनः तपासावी व ती सरकारास मंजुरीसाठीं पाठवावी .. | ३० (१) |
| सरकारास तपशीलवार माहिती देणें ... | ,, (२) |
| मंजुरी मिळाल्यावर, घ्यावयाच्या जमिनीची तपशीलवार माहिती देऊन इकरार प्रसिद्ध करणें आणि तो इकरार प्रसिद्ध झाल्यावर बोर्डानें योजना अमलांत आणण्याच्या कामास लागणें ... ... | ३१ (१) |
| बोर्डास, योजनेच्या कोणत्याहि भागांत फेरफार किंवा कंपेश करण्याचा अधिकार आहे ... | ,, (२) |
| **स्ट्रीटसंबंधी योजना.** | |
| बोर्डास, स्ट्रीट बनविण्याबदलची योजना करण्याचा अधिकार आहे ... ... | ३२ |
| स्ट्रीट बनविण्याबदलच्या योजनबरोबर कोणकोणती तपशीलवार माहिती असली पाहिजे. | ३३ |
| स्ट्रीट बनविण्याबदलची योजना पुरी झाल्यावर काम चालविण्याची रीति ... ... | ३४ |
| **जमीन नवीन साध्य करण्यासंबंधी योजना.** | |
| जमनि नवीन साध्य करण्यासंबंधी योजना तयार करण्याचा बोर्डास अधिकार आहे ... | ३५ |
| जमनि नवीन साध्य करण्यासंबंधी योजनेबरोबर कोणकोणती तपशीलवार माहिती असली पाहिजे ... ... | ३६ |
| जमीन नवीन साध्य करण्यासंबंधी योजना पुरी झाल्यावर काम चालविण्याची रीति ... | ३७ |

| | कलम. |
|---|---|
| **३.—कामें व अधिकार—(पुढें चालू).** | |
| **पोलीसाच्या राहण्याच्या वगैरे जागेसंबंधी योजना.** | |
| पोलीसाच्या राहण्याच्या वगैरे जागेसंबंधी योजना करण्याचा बोर्डास अधिकार आहे .. | ३८ |
| पोलीसाच्या राहण्याच्या वगैरे जागेसंबंधी योजनेबरोबर कोणकोणती तपशीलवार माहिती असली पाहिजे ... ... | ,,(१),(२) |
| पोलीसाच्या राहण्याच्या वगैरे जागेसंबंधी योजना पुरी झाल्यावर काम चालविण्याची रीति ... | ३९ |
| इमारती पुऱ्या झाल्यावर त्या, सरकारास कित्येक शर्तीवर पट्ट्यानें देणें ... | ४० |
| **साधारण.** | |
| नवीन स्ट्रटांची कमींत कमी रुंदी ... | ४१ (१) |
| स्ट्रीटच्या एका किंवा दोन्ही बाजूंस बगीचा किंवा खुल्या जागा ठेवल्या असतील त्या प्रसंगीं विशेष ठराव ... ... | |
| स्ट्रीट पुरे झाल्यावर ते कार्पोरेशनला प्राप्त होणें व कार्पोरेशननें व्यवस्थित ठेवणें ... | ,, (२) |
| हवा खेळण्यासाठीं राखलेल्या खुल्या जागा कार्पोरेशनास प्राप्त होणें व कार्पोरेशननें व्यवथित ठेवणें ... ... | ,, (३) |
| या कलमाअन्वयेंच्या वादांचा निकाल सरकारानें करणें ... ... | ,, (४) |
| **जमीन घेणें.** | |
| बोर्डास कबुलायत करून जमीन घेण्याचा अधिकार आहे ... ... | ४२ |
| जमीन घेण्याविषयींचा आक्ट कबुलायत केल्याशिवाय इतर रीतीनें जमीन घेण्याच्या बाबतीस कोठपर्यंत लागू असला पाहिजे ... | ४३ (१), (२), (३), (४) |
| बोर्डास जमीन घेण्याविषयींच्या आक्टाअन्वयें स्थानिक अधिकारी मानलें पाहिजे ... | ४३ (५) |
| कोर्टाचें काम करण्यासाठीं अपील ऐकून घेणाऱ्या न्यायसभेची रचना ... | ,, (६) |
| नुकसानीच्या मोबदल्याच्या संबंधानें विशेष ठराव ... ... ... | ,, (७) |
| कलक्टरानें निवाडा दिल्यानंतर जमीन कब्ज्यांत घेणें व ती बोर्डास तबदील करून देणें ... ... ... | ४४ |

| | कलम. |
|---|---|
| **४.—कर्ज काढण्याचे अधिकार.** | |
| सरकाराकडून किंवा इतर मनुष्यांकडून कर्ज काढण्याचा अधिकार ... ... | ४५ |
| इतर मनुष्यांकडून पैका कोणत्या रीतीनें कर्जी काढावा तें सरकारानें फर्माविणें ... | ४६ |
| डिबेंचरें काढून कर्जी काढलेल्या पैक्यावरील व्याजाचा बोजा, सेक्रेटरी ऑफ स्टेट किंवा कार्पोरेशन यांना येणें असलेल्या व्याजाच्या बोजापूर्वीं होणें... ... ... | ४७ |
| कर्जी काढलेला पैका फेडण्यासाठीं त्याबदलच्या फंडाची तजवीज करणें ... ... | ४८ |
| कर्ज फेडण्याबद्दलचे फंड सरकारी सिक्युरिटी घेण्याच्या कामीं लावण्यासाठीं ठरविलेल्या तारखा ... ... ... | ४९ |
| कर्जें कोणत्या मुदतींत फेडावीं ... | ५० |
| सिक्यूरिटींचा नमुना ... ... | ५१ |
| सरकारानें मंजूर केलेल्या कोणत्याहि कर्जाच्या रकमेपर्यंत व्यांकांकडून पैका अगाऊ घेण्याचा बोर्डास अधिकार असणें ... | ५२ |
| **५.—मिळकत व जवाबदाऱ्या.** | |
| **बोर्डास मिळकत तबदील करून देणं.** | |
| बोर्डास प्राप्त झालेल्या मिळकतीचा तपशील. | ५३ |
| सरकारी रिकाम्या जमिनी खुल्या जागांप्रमाणें राखून ठेविणें ... ... | ,, (१) |
| इतर सरकारी रिकाम्या जमिनी व कार्पोरेशनची जमीन ... .. | ,, (२) |
| एकंदर किती मुदतीपर्यंत अशा जमिनी पट्ट्यानें देण्याचा बोर्डास अधिकार आहे त्यासंबंधानें विशेष ठराव ... ... | ,, ,, (१ |
| सार्वजनिक किंवा म्युनिसिपल खात्यासंबंधी कारणांसाठीं लागणाऱ्या जमिनी परत घेण्याबद्दलच्या अनुक्रमें सरकारच्या व कार्पोरेशनच्या अधिकारासंबंधानें विशेष ठराव ... | ,, ,, (२) |
| जमीन नवीन साध्य करण्याचे बोर्डाचे मार्ग... | ,, (३) |
| असे हक्क चालविण्याच्या कामीं उशीर झाला असतां त्यासंबंधी विशेष ठराव ... | ,, ,, (१) |
| कोणत्याहि नवीन साध्य केलेल्या जमिनीची सार्वजनिक कारणासाठीं गरज लागल्यास ती कबज्यांत घेण्याबदलच्या सरकारच्या अधिकाराबाबत विशेष ठराव ... | ,, ,, (२) |

| | कलम. |
|---|---|
| **५.—मिळकत व जवाबदाऱ्या—(पुढें चालू).** | |
| **बोर्डास मिळकत तबदील करून देणें—(पुढें चालू).** | |
| डिफेन्सिस किंवा लष्कराची आरोग्यरक्षणसंबंधी स्थिती यांच्या सुरक्षितपणास अपायकारक रीतीनें बाधक होण्याचा संभव असलेलें कोणतेंहि कृत्य करण्यास आपली पूर्वीं मंजूरी घेण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार सरकारास देण्याबाबत विशेष ठराव. | ५३ (३) |
| हिंदुस्थान सरकाराकडून ठरविण्यांत येईल त्या हद्दींच्या आंत बाटरींच्या शेजारीं कोणतीहि इमारत न बांधण्याबाबत विशेष ठराव ... ... | ,, ,, (४) |
| सदरील शेवटल्या दोन विशेष ठरावांअन्वयें काढलेल्या कोणत्याहि हुकुमांच्या संबंधानें बोर्डाचा कोणताहि दावा न चालण्याबाबत विशेष ठराव... .... ... | ,, ,, (५) |
| बोर्डानें दिलेल्या पट्ट्यांची मुदत संपल्यावर मिळकत अनुक्रमें सरकारास व कार्पोरेशनास पुनः प्राप्त होणें ... ... | ५४ |
| **मिळकतीसंबंधी साधारण अधिकार.** | |
| बोर्डास मिळकत घेण्याचा व धारण करण्याचा अधिकार. ... ... ... | ५५ |
| बोर्डास प्राप्त झालेल्या जमिनींच्या किंवा इमारतींच्या विक्रीच्या उत्पन्नाचा व्यय ... | ५६ |
| बोर्डास प्राप्त झालेल्या कित्येक जमिनी या आक्टाअन्वयेंच्या कोणत्याहि योजनेच्या कारणांस लावण्याचा अधिकार ... | ५७ |
| सदर्हूप्रमाणें कामीं लावलेल्या जमिनींच्या किमतीची व्यवस्था ... ... | ५८ |
| **जवाबदाऱ्या.** | |
| सेक्रेटरी आफ् स्टेट व कार्पोरेशन यांस बोर्डानें देणें असलेल्या भांडवलासंबंधी कर्जाचा तपशील ... ... ... | ५९ (१) |
| खुल्या जागा ह्मणून राखून ठेविलेल्या सरकारी जमिनींबद्दलच्या भांडवलासंबंधी कर्जादर, कलम ५९ (२) यांत ठरविलें आहे त्या प्रसंगीं खेरीज करून, कोणतेंही व्याज न घेणें. ... ... ... | ,, (२) (अ) |

| | कलम. |
|---|---|
| ५.—शिळकत व जबाबदाऱ्या—(पुढें चालू). | |
| जबाबदाऱ्या—(पुढें चालू). | |
| दुसऱ्या सरकारी जमिनी व कार्पोरेशनच्या जमिनी यांबद्दलच्या कर्जावरील व्याजाबद्दलची जबाबदारी ... ... | ५९(१)(ब) |
| व्याजाबद्दलची जबाबदारी सुरू होण्याची तारीख सरकारास लांबणीवर घालतां येण्याबाबत विशेष ठराव. ... .. | „ „ (१) |
| पट्ट्यांची मुदत संपल्यावर, किंवा इतर प्रकारें, व्याजाची रकम कमी करण्याबाबत विशेष ठराव ... ... ... | „ „ (२) |
| सेक्रेटरी आफ् स्टेट यांस येणें असलेल्या भांडवलासंबंधी कर्जांत, सरकारास आलेले कित्येक खर्च व या आक्टाअन्वयें झालेले प्रारंभीचे खर्च यांचा समावेश होणें ... | ६० |
| बोर्डानें नवीन साध्य केलेल्या क्षेत्रांच्या भाड्यांचा व त्यांपासून होणाऱ्या फायद्यांचा पहिल्या तीस वर्षांपर्यंत स्वतंत्रपणें उपभोग घेणें आणि त्यानंतर बाजारांत येणाऱ्या किंमतींतून जमीन नवीन साध्य करण्याचा खर्च वजा करून बाकी राहिलेल्या किंमतीवर व्याज देणें ... | ६१ |
| सदरील शेवटल्या कलमाच्या कारणांसाठीं "बाजारांत येणारी किंमत" व "नवीन साध्य करण्याबद्दलचा खर्च" या संज्ञांच्या व्याख्या ... ... ... | ६२ |
| **६.—महसूल व खर्च.** | |
| **म्युनिसिपल फंडांतून मदतीदाखल द्यावयाची रकम.** | |
| म्युनिसिपल फंडांतून दरसाल दोन हप्त्यांनीं मदतीदाखल पैका घेण्याचा बोर्डास अधिकार | ६३ (१) |
| पहिल्या हप्त्याची रकम, मुंबई शहरांतील इमारतींच्या व जमिनींच्या एकंदर आकारणीच्या किंमतीवर शेंकडा दोन टक्क्यांहून जास्त नाहीं इतकी उक्ती रकम असेल .. | „ (२) |
| दुसरा हप्ता हिशोबाचे विभाग करून ठरवावयाचा ... ... ... | |
| विभाग करतांना जमेकडच्या रकमा हिशेबीं धरावयाच्या त्या ... ... | „ „ (अ) |
| खर्चाकडील रकमा अशा हिशेबीं धरावयाच्या त्या ... ... ... | „ „ (ब) |



| | कलम. |
|---|---|
| ६.—महसूल व खर्च—(पुढें चालू). | |
| **म्युनिसिपल फंडांतून मदतीदाखल द्यावयाची रकम—(पुढें चालू).** | |
| मदतीदाखल रकम न दिल्यास त्याबद्दल विशेष ठराव ... .. | |
| वादाचा निकाल करण्याविषयीं विशेष ठराव. | |
| **सरकारानें द्यावयाच्या रकमा.** | |
| सन १८९७ च्या आगस्ट महिन्यानंतर विवक्षित जमिनीपासून झालेला नफा सरकारानें बोर्डास द्यावयाचा ... ... | ६४ |
| **हिशोबाचे विभाग.** | |
| व्यवस्थेचा खर्च कांहींकालपर्यंत भांडवलखातीं लिहावा, आणि तदनंतर भांडवल व महसूल यांच्या दरम्यान वांटून द्यावा ... | ६५ (१) |
| भांडवलाच्या हिशोबांत, दरेक योजनेबद्दलचा खर्च आणि सरकारी व कार्पोरेशनच्या जमिनी सुधारण्याबद्दलचा व जमीन नवसाध्य करण्याबद्दलचा खर्च निरनिराळा दाखविला पाहिजे ... ... ... | „ (२) |
| बोर्डास पावलेला सर्व पैका साधारण हिशोबाच्या खातीं जमा करावा ... ... | ६६ |
| साधारण हिशोबाच्या खातीं खर्चीं घालावयाच्या खर्चांचा तपशील ... ... ... | ६७ (१) |
| साधारण हिशोबाच्या खातीं जमा असलेल्या रकमा, भांडवलासंबंधी चालू खर्च भागविण्यासाठीं देण्याचा अधिकार... ... | „ (२) |
| साधारण हिशोबांत, सरकारी जमिनींसंबंधाच्या, कार्पोरेशनच्या जमिनींसंबंधाच्या व नवसाध्य केलेल्या जमिनींसंबंधाच्या रकमा निरनिराळ्या दाखवाव्या ... ... | ६८ |
| **शिलकेची व्यवस्था.** | |
| जमेकडील शिलकेचा उपयोग भांडवलासंबंधाचा चालू खर्च भागवण्याच्या कामीं किंवा कर्जीं काढलेला पैका फेडण्याच्या कामीं करावा. | ६९ (१) |
| खर्चाकडील शिलक भांडवल खातीं लिहावी. | „ (२) |
| दहाव्या वर्षानंतर नफा कसा वांटावा ह्यासंबंधानें विशेष ठराव ... ... ... | „ (३) |

| | कलम. |
|---|---|
| **६.—महसूल व खर्च—(पुढें चालू).** | |
| **जबाबदाऱ्यांप्रमाणें वर्तन होण्याविषयीं हमी.** | |
| व्याज न दिल्यास किंवा कर्ज फेडण्यासंबंधी फंडाच्या रकमा व्याजीं न लाविल्यास काम चालविण्याची रीत ... ... ... | ७० |
| गेल्या शेवटल्या कलमांत सांगितल्याप्रमाणें कमिशनरानें पैका दिला नाहीं तर काम चालविण्याची रीत ... ... | ७१ |
| बोर्डानें द्यावयाच्या रकमा न दिल्यास बोर्डाचा महसूल जप्त करण्याचा सरकारास अधिकार ... ... ... | ७२ |
| **वार्षिक अंदाज.** | |
| वार्षिक जमाखर्चाचा अंदाज चेअरमन ह्यानें तयार करावा... ... ... | ७३ |
| असा अंदाज बोर्डानें मंजूर करावा किंवा फिरवावा ... ... ... | ७४ |
| अंदाज मंजूरीसाठीं सरकारास रुजू केले पाहिजेत ... ... ... | ७५ |
| बोर्डाची स्थापना झाल्यानंतरचा पहिला अंदाज रुजू करण्याविषयीं व त्याची व्यवस्था करण्याविषयीं हंगामी ठराव ... ... | ७६ |
| जरूर असेल तेव्हां पुरवणीचे अंदाज तयार करून रुजू करावे ... ... | ७७ |
| अत्यंत निकडीचा प्रसंग असेल किंवा हैकोर्टाचा हुकुमनामा झालेला असेल तेव्हां शिवायकरून इतर प्रसंगीं ५,००० रुपयांहून ज्यास्त अशी कोणतीही रकम अंदाजांत दाखल केलेली असल्याशिवाय खर्चूं नये. | ७८ |
| **हिशोबांची तपासणी.** | |
| हिशोब सरकारी हिशोब तपासनिसांनीं दरसाल दोनदां तपासले पाहिजेत ... ... | ७९ |
| दस्तऐवज हजर करण्यास हुकुम करण्याचा हिशोब-तपासनिसांस अधिकार आहे ... | |
| त्यांचा मेहनताना सरकारानें ठरविला पाहिजे. | |
| त्यांचा रिपोर्ट, हिशोबाच्या तेरिजांसहित सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध केला पाहिजे. | |

| | कलम |
|---|---|
| **७.—बोर्डाचे अमलदार व नोकरलोक यांविषयीं.** | |
| **अमलदार व नोकरलोक यांची संख्या.** | |
| अमलदार व नोकरलोक आणि त्यांचा पगार व अलावन्स यांच्या यादीस बोर्डाची मंजुरी मिळाली पाहिजे ... .. | ८० |
| कांहीं वर्गांच्या लोकांस, विवक्षित कारणां शिवाय इतर कारणांसाठीं अमलदार व नोकर समजूं नये ... ... | |
| बोर्डास कानू करण्याचा अधिकार आहे ... | ८१ |
| रजा देण्याचें नियमन करण्याबद्दल ... | ,, (१) |
| रजेचें अलावन्स देण्यास अधिकार देण्याबद्दल | ,, (२) |
| आक्टिंग अलावन्स ठरविण्याबद्दल ... | ,, (३) |
| नोकरीची मुदत ठरविण्याबद्दल ... | ,, (४) |
| पेन्शन देण्याची शर्त ठरविण्याबद्दल ... | ,, (५) |
| प्राव्हिडेंट फंडास वर्गणी देण्याचा अधिकार देण्याबद्दल ... ... .. | ,, (६) |
| जखमांकरितां पेन्शनें किंवा कंप्याशनेट अलावन्स द्यावयाच्या शर्ती ठरविण्याबद्दल... | ,, (७) |
| **नेमणुका करण्याचे अधिकार वगैरे.** | |
| नेमणुका वगैरे कोणीं कराव्या .. | ८२ |
| विवक्षित अमलदारांच्या पगार वगैरे संबंधाचे हुकुम सरकारच्या मंजूरीस पात्र राहातील. | |
| एंजिनियर शब्दाची व्याख्या... .. | ८३ |
| **८.—पोट-कानू.** | |
| पोटकानू करण्याचा अधिकार बोर्डास दिला आहे. | ८४ |
| पोटकानू पसंत करणें व प्रसिद्ध करणें ... | ८५ |
| पोटकानू मोडल्याबद्दल शिक्षा ... | ८६ |
| पोटकानू दर्शविल्या पाहिजेत... ... | ८७ |
| **९.—शिक्षा.** | |
| बोर्डानें दिलेल्या कंत्राक्टांत संबंध ... | ८८ |
| कायद्याविरुद्ध ऐवज घेण्याबद्दल ... | ८९ |
| हिशोबतपासनिसापुढें वगैरे हजर होण्यास नाकारण्याबद्दल किंवा हयगय करण्याबद्दल शिक्षा. | ९० |
| आक्टाविरुद्ध केलेल्या अपराधांचा इन्साफ करण्याचा अधिकार ... ... | ९१ |
| **१०.—किरकोळ.** | |
| कोणत्याही कारणासाठीं नेमिलेला दिवस रविवारीं येईल किंवा सार्वजनिक सुटीच्या दिवशीं येईल तेव्हां त्याबद्दल ठराव ... | ९२ |
| अंतरें मोजण्याबाबद ... ... | ९३ |
| दाव्यांची मुदत .... ... ... | ९४ |

## परिशिष्टें.

अ.—या आक्टाअन्वयें जमीन घेण्याच्या कामाचें नियमन करण्याबाबदचे सन १८९४ च्या जमीन घेण्याविषयींच्या आक्टाचे भाग.

ब.—डिबेंचराचा नमुना.

क.—ज्या जमिनी मलिका मआझमांची मिळकत असून बोर्डास प्राप्त झाल्या आहेत त्या जमिनी—

भाग १.—खुल्या जागांदाखल राखून ठेवावयाच्या जमिनी.

भाग २.—इतर जमिनी.

ड.—ज्या जमिनी कार्पोरेशनची मिळकत असून बोर्डास प्राप्त झाल्या आहेत त्या जमिनी.

इ.—कोणत्या हद्दीच्या आंत समुद्राचा तळ नवीन साध्य करण्याचा हक्क बोर्डास प्राप्त होतो तें दाखविणारें.

फ.—सन १८९७ च्या सेप्टंबर महिन्याची १ ली तारीख व बोर्डाच्या रचनेची तारीख यांच्या दरमियान सरकारानें दिलेल्या पट्यांअन्वयें धारण केलेल्या जमिनी.

---

# सन १८९८ चा मसुदा नंबर १.

## मुंबई शहर सुधारण्याबाबत आणि त्याचा विस्तार यापुढें वाढण्यासाठीं जागेची तजवीज करण्याबाबत आक्टाचा मसुदा.

ज्या अर्थी (मुंबई शहरांत) नवीन स्ट्रीट करून व विद्यमान स्ट्रीटांमध्यें फेरफार करून, कित्येक ठिकाणांतील आरोग्यास अपायकारक असतील त्या इमारती पाडून किंवा त्यांत फेरफार करून, हवा अधिक चांगल्या रीतीनें खेळण्यासाठीं व विहार करण्यासाठीं खुल्या जागांची तजवीज करून, मुंबई शहरच्या कित्येक वर्गांच्या रहिवाशांसाठीं व इलाका पोलिसासाठीं आरोग्यदायक अशीं नवीन राहण्याचीं घरें बांधून, रिकाम्या जमिनी आंखून देऊन आणि मुंबई टापूच्या किनाऱ्याचे भाग भरून काढून व आंखून देऊन सदहू शहर सुधारण्यासाठीं व त्याचा विस्तार यापुढें वाढविण्यासाठीं तजवीज करणें योग्य आहे; आणि ज्या अर्थी वरील हेतु, यांत खालीं निर्दिष्ट केलेल्या रीतीनें आणि निर्दिष्ट केलेल्या अटींस व शर्तींस अनुसरून, शेवटास नेण्यासाठीं ट्रस्टींचा बोर्ड नेमून त्या बोर्डास विशेष अधिकार देणें योग्य आहे; आणि ज्या अर्थी कित्येक जमिनी व जमीन नवीन साध्य करून घेण्याचे हक्क, यांत खालीं दिलेल्या रीतीनें बोर्डास प्राप्त होतील, आणि अशा सदरीं सांगितल्या प्रकारच्या जमिनींचे प्लान, कीं ज्यांस यांत पुढें ठेविलेले प्लान, असें ह्मटलें आहे, ते मुंबईच्या कलेक्टराकडे ठेविले आहेत; त्या अर्थी खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

### १.—प्रारंभींचे ठराव.

सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

१. (१) या आक्टास "सन १८९८ चा मुंबई शहर सुधारण्याबाबत आक्ट" असें ह्मणावें.

(अ) तो फक्त मुंबई शहरासच लागू आहे.

(ब) तो पसार झाला ह्मणजे तावडतोब अमलांत येईल.

हिंदुस्थानच्या रेलवेबाबत आक्टाचे ठराव कायम ठेवणें.

(२) या आक्टांतील कोणत्याहि ठरावावरून, सन १८९० चा हिंदुस्थानचा रेलवेबाबत आक्ट याच्या ठरावांस व्यत्यय येतो असें समजूं नये.

संज्ञांच्या व्याख्या.

२. या आक्टांत, विषयास किंवा संदर्भास बाध येत नसेल तर, या आक्टांतील शब्दांचा अर्थ, वेळोवेळीं सुधारलेला सन १८८८ चा मुंबई शहरचा म्युनिसिपल आक्ट कीं ज्यास यांत पुढें "सदहू म्युनिसिपल आक्ट" असें ह्मटलें आहे त्यांत त्या शब्दांचा जो अर्थ केला आहे तोच आहे असें समजावें.

मात्र असें ठरविलें आहे कीं "स्ट्रीट" या शब्दाच्या व्याख्येंतील, "स्ट्रीट" या शब्दांत कोणत्याहि राजमार्गाचा, आणि कोणताहि बांधाबरून गेलेला रस्ता, पुल, नाल्यावर बांधलेला रस्ता, कमान, रस्ता, गल्ली, पायवाट, चौक, अंगण, आळी किंवा जाण्यायेण्याचा मार्ग, तो मग रहदारीचा रस्ता असो किंवा नसो, त्याचा समावेश होतो असें समजून ती व्याख्या वाचावी.

मात्र असेंहि ठरविलें आहे कीं या आक्टाच्या ३ ऱ्या भागांतील ठरावांचा आणि कलमें ९३ व ९४ यांचा अर्थ करते वेळीं, "जमीन" या शब्दाचा अर्थ, विषयास किंवा संदर्भास बाध येत नसेल तर, सन १८९४ च्या जमीन घेण्याबाबदच्या आक्टांत त्या शब्दाचा जो अर्थ केला आहे तोच आहे असें समजावें.

## २.—ट्रस्टींच्या बोर्डाबावत.

### बोर्डाची रचना.

हा आक्ट अमलांत आणण्याचें काम बोर्डाकडे सोंपण्याबाबत.

३. या आक्टाचे ठराव अमलांत आणण्याचें काम, यांत पुढें ज्या शर्ती व इयत्ता दिल्या आहेत त्यांस अनुसरून, एका बोर्डाकडे दिलें पाहिजे व त्या बोर्डास "मुंबई शहर सुधारण्यासाठींचे ट्रस्टी" हें नांव दिलें पाहिजे; आणि असा बोर्ड कीं ज्यास यांत पुढें "बोर्ड" असें ह्मटलें आहे तो एक संस्थापित मंडळी आहे, व त्याचें स्थानापन्नत्व नेहमीं चालू राहील व त्याचा एक सामायिक शिक्का असेल, आणि त्याला व त्याजवर सदरील पहिल्या नांवानें फिर्याद करण्याचा अधिकार आहे असें समजावें.

बोर्डाची रचना.

४. बोर्डांत तेरा सभासद असले पाहिजेत, ते असे कीं, तीन हुद्यापरत्वें ट्रस्टी, साहा निवडून नेमलेले ट्रस्टी, तीन नेमलेले ट्रस्टी आणि एक चेअरमन.

हुद्यापरत्वें असणारे ट्रस्टी खालीं सांगितलेले अधिकारी असले पाहिजेत, ह्मणजे :—

(१) मुंबई डिस्ट्रिक्टाची कमाण्ड असणारा जनरल किंवा इतर लष्करी अमलदार, .

(२) कलेक्टर किंवा आक्टिंग कलेक्टर, आणि

(३) कमिशनर.

निवडून नेमावयाचे ट्रस्टी, कार्पोरेशननें, चेंबर ऑफ् कामर्सनें व मुंबईच्या पोर्टच्या ट्रस्टींनीं निवडून नेमणें.

५. निवडून नेमावयाच्या ट्रस्टींपैकीं चार ट्रस्टी, कार्पोरेशनच्या त्या त्या वेळीं असणाऱ्या सभासदांनीं ६ व्या कलमाच्या ठरावांस अनुसरून, कार्पोरेशनच्या सभासदांच्या सभेंत, कार्पोरेशनच्या स्टांडिंग कमिटीच्या सभासदांच्या नेमणुकीस वेळोवेळीं ज्या कानू लागू असतील त्यांसारख्या कानूंअन्वयें निवडून नेमले पाहिजेत. एक ट्रस्टी, मुंबईच्या चेंबर ऑफ् कॉमर्सच्या त्या त्या वेळीं असणाऱ्या सभासदांनीं, ६ व्या कलमाच्या ठरावांस अनुसरून, मुंबईच्या पोर्टच्या निवडून नेमावयाच्या ट्रस्टींच्या निवडीस वेळोवेळीं ज्या कानू लागू असतील त्यांसारख्या कानूंअन्वयें, निवडून नेमला पाहिजे. एक ट्रस्टी, मुंबईच्या पोर्टच्या त्या त्या वेळीं असणाऱ्या ट्रस्टींनीं, ६ व्या कलमाच्या ठरावांस अनुसरून, निवडून नेमावयाच्या ट्रस्टीच्या निवडीच्या अगोदर एक सभा भरून त्या सभेंत सदरीं शेवटीं सांगितलेल्या ट्रस्टींकडून वेळोवेळीं जी रीति ठरविण्यांत येईल त्या रीतीनें निवडून नेमला पाहिजे.

ट्रस्टी ह्मणून निवडून नेमला जाण्याची लायकी.

६. जो कोणी मनुष्य, निवडीच्या वेळीं, प्रसंगाप्रमाणें कार्पोरेशनचा सभासद, चेंबर ऑफ् कॉमर्सचा सभासद किंवा मुंबईच्या पोर्टचा ट्रस्टी नसेल तो निवडून नेमलेला ट्रस्टी होण्यासाठीं निवडून नेमला जाण्यास लायक नाहीं असें समजावें.

७. कोणत्याहि ट्रस्टीची किंवा ट्रस्टींची निवड करण्यांत आली ह्मणजे, प्रसंगाप्रमाणें कार्पोरेशनच्या अध्यक्षानें, किंवा चेंबर ऑफ् कॉमर्सच्या चेअरमनानें, किंवा पोर्टाच्या ट्रस्टींच्या चेअरमनानें, तावडतोब, सदरीं सांगितल्याप्रमाणें निवडून नेमलेल्या मनुष्याच्या नांवाचें किंवा मनुष्यांच्या नांवांचें एक पत्रक सरकारास सादर केलें पाहिजे, आणि असें पत्रक मुंबई सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध करण्यांत आलें पाहिजे. निवडीचा रिपोर्ट करण्याबाबत.

८. सदरील ठरावांअन्वयें कोणताहि ट्रस्टी, यासंबंधानें या आक्टांत पुढें ठरविलेल्या मुदतीच्या आंत, निवडून नेमण्याच्या कामीं कार्पोरेशनकडून किंवा सदहू चेंबरकडून किंवा पोर्टाच्या ट्रस्टींकडून कसूर झाली असतां, मुंबई सरकारी ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून एखादा मनुष्य नेमण्याचा अधिकार सरकारास आहे, आणि याप्रमाणें नेमलेला मनुष्य, अनुक्रमें कार्पोरेशननें, सदहू चेंबरनें किंवा पोर्टाच्या ट्रस्टींनीं योग्य रीतीनें निवडून नेमलेल्या प्रकारचा एक ट्रस्टी आहे असें मानलें पाहिजे. निवडून नेमण्यात कसूर झाल्यास त्या प्रसंगीं काम चालविण्याची रीति.

९. नेमावयाचे ट्रस्टी व चेअरमन यांना सरकारानें, मुंबई सरकारी ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, नेमलें पाहिजे. नेमावयाचे ट्रस्टी व चेअरमन यांची नेमणूक.

१०. नेमलेल्या व निवडून नेमलेल्या पहिल्या ट्रस्टींच्या हुद्याची मुदत, सरकार या बाबतींत जाहीरनामा देऊन प्रसिद्ध करील त्या तारखेरोजीं सुरू झाली पाहिजे. पहिल्या ट्रस्टींच्या हुद्याची मुदत केव्हां सुरू होते.

११. नेमलेले पहिले ट्रस्टी व निवडून नेमलेल्या पहिल्या ट्रस्टींपैकीं तीन ट्रस्टी हे दरमियान नालायक झाले नसतील तर त्यांनीं, त्यांच्या हुद्याची मुदत सुरू होणाऱ्या तारखेच्या लगत पुढील मार्च महिन्याच्या ३१ व्या तारखेपर्यंत व ती तारीख पुरी होईपर्यंत, हुद्दा धारण केला पाहिजे; व सदरहू तीन ट्रस्टींची निवड, चेअरमन ठरवील त्या वेळीं व त्या रीतीनें चिठ्ठ्या काढून केली पाहिजे. निवडून नेमलेल्या पहिल्या ट्रस्टींपैकीं बाकी राहिलेल्या तीन ट्रस्टींनीं, वर सांगितलेल्या मार्च महिन्याच्या ३१ व्या तारखेच्या लगत पुढील मार्च महिन्याच्या ३१ व्या तारखेपर्यंत व ती तारीख पुरी होईपर्यंत, हुद्दा धारण केला पाहिजे. नेमलेल्या व निवडून नेमलेल्या ट्रस्टींनीं पाळीपाळीनें आपला हुद्दा सोडणें.

इतर प्रत्येक प्रसंगीं, नेमलेल्या व निवडून नेमलेल्या ट्रस्टींनीं, ते दरमियान नालायक न झाल्यास, दोन वर्षांच्या मुदतीपर्यंत हुद्दा धारण केला पाहिजे.

१२. निवडून नेमावयाचे पहिले ट्रस्टी, १० व्या कलमाअन्वयें जाहिरनामा देऊन प्रसिद्ध करण्यांत येईल त्या तारखेपूर्वील निदान पंधरा दिवसांअगोदरच्या कोणत्यातरी एका दिवशीं, निवडून नेमले पाहिजेत, आणि नेमावयाचे पहिले ट्रस्टी, सदरहू पंधरा दिवसांतील कोणत्यातरी एका दिवशीं नेमले पाहिजेत; इतर प्रत्येक प्रसंगीं, निवडून नेमावयाचे ट्रस्टी, ज्या एप्रिल महिन्याच्या १ ल्या तारखेस त्यांच्या हुद्याची मुदत सुरू होणार असेल त्या एप्रिल महिन्याच्या १ ल्या तारखेच्या लगत पूर्वीच्या मार्च महिन्याच्या पहिल्या तारखेच्या अगोदरचा व पंधराव्या तारखेच्या पुढचा नव्हे अशा कोणत्यातरी एका दिवशीं, निवडून नेमले पाहिजेत; आणि नेमावयाचे ट्रस्टी, सदरहू मार्च महिन्याच्या बाकी राहिलेल्या अवधींत कोणत्यातरी एका दिवशीं, नेमले पाहिजेत. पहिल्या ट्रस्टींची निवड व नेमणूक.

१३. चेअरमनानें, सरकारची मर्जी असेल तोंपर्यंत, हुद्दा धारण केला पाहिजे: मात्र इतकेंच कीं तो दरमियान नालायकीच्या सबबीनें ट्रस्टी असण्याचा बंद झाला नसला पाहिजे. चेअरमनानें सरकारची मर्जी असेल तोंपर्यंत हुद्दा धारण करणें.

१४. कोणताहि मनुष्य ट्रस्टी असण्याचा बंद झाल्यावर, १६ व्या कलमाअन्वयें नालायक झाला नसेल तर, पुनः निवडून नेमला जाण्यास किंवा पुनः नेमला जाण्यास लायक आहे असें समजावें. ट्रस्टी, पुनः निवडून नेमले जाण्यास किंवा पुनः नेमले जाण्यास लायक असणें.

नैमित्तिक खालीं झालेल्या जागा.

१९. (१) चेअरमन खेरीज करून इतर कोणत्याहि ट्रस्टीच्या हुद्याची जी जागा, तो ट्रस्टी मरण पावल्यामुळें, त्यानें राजीनामा दिल्यामुळें किंवा त्याच्या नालायकीमुळें, नैमित्तिक रीतीनें खालीं झाली असेल ती, एक महिन्याच्या आंत, खालीं झालेल्या हुद्याची जागा नेमलेल्या ट्रस्टीची असल्यास सरकारानें, अथवा ती एकाद्या निवडून नेमलेल्या ट्रस्टीची असल्यास अनुक्रमें कार्पोरेशननें, चेंबर ऑफ् कॉमर्सनें किंवा पोर्टाच्या ट्रस्टींनीं, ट्रस्टींच्या अवल नेमणुकींच्या व निवडींच्या बाबतींत जी रीति व जे ठराव लागू असतील त्याच रीतीनें, व होईल तेथवर त्याच ठरावांस अनुसरून, भरली पाहिजे: मात्र इतकेंच कीं याप्रमाणें पसंत केलेला ट्रस्टी आपला हुद्दा, सदरहू जागा खालीं झाली नसती तर ज्या ट्रस्टीची जागा खालीं झाली तो ट्रस्टी जेवढ्या मुदतीपर्यंत हुद्दा धारण करता असता तेवढ्याच फक्त मुदतीपर्यंत, धारण करील असें समजावें.

तीन महिन्यांहून ज्यास्त मुदतीपर्यंत आक्टिंग ट्रस्टी.

(२) जर एकादा ट्रस्टी—

(अ) तीन महिन्यांहून ज्यास्त मुदतीपर्यंत गैरहजर राहण्याच्या इरादानें मुंबईंतून निघून जाईल; किंवा

(ब) तीन महिन्यांहून ज्यास्त मुदतीपर्यंत बोर्डाच्या सभांमध्यें हजर राहण्यास कोणत्याहि कारणामुळें असमर्थ होईल; किंवा

(क) तीन महिन्यांहून ज्यास्त मुदतीपर्यंत मुंबईंत हजर नसेल;

तर असा ट्रस्टी गैरहजर किंवा असमर्थ असल्या मुदतींत, किंवा ट्रस्टी असण्याचा तो बंद होई तोंपर्यंत, त्याच्याबदल काम करण्यासाठीं एकाद्या मनुष्यास निवडून नेमलें पाहिजे किंवा नेमलें पाहिजे, आणि याप्रमाणें काम करणारा मनुष्य हा एक ट्रस्टी आहे असें या आक्टाच्या सर्व कारणांसाठीं मानलें पाहिजे.

जरूर असेल तेव्हां आक्टिंग नेमणूक तीन महिन्यांहून कमी मुदतीसाठीं करण्याबाबद विशेष ठराव.

(३) एकाद्या गैरहजर असलेल्या ट्रस्टीच्या जागीं, तो ट्रस्टी नेमलेला ट्रस्टी असेल तर सरकारच्या मर्जीप्रमाणें, आणि तो निवडून नेमलेला ट्रस्टी असेल तर संबंध असलेल्या निवड करणाऱ्या मंडळीस बोर्डानें अर्जी केली असतां, एकाद्या मनुष्यास तीन महिन्यांहून कमी मुदतीसाठीं निवडून नेमण्यास किंवा नेमण्यास सदरील शेवटच्या पोट-कलमांतील कोणत्याहि ठरावावरून हरकत येते असें समजूं नये.

## ट्रस्टींची नालायकी.

नालायकीचीं कारणें.

१६. (१) कोणताहि मनुष्य, कीं—

(अ) जो सर्टिफिकेट न मिळालेला दिवाळखोर किंवा नादार असेल; किंवा

(ब) ज्यास, साहा महिन्यांहून जास्त मुदतीपर्यंत कैदेची शिक्षा होण्याजोग्या एकाद्या अपराधाबदल कैदेची शिक्षा, किंवा काळ्या पाण्याची शिक्षा झाली असून ती शिक्षा मागाहून फिरविलेली नसेल किंवा रद्द झालेली नसेल; किंवा

(क) जो बोर्डाच्या ताब्यांतील कोणताहि हुद्दा किंवा फायद्याची जागा धारण करीत असेल; किंवा

(ड) ज्याचा, बोर्डाशीं, बोर्डानें किंवा बोर्डाच्या वतीनें केलेल्या कोणत्याहि कंट्राक्टांत अथवा कामांत, प्रत्यक्ष किंवा पर्यायानें, स्वतः होऊन किंवा आपल्या भागीदारामार्फत, कोणताहि भाग किंवा हितसंबंध असेल,

तो मनुष्य ट्रस्टी होण्यास लायक आहे असें समजूं नये.

विशेष ठराव

(२) मात्र असें ठरविलें आहे कीं कोणत्याहि मनुष्याचा—

(इ) कोणत्याहि स्थावर मिळकतीचा कोणताहि पट्टा, विक्री, अदलाबदल किंवा खरेदी यांत, अगर त्यावद्दलच्या कोणत्याही कबुलायतींत; किंवा

(फ) व्याजीं दिलेल्या पैक्याबद्दलची कोणतीहि कबुलायत, अगर फक्त पैकाच देण्याबद्दलचें कोणतेंहि तारण यांत; किंवा

(ग) बोर्डाच्या कामांसंबंधी कोणतीहि जाहिरखबर ज्या कोणत्याहि वर्तमानपत्रांत छापण्यांत येत असेल त्या वर्तमानपत्रांत; किंवा

(ह) जी कोणतीहि जॉइंट-स्टॉक कंपनी बोर्डाशीं कंट्राक्ट करील अगर सदरहू बोर्डाकडून अथवा बोर्डाच्या वतीनें कामास लावण्यांत येईल त्या जॉइंट-स्टॉक कंपनींत; किंवा

(आय्) तो ज्या कोणत्याहि मालाचा व्यापार करीत असेल तो माल कोणत्याहि एका सरकारी सालांत दोन हजार रुपयांहून जास्त नाहीं इतक्या किंमतीपर्यंत बोर्डास कधीं कधीं विकण्याच्या कामांत; किंवा

(के) गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं मुद्दाम परवानगी दिलेल्या कोणत्याहि कंट्राक्टांत,

भाग किंवा हितसंबंध आहे एवढ्याच केवळ कारणानें तो मनुष्य सदरहूप्रमाणें नालायक आहे असें किंवा त्याचा अशा कंट्राक्टांत अगर कामांत कोणताहि भाग अथवा हितसंबंध आहे असें मानूं नये.

१७. (१) जो कोणताहि ट्रस्टी— *(ट्रस्टींनीं ज्या कारणांसाठीं हुद्दा सोडावयाचा तीं कारणें.)*

(अ) सदरील शेवटल्या कलमांत सांगितलेल्या कारणांपैकीं कोणत्याहि कारणामुळें नालायक होईल; किंवा

(ब) लागोपाठ बारा महिन्यांहून ज्यास्त मुदतीपर्यंत बोर्डाच्या सभांतून गैरहजर राहील, अगर बोर्डाच्या परवानगीवांचून बोर्डाच्या लागोपाठ साहा साधारण सभांतून गैरहजर राहील; किंवा

(क) लगत खालच्या कलमांतील ठरावांच्या विरुद्ध वागेल; किंवा

(ड) निवडून नेमलेला ट्रस्टी असून, प्रसंगाप्रमाणें कार्पोरेशनचा अगर चेंबर ऑफ् कामर्सचा सभासद असण्याचा अथवा मुंबईच्या पोर्टाचा ट्रस्टी असण्याचा बंद होईल,

तो, ट्रस्टी असण्याचा बंद झाला पाहिजे आणि मग त्याची जागा खालीं झाली पाहिजे:

मात्र असें ठरविलें आहे कीं कार्पोरेशनचा जो सभासद किंवा पोर्टाचा जो ट्रस्टी, प्रसंगाप्रमाणें असा सभासद किंवा असा ट्रस्टी असण्याचा बंद झाल्यावर, असा सभासद किंवा ट्रस्टी ह्मणून तावडतोब पुनः नेमला जाईल किंवा पुनः निवडून नेमला जाईल त्यास रकम (ड) लागू आहे असें समजूं नये.

(२) ट्रस्टीनें बोर्डाच्या कोणत्याहि सभेंत किंवा तिच्या एखाद्या कमिटींत, ज्या कोणत्याहि बाबतींत त्याचा प्रत्यक्ष किंवा पर्यायानें, स्वतः होऊन किंवा आपल्या भागीदाराच्या मार्फत, १६ व्या कलमाच्या दुसऱ्या पोट-कलमांत सांगितल्या प्रकारचा कोणताहि भाग किंवा हितसंबंध असेल, अगर ज्यांत त्याचा, कुळाच्या वतीनें धंद्यापरत्वें, अगर कोणत्याहि मनुष्याचा एजंट या नात्यानें, हितसंबंध असेल, त्या बाबतीसंबंधी वादांत आपलें अंग घालूं नये किंवा त्या बाबतीच्या संबंधानें मत देऊं नये. *(ट्रस्टींचा ज्यांत हितसंबंध असेल त्या बाबतींत त्यांना मत देण्याचा अगर वाद करण्याचा अधिकार नाहीं.)*

## ट्रस्टींचा पगार.

१८. चेअरमनास, सरकार वेळोवेळीं ठरवील तो पगार मिळेल. *(चेअरमनाचा पगार सरकारानें ठरविणें.)*

[ ]

चेअरमन खेरीजकरून इतर ट्रस्टींना ज्या फी मिळण्याचा हक्क आहे त्या फी.

१९. चेअरमन खेरीज करून इतर जो जो ट्रस्टी, काम चालविण्यास पाहिजे असतील तितके ट्रस्टी हजर असून काम चालविण्यांत येईल त्या सभेंत हजर राहील आणि त्या सभेंत तिच्या आरंभापासून अखेरपर्यंत हजर राहील, त्या प्रत्येक ट्रस्टीस खालीं सांगितल्याप्रमाणें फी मिळण्याचा हक्क असेल असें समजावें, ह्मणजे—

बोर्डाच्या प्रत्येक साधारण सभेबदल रु. ३०; मात्र असें ठरविलें आहे कीं अशी सभा पुढच्या दिवसावर तहकूब ठेवण्यांत आल्यास किंवा कोणत्याहि एका आठवड्यांत एकाहून अधिक साधारण सभा भरण्यांत आल्यास, त्या एका आठवड्यांतील सदहू प्रकारच्या सगळ्या सभांमध्यें हजर राहण्याबद्दल कोणत्याहि ट्रस्टीला रु. ३० याहून अधिक रकम देण्यांत येणार नाहीं.

लगत खालच्या कलमाची रकम २ (ब) याअन्वयें बोलाविलेल्या सदहू बोर्डाच्या प्रत्येक विशेष सभेबदल रु ३०.

सदहू हजर राहणारा ट्रस्टी हा सभासद असलेल्या कमिटीची जी जी विशेष सभा लगत खालच्या कलमाची रकम (१) याअन्वयें बोलाविली असेल त्या प्रत्येक विशेष सभेबदल रु० १९; मात्र असें ठरविलें आहे कीं अशी कमिटीची विशेष सभा, बोर्डाच्या ज्या साधारण किंवा विशेष सभेबदल सदरील दोहोंपैकीं कोणत्याहि एका रकमेअन्वयें त्याला फी मिळण्याचा हक्क असेल त्या साधारण किंवा विशेष सभेच्या लगेच मागाहून किंवा तिची तयारी करण्याकरितां त्याच दिवशीं भरलेली नसली पाहिजे.

## बोर्डानें चालवावयाचीं कामें.

बोर्डानें चालवावयाच्या कामांसंबंधी ठराव.

२०. बोर्डानें चालवावयाच्या कामांच्या संबंधानें खालीं सांगितलेल्या ठरावांस अनुसरून वहिवाट केली पाहिजे, ( ह्मणजे ):—

जागा खालीं झाल्याच्या कारणानें, चालवावयाच्या कामांस व्यत्यय येऊं नये.

(१) बोर्डांतील कोणतीहि जागा खालीं पडेल त्या मुदतींत, जे ट्रस्टी चालू राहतील त्यांना, ती जागा खालीं पडलेली नाहीं असें समजून, काम चालविण्याचा अधिकार आहे.

बोर्डानें एकत्र जमून आपणास योग्य वाटेल त्याप्रमाणें काम करण्याची तजवीज करावी.

(२) बोर्डानें एकत्र जमलें पाहिजे आणि आपणास योग्य वाटतील त्या सभांची जागा, दिवस, तास, नोटीस, व्यवस्था व पुढल्या दिवसापर्यंत तहकुबी यांच्या संबंधानें आपणास योग्य वाटतील त्या, या आक्टास विरुद्ध नाहींत अशा, तजविजी वेळोवेळीं खालीं दिलेल्या शर्तींस अनुसरून, केल्या पाहिजेत, ( ह्मणजे ):—

साधारण सभा दर महिन्यास एकदा भरलीच पाहिजे, किंवा

(अ) साधारण सभा दर महिन्यास निदान एकदा तरी भरली पाहिजे;

जरूर असेल तेव्हां तेव्हां विशेष सभा.

(ब) चेअरमनास योग्य वाटेल तेव्हां तेव्हां तो विशेष सभा बोलाविण्यास मुखत्यार आहे, आणि त्यानें, तिहींहून कमी नाहींत इतक्या ट्रस्टींनीं लेखी विनंति केली असतां, विशेष सभा बोलाविली पाहिजे;

काम चालविण्यास आठ ट्रस्टी असेल पाहिजेत.

(क) कोणत्याहि सभेच्या आरंभापासून अखेरपर्यंत निदान आठ ट्रस्टी हजर नसतील तर त्या सभेंत कोणतेंहि काम चालवितां नये;

चेअरमनानें प्रत्येक सभेंत अध्यक्षस्थानीं बसावें.

(ड) प्रत्येक सभा भरण्यासाठीं नेमलेल्या वेळीं चेअरमन हजर असेल तर त्यानें, आणि तो हजर नसल्यास ती सभा, हजर असलेल्या ट्रस्टींतून ज्या कोणाएकास पसंत करील त्यानें, त्या सभेंत अध्यक्षस्थानीं बसलें पाहिजे.

सर्व बाबतींचा निकाल बहुमतानें केला पाहिजे.

(इ) सर्व बाबतींचा निकाल हजर असलेल्या ट्रस्टींच्या बहुमतानें केला पाहिजे, आणि दोन पक्ष होऊन उभयपक्षीं सारखीं मतें पडतील त्या सर्व प्रसंगीं अध्यक्षास दुसरें किंवा निर्णायक मत देण्याचा अधिकार आहे.

(फ) मतें मागण्यांत आल्यास, मतें देणाऱ्या ट्रस्टींचीं नांवें व त्यांच्या मतांचा प्रकार हीं अध्यक्षानें लिहून ठेविलीं पाहिजेत; मतें मागण्याचा अधिकार आहे.

(ग) प्रत्येक सभेत हजर असलेल्या ट्रस्टींच्या नांवांचीं व चालविलेल्या कामांचीं टिपणें, त्या कारणासाठीं एक बूक ठेवून त्यांत लिहून ठेविलीं पाहिजेत; आणि त्या टिपणांवर लगत पुढल्या सभेच्या वेळीं अशा सभेच्या अध्यक्षानें सही केली पाहिजे व तीं कचेरीच्या तासांत कोणत्याहि ट्रस्टीस पाहतां येण्यासाठीं खुलीं असलीं पाहिजेत. टिपणें ठेविलीं पाहिजेत.

(३) चेअरमन, व बोर्डास योग्य वाटतील ते इतर ट्रस्टी, यांच्या कमिट्या नेमून त्यांकडे आपल्या अधिकारांपैकीं कोणतेहि अधिकार देण्यास बोर्ड मुखत्यार आहे; आणि याप्रमाणें नेमलेल्या कोणत्याहि कमिटीला बोर्ड वेळोवेळीं जे कोणतेहि हुकुम देईल त्या हुकुमांस अनुसरून त्या कमिटीनें चाललें पाहिजे, व बोर्डास कोणत्याहि वेळीं, याप्रमाणें नेमलेली कोणतीहि कमिटी बंद करण्याचा किंवा तिच्या रचनेंत फेरफार करण्याचा अधिकार आहे. बोर्ड आपला अधिकार कमिट्यांकडे देण्यास मुखत्यार आहे.

(४) चेअरमन हा अशा प्रत्येक कमिटीचा अध्यक्ष असला पाहिजे; अशी कमिटी भरण्यासाठीं नेमलेल्या वेळीं तो हजर नसेल तर, हजर असलेल्या सभासदांनीं आपणांपैकीं एकाजणास अशा सभेचा अध्यक्ष होण्यासाठीं पसंत केलें पाहिजे. प्रत्येक कमिटींत चेअरमन हा अध्यक्ष असणें.

(५) कमिट्या, आपणास योग्य वाटेल त्याप्रमाणें सभा भरण्यास व त्या सभा पुढल्या दिवसावर तहकूब ठेवण्यास मुखत्यार आहेत, परंतु चेअरमनास योग्य वाटेल तेव्हां तेव्हां एकाद्या कमिटीची विशेष सभा बोलाविण्याचा त्याला अधिकार आहे, आणि अशा कमिटीच्या दोहोंहून कमी नाहींत इतक्या सभासदांनीं विनंति केली असतां त्यानें तिची विशेष सभा बोलाविली पाहिजे. कमिट्यांनीं केव्हां सभा भरावी.

(६) कमिटीच्या कोणत्याहि सभेंतील बाबतींचा निकाल हजर असलेल्या सभासदांच्या बहुमताप्रमाणें केला पाहिजे, आणि दोन पक्ष होऊन उभयपक्षीं सारखीं मतें पडलीं असतां सभेच्या अध्यक्षानें एक दुसरें किंवा निर्णायक मत दिलें पाहिजे: मात्र अशा कोणत्याहि सभेंत, तिच्या आरंभापासून अखेरीपर्यंत कमिटीच्या सभासदांपैकीं निदान दोनतृतीयांश सभासद हजर नसतील तर कोणतेंहि काम चालवूं नये. कमिटींतील बाबतींचा निकाल बहुमताप्रमाणें केला पाहिजे: काम चालविण्यासाठीं दोनतृतीयांश सभासद हजर असले पाहिजेत.

(७) बोर्डाचें किंवा कोणत्याहि कमिटीचें किंवा ट्रस्टी ह्मणून काम करणाऱ्या कोणत्याहि मनुष्याचें कोणतेंहि कृत्य, असा बोर्ड, कमिटी किंवा ट्रस्टी याच्या नेमणुकींत कांहीं व्यंग आहे एवढ्याच कारणानें, अगर ते किंवा त्यांपैकीं कोणीहि ट्रस्टीच्या हुद्यास नालायक होते या सबबीनें, अव्यवहारोपयोगी होतें असें समजूं नये. बोर्ड वगैरेचीं कृत्यें पद्धतीविरुद्ध झाल्यामुळें अव्यवहारोपयोगी होत नाहींत.

२१. चेअरमनास बोर्डाच्या तर्फे, कोणतेंहि कंट्राक्ट किंवा कबुलायत अशा रीतीनें व अशा नमुन्याप्रमाणें करण्याचा अधिकार आहे कीं असें कंट्राक्ट किंवा कबुलायत त्यानें आपल्या स्वतःच्या तर्फे केली असती तर, ती रीति व तो नमुना यावरून तो, त्या त्या काळीं अमलांत असलेल्या कायद्याप्रमाणें, बद्ध झाला असता; मात्र इतकेंच कीं अशा कंट्राक्टाची किंवा कबुलायतीची किंमत अगर रकम एक हजार रुपयांहून अधिक असतां नये. परंतु बोर्डाच्या तर्फेचें दुसरें प्रत्येक कंट्राक्ट किंवा कबुलायत लेखी असली पाहिजे आणि त्यावर चेअरमनानें व दुसऱ्या दोन ट्रस्टींनीं सह्या केल्या पाहिजेत, आणि त्यावर बोर्डाच्या सामायिक शिक्क्यानें मोहर केली पाहिजे. कोणतेंहि कंट्राक्ट किंवा कबुलायत या कलमांत ठरविल्याप्रमाणें केलें किंवा केली नसेल तर तें किंवा ती बोर्डास बद्धक होणार नाहीं. कंट्राक्टें करण्याची रीति.

२२. बोर्डानें या आक्टाअन्वयें केलेल्या कोणत्याहि कंट्राक्टापासून उपस्थित होणारा कोणताहि दावा किंवा मागणी याबद्दल किंवा याच्या संबंधानें अगर बोर्डानें कंट्राक्ट मोडल्याबद्दल तोडजोड करण्याचा अधिकार.

किंवा बोर्डाविरुद्ध केलेल्या कोणत्याहि फिर्यादीच्या किंवा दाव्याच्या संबंधानें, आपणास वाजवी वाटेल तेवढ्या पैक्याच्या रकमेस किंवा नुकसानीच्या इतर मोबदल्यास, तोडजोड करण्याचा किंवा मांडून वाळण्याचा बोर्डास अधिकार आहे.

### चेअरमन.

चेअरमनाचीं कामें.

२३ चेअरमनानें—

(१) अजारीपणामुळें किंवा इतर वाजवी कारणामुळें त्यास हजर होतां येत नाहीं असें नसल्यास, बोर्डाच्या प्रत्येक सभेंत हजर राहिलें पाहिजे ;

(२) कारभाराच्या बाबतींत आणि बोर्डाचे हिशोब व कागदपत्र यांसंबंधी बाबतींत बोर्डाचे अमलदार व नोकर या सर्वांचीं कृत्यें व कामें यांवर देखरेख ठेविली पाहिजे व निर्बंध चालविला पाहिजे ; आणि ८१ व्या कलमाअन्वयें बोर्डानें केलेले जे नियम त्या त्या वेळीं अमलांत असतील त्यांस अनुसरून सदहू अमलदार व नोकर यांची चाकरी आणि त्यांचा पगार, सवलती व मुशाहिरे यांसंबंधी सर्व प्रकरणांचा निकाल केला पाहिजे.

(३) बोर्डानें चालविलेल्या कामांपैकीं ज्या कोणत्याहि कामाच्या टिपणांची नकल, व जीं कोणतींहि पत्रकें किंवा माहिती सरकार वेळोवेळीं मागेल ती नकल व तीं पत्रकें किंवा माहिती सरकारास दिली पाहिजे;

कामावरून गैरहजर राहण्यासाठीं रजा व आक्टिंग चेअरमनाची नेमणूक; रजा व आक्टिंग अलावन्स देणें.

२४. वेळोवेळीं चेअरमनं याला सरकार, आपणास योग्य वाटेल त्या प्रकारची कामावरून गैरहजर राहण्यास रजा देण्यास मुखत्यार आहे; आणि याप्रमाणें चेअरमन रजा घेऊन गैरहजर राहिलेल्या कोणत्याहि मुदतींत त्याजबदल काम करण्यासाठीं ज्या कोणत्याहि मनुष्यास सरकार नेमील तो मनुष्य, त्यांप्रमाणें काम करीत असेल तोंपर्यंत, चेअरमन आहे असें या आक्टाच्या सर्व कारणांसाठीं मानलें पाहिजे.

चेअरमन रजा घेऊन गैरहजर राहील त्या मुदतींत त्याला जें कोणतेंहि अलावन्स देण्याविषयीं सरकार फर्मावील तें अलावन्स, आणि त्याजबदल काम करण्यासाठीं नेमलेल्या मनुष्यास जो पगार देण्याविषयीं सरकार फर्मावील तो पगार, हीं ६९ व्या कलमांत फर्माविलेल्या रीतीनें खर्चीं घातलीं पाहिजेत.

## ३.—कामें व अधिकार.

### सुधारणेसंबंधी योजना.

एखाद्या मोहोल्याच्या किंवा क्षेत्राच्या रोगकारक स्थितीविषयीं अधिकारपरत्वें लिहून आल्याच्या योगानें खात्री झाली असतां बोर्डानें त्याच्या सुधारणेसाठीं योजना करणें.

२५. यांत खालीं सांगितल्याप्रमाणें बोर्डास अधिकारपरत्वें मजकूर लिहून आला असतां, ह्मणजे, सदरहू शहराच्या अमुक भागांतील अमुक हद्दींच्या आंतलीं—

(अ) मनुष्यवस्तीसाठीं उपयोग केलेलीं किंवा तसा उपयोग करण्याचा इरादा अगर संभव असलेलीं अमुक घरें किंवा इमारती मनुष्यवस्तीसाठीं अयोग्य आहेत, किंवा

(ब) अशा हद्दींतील स्ट्रीट व घरें किंवा इमारती अगर तशा घरांचे किंवा इमारतींचे गट यांचा अरुंदपणा, दाटी, आणि वाईट रचना, किंवा त्यांची वाईट स्थिती हीं, अगर उजेड, वारा, हवा खेळण्याचीं साधनें किंवा वाजवी सोई यांचा अभाव, अगर दुसरी कोणतीहि आरोग्यरक्षणासंबंधी उणीव, अगर अशा कारणांपैकीं एक किंवा अधिक कारणें हीं, त्या हद्दींतल्या क्षेत्रांतील इमारतींत अगर शेजारच्या इमारतींत राहणाऱ्या मनुष्यांच्या आरोग्यास भयकारक किंवा अपकारक आहेत ;

आणि अशा घरांसंबंधी किंवा इमारतींसंबंधी अपायांचा व अशा क्षेत्रांतील आरोग्यरक्षणासंबंधी उणीवांचा, अशा क्षेत्रांतल्या स्ट्रीटांची, घरांची व इमारतींची, अगर असे स्ट्रीट, घरें किंवा इमारती यांतून कित्येकांची पुनः मांडणी ठरवून व तीं पुनः बांधून सुधारणा करण्याची योजना केल्याशिवाय, इतर कोणत्याहि प्रकारें पूर्णपणें परिहार करतां येत नाहीं असा मजकूर लिहून आला असतां, बोर्डानें त्या लिहून आलेल्या मजकुराचा विचार केला पाहिजे, आणि त्या मजकुराच्या खरेपणाबद्दल व सदरहू कामासाठीं लागणाऱ्या पैशाच्या उत्पन्नाचें साधन आपल्यापाशीं असल्याबद्दल खात्री झाली तर, बोर्डानें तें क्षेत्र रोगकारक क्षेत्र असून त्या क्षेत्राच्या संबंधानें सुधारणेसंबंधी योजना करणें अवश्य आहे असा ठराव केला पाहिजे, आणि असा ठराव केल्यानंतर ताबडतोब त्यांनीं त्या क्षेत्राच्या सुधारणेसंबंधी योजना करावयास लागलें पाहिजे.

मात्र हमेश असें ठरविलें आहे कीं एका सुधारणेसंबंधी योजनेंत सदरहू प्रकारच्या कितीहि क्षेत्रांचा समावेश करण्यास हरकत नाहीं.

अधिकारपरत्वें लिहून पाठवावयाचा मजकूर कोणी लिहून पाठवावा.

२६. (१) या आक्टाच्या कारणांसाठीं अधिकारपरत्वें लिहिलेला मजकूर याचा अर्थ कमिशनरानें बोर्डास लिहिलेला मजकूर असा आहे.

(२) असा लिहिलेला मजकूर कमिशनरास आपण होऊन लिहिण्याचा अधिकार आहे, व तो खालीं लिहिलेल्या प्रसंगीं कमिशनरानें लिहिला पाहिजे, ह्मणजे—

(अ) म्युनिसिपल एक्झिक्यूटिव्ह हेल्थ ऑफिसरानें लेखी तकरार केली असतां ;

(ब) ज्या क्षेत्राच्या संबंधानें तकरार करण्यांत आली असेल त्या क्षेत्राच्या आंत राहणाऱ्या तीन किंवा अधिक जस्टिसांनीं सही केलेली लेखी तकरार आली असतां ;

(क) सदरहू म्युनिसिपल आक्टाअन्वयें घेण्याजोगा कोणताहि मिळकतीवरील कर देण्यास पात्र असून, ज्या क्षेत्राच्या संबंधानें तकरार केली असेल त्या क्षेत्राचा समावेश होणाऱ्या वार्डांत राहणाऱ्या, बारा किंवा अधिक मनुष्यांनीं सही केलेली लेखी तकरार आली असतां.

सुधारणेसंबंधी योजनेंत कोणकोणत्या गोष्टींचा समावेश करावा व कोणकोणत्या गोष्टी निर्दिष्ट केल्या पाहिजेत त्याचा तपशील.

२७. (१) सुधारणेसंबंधी योजनेबरोबर नकाशे व इतर तपशीलवार माहिती असली पाहिजे, आणि तींत—

(अ) ज्या क्षेत्राच्या संबंधानें अधिकारपरत्वें अर्ज करण्यांत आला असेल त्या क्षेत्राचा कोणताहि भाग वगळणें किंवा त्याच्या शेजारच्या कोणत्याहि जमिनी दाखल करणें जरूर आहे असें बोर्डास वाटल्यास त्याप्रमाणें तसा भाग वगळण्याचा किंवा तशा जमिनी दाखल करण्याचा अधिकार आहे ;

(ब) नवीन स्ट्रीट बनविण्याबद्दल, किंवा रोगकारक क्षेत्रांतील व त्या क्षेत्राबाहेरील विद्यमान स्ट्रीटांत फेरफार करण्याबद्दल, ते रुंद करण्याबद्दल, वळविण्याबद्दल, उंच करण्याबद्दल, त्यांची पुनः मांडणी करण्याबद्दल किंवा ते पुनः बांधण्याबद्दल तजवीज करण्याचा अधिकार आहे ;

(क) सदरील शेवटल्या रकमेच्या कारणांसाठीं लागणाऱ्या जमिनीखेरीज आणखी जी कोणतीहि जमीन, सदरहूप्रमाणें करण्याचा इरादा असलेल्या, किंवा विद्यमान, स्ट्रीटाच्या बाजूस किंवा त्या स्ट्रीटास लागून असेल व जी घेणें योग्य आहे असें बोर्डास वाटेल ती जमीन, तिजवर कोण-

त्याहि इमारती असल्यास त्यांनिशीं, घेण्याबद्दल व ती जादा जमीन उंच व सपाट करण्याबद्दल तजवीज करण्याचा अधिकार आहे;

(ड) रोगकारक क्षेत्रांतील कोणत्याहि सखल जमिनी उंच करण्याबद्दल तजवीज करण्याचा अधिकार आहे;

(इ) ज्या कोणत्याहि इमारतीच्या संबंधानें चीफ प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटानें सदरहू म्युनिसिपल आक्टाच्या ३७८ व्या कलमाअन्वयें मनाईचा हुकुम केला असेल ती इमारत, तिच्या घराठाणानिशीं किंवा त्यावांचून, घेण्याबद्दल तजवीज करण्याचा अधिकार आहे;

(फ) जे गरीब व मजुरी करणाऱ्या वर्गाचे लोक सदरहू योजनेच्या योगानें उघडे पडतील त्या सगळ्या किंवा त्यांतील कांहीं लोकांसह तशा वर्गाच्या लोकांसाठीं राहण्याचीं घरें बांधण्याबद्दल, आणि रोगकारक क्षेत्रांत किंवा तशा क्षेत्राबाहेर त्या कारणासाठीं लागणारी कोणतीहि जमीन घेण्याबद्दल, उंच करण्याबद्दल व सपाट करण्याबद्दल तजवीज करण्याचा अधिकार आहे ;

(ग) रोगकारक क्षेत्रांत अधिक चांगल्या रीतीनें हवा खेळण्यासाठीं खुल्या जागा बनविण्याबद्दल तजवीज करण्याचा अधिकार आहे ; आणि

(ह) रोगकारक क्षेत्राच्या आंत आरोग्यरक्षणासंबंधी ज्या व्यवस्था करणें जरूर असेल त्या सगळ्या किंवा त्यांतून कांहीं व्यवस्था करण्याबद्दल तजवीज करण्याचा अधिकार आहे.

(२) सदरहू योजनेंत, ज्या जमिनी घ्यावयाच्या असतील त्या निर्दिष्ट केल्या पाहिजेत.

योजना तयार करतांना कोणत्या गोष्टींकडे जास्त लक्ष दिलें पाहिजे.

२८. कोणत्याहि क्षेत्रासाठीं सुधारणेसंबंधी योजना तयार करतांना सदरहू शहराच्या आसपासच्या भागांच्या व सदरहू एकंदर शहराच्या स्थितीकडे व प्रकाराकडे, आणि सदरहू शहराच्या आसपासच्या व इतर भागांकरितां सुधारणेसंबंधी किंवा स्ट्रीटांसंबंधी योजना केल्या जाण्याचा संभव आहे किंवा कसें या गोष्टीकडे लक्ष्य पुरविलें पाहिजे.

योजना पुरी झाल्यावर काम चालविण्याची रीति.

२९. एकादी सुधारणेसंबंधी योजना पुरी झाल्यावर, बोर्डानें—

नोटिसा प्रसिद्ध करणें.

(अ) लागोपाठ तीन आठवड्यांत एकाच वेळीं, मुंबई सरकारी ग्याझेटांत आणि सदरहू शहरांत खपणाऱ्या एका किंवा अधिक व त्याच त्याच इंग्रजी वर्तमानपत्रांत व दोन किंवा अधिक व त्याच त्याच देशी वर्तमानपत्रांत एक नोटीस प्रसिद्ध करून तींत, योजना करण्यांत आल्याची गोष्ट, त्या योजनेंत नमूद केलेल्या क्षेत्राच्या हद्दी, आणि त्या योजनेची व तिच्या नकाशाची नकल सर्व वाजवी वेळीं कोणत्या जागीं पाहण्यास मिळेल त्या जागेचें नांव हीं लिहिलीं पाहिजेत; आणि

योजना अमलांत आणते वेळीं घ्यावयाच्या मिळकतीच्या मालकांवर नोटिसा बजावणें.

(ब) अशी नोटीस पहिल्यानें ज्या दिवशीं प्रसिद्ध करण्यांत आली असेल त्या दिवसाच्या लगत पुढील महिन्यांत, सदरहू योजना अमलांत आणते वेळीं बोर्डानें घेण्याची योजलेल्या कोणत्याहि जमिनीवर किंवा इमारतीवर सदरहू म्युनिसिपल आक्टाअन्वयें घ्यावयाचे मिळतीवरील कर देण्यास मूळ पात्र म्हणून ज्या ज्या मनुष्याचें नांव कमिशनराच्या असेसमेंट बुकांत दिसून येईल त्या प्रत्येक मनुष्यावर नोटीस बजाविली पाहिजे, आणि त्या नोटिशींत, ती जमीन किंवा इमारत सुधारणेसंबंधी योजनेच्या कारणांसाठीं बोर्डानें घेण्याचें योजिलें आहे असें

किंवा, नोटीस बजाविलेल्या मनुष्याची, ती जमीन घेण्याच्या संबंधानें नाकबुली आहे किंवा नाहीं, व त्या मनुष्याची नाकबुली असल्यास अशा नाकबुलीचीं कारणें काय आहेत तें दाखविणारा जबाब, ती नोटीस बजाविल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आंत, द्यावा असें फर्माविलें पाहिजे.

अशा नोटिशीवर चेअरमनानें, किंवा त्याच्या हुकुमानें, सही केली पाहिजे, आणि ती—

(१) ज्या मनुष्यावर बजावावयाची असेल त्यास, किंवा तो मनुष्य हजर नसल्यास अगर सांपडत नसल्यास त्याच्या एजंटास, जातीनिशीं देऊन, किंवा जर कोणी एजंट सांपडत नसेल तर मग त्या जमिनीवर किंवा इमारतीस लावून ; किंवा,

(२) सदरीं सांगितल्या प्रकारच्या मनुष्याच्या नेहमींच्या राहण्याच्या जागीं किंवा ज्या जागीं तो शेवटीं राहात होता असें माहीत असेल त्या जागीं लावून, किंवा,

(३) त्या मनुष्याच्या नेहमींच्या राहण्याच्या जागेच्या पत्त्यावर किंवा ज्या जागीं तो शेवटीं राहात होता असें माहीत असेल त्या जागेच्या पत्त्यावर टपालांतून पाठवून, ती बजाविली पाहिजे.

३०. (१) योजनेबद्दलची नोटीस प्रसिद्ध करण्याच्या व बजाविण्याच्या संबंधानें वर सांगितलेल्या ठरावांस अनुसरून वहिवाट केल्यावर बोर्डानें ती योजना आपणास योग्य वाटेल त्याप्रमाणें पुनः तपासली पाहिजे आणि त्या योजनेस मंजुरी देण्यासाठीं सरकारास अर्जी केली पाहिजे. बोर्डानें, नोटिसा प्रसिद्ध केल्यानंतर व बजाविल्यानंतर, योजना पुनः तपासावी व ती सरकारास मंजुरीसाठीं पाठवावी.

(२) मंजुरी मिळण्यासाठींच्या अर्जीबरोबर खालीं सांगितलेले कागदपत्र असले पाहिजेत, ह्मणजे— सरकारास तपशीलवार माहिती देणें.

(अ) योजनेची नकल ;

(ब) योजना अमलांत आणण्याच्या संबंधाचे पुरे नकाशे, आणि त्यासंबंधाच्या खर्चाचीं पुरीं अंदाजपत्रकें ;

(क) आरंभीं केलेल्या योजनेची नकल ;

(ड) योजनेच्या कारणांसाठीं ज्या जमिनी घ्यावयाचें योजिलें असेल त्या जमिनी निर्दिष्ट करणारें परिशिष्ट ;

(इ) कोणी मनुष्यांनीं, वर सांगितलेल्या नोटिसांच्या आपल्या जबाबांत, त्यांच्या जमिनी घेण्याच्या संबंधानें नाकबुली दर्शविली असल्यास त्यांच्या नांवांची यादी ; या यादींत, अशा मनुष्यांनीं अशा नाकबुलीचीं कोणतींहि कारणें दिलीं असल्यास तीं नमूद केलीं पाहिजेत ;

(फ) रकम (ड) अन्वयेंच्या परिशिष्टांत निर्दिष्ट केलेल्या सर्व जमिनींची व इमारतींची, आणि सदरहू योजना अमलांत आणतांना कोणताहि एखादा नवीन स्ट्रीट करणें असल्यास त्याच्या मांडणीच्या प्रत्येक बाजूपासून ८० फूट अंतराच्या आत ज्या जमिनी व इमारती सर्वांशीं किंवा अंशतः असतील त्या सगळ्या जमिनींची व इमारतींची जी किंमत, मागच्या सरकारी सालाबदलच्या कामिशनराच्या असेसमेंटबुकांत, आकारणीस पात्र ह्मणून दाखल केली असेल ती किंमत दाखविणारें परिशिष्ट ; आणि

(ग) बोर्डास जरूर वाटेल तो पुरावा.

मंजुरी मिळाल्यावर, घ्यावयाच्या जमिनीची तपशीलवार माहिती देऊन इकरार प्रसिद्ध करणें आणि तो इकरार प्रसिद्ध झाल्यावर बोर्डानें योजना अमलांत आणण्याच्या कामास लागणें.

३१. (१) सरकारची मंजुरी मिळाल्यावर, चेअरमनानें एका इकरारांत सदरहू मंजुरी मिळाल्याची गोष्ट लिहून व सदरहू योजनेच्या कारणांसाठीं बोर्डानें घ्यावयाची योजलेली जमीन सार्वजनिक कामासाठीं पाहिजे आहे असें लिहून तो इकरार, सरकारचे सेक्रेटरी यांच्या सहीनें प्रसिद्ध केला जाण्यासाठीं पाठविला पाहिजे.

सदरहू इकरार मुंबई सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध केला पाहिजे आणि त्यांत घ्यावयाची योजलेली जमीन कोणत्या हद्दींच्या आंत आहे, ती कोणत्या कारणासाठीं पाहिजे आहे, तिचें सरासरी क्षेत्रफळ किती आहे, आणि कोणत्या जागीं त्या जमिनीचा प्लान तपासून पाहतां येईल, या गोष्टी लिहिल्या पाहिजेत.

सदरहू इकरार हा, सदरहू जमीन सार्वजनिक कारणासाठीं जरूर असल्याबद्दलचा निरुत्तर पुरावा आहे असें समजावें, आणि बोर्डानें, सदरहू इकरार प्रसिद्ध झाल्यावर, सदरहू योजना अमलांत आणण्याच्या कामास लागलें पाहिजे.

बोर्डास, योजनेच्या कोणत्याहि भागांत फेरफार किंवा कंपेश करण्याचा अधिकार आहे.

(२) योजनेच्या कोणत्याहि भागांत एकादी सुधारणा करतां येईल असें बोर्डास कोणत्याहि वेळीं दिसून आल्यास, बोर्डास तशी सुधारणा करण्याच्या कारणासाठीं त्या योजनेंत फेरफार किंवा कंपेश करण्याचा अधिकार आहे, आणि या कलमाच्या पुढील दोन रकमांतील ठरावांस अनुसरून बोर्डानें तावडतोब, सदरहूप्रमाणें फेरफार किंवा कंपेश केलेली योजना अमलांत आणण्याच्या कामास लागलें पाहिजे.

जर फेरफार किंवा कंपेश केलेली योजना अमलांत आणण्याच्या नक्की खर्चाचा अंदाज, मंजूर झालेली योजना अमलांत आणण्याच्या नक्की खर्चाच्या अंदाजाबाहेर १,००० रुपयांच्या रकमेहून ज्यास्त होईल, तर बोर्डानें, सरकारची पूर्वी मंजुरी घेतल्यावांचून, फेरफार किंवा कंपेश केलेली योजना अमलांत आणण्याच्या कामास लागूं नये.

फेरफार किंवा कंपेश केलेल्या योजनेवरून, कलम ३० (ड) अन्वयें योजनेबरोबर असलेल्या परिशिष्टांत निर्दिष्ट केलेल्या जमिनीखेरीज इतर कोणतीहि जमीन, कबुलीशिवाय इतर रीतीनें, घ्यावयाची असल्यास, कलमें २९ व ३० यांतील आणि या कलमांतील ठराव, योजनेचा सदरहूप्रमाणें फेरफार किंवा कंपेश केलेला भागच योजना असती तर ज्या रीतीनें लागू झाले असते त्याच रीतीनें त्या फेरफार किंवा कंपेश केलेल्या भागास लागू आहेत असें समजावें.

## स्ट्रीटसंबंधी योजना.

बोर्डास, स्ट्रीट बनविण्याबद्दलची योजना करण्याचा अधिकार आहे.

३२. सदरहू शहराचा विस्तार वाढविण्याची तजवीज करण्याच्या, किंवा सदरहू शहराच्या कोणत्याहि भागांत हवा खेळण्याच्या साधनांतील उणीव दूर करण्याच्या, किंवा सदरहू शहराच्या निरनिराळ्या भागांच्या दरमियान व्यापारासंबंधानें दळणवळण ठेवण्याचीं साधनें व सोई हीं नवीन करण्याच्या अगर जीं विद्यमान असतील तीं वाढविण्याच्या कारणासाठीं, सदरहू शहराच्या कोणत्याहि भागांत नवीन स्ट्रीट बनविणें किंवा त्या भागांतील विद्यमान स्ट्रीटांमध्यें फेरफार करणें अगर त्यांची पुनः मांडणी करणें योग्य आहे असें जेव्हां जेव्हां बोर्डास वाटेल तेव्हां तेव्हां तशा मतलबाचा ठराव पसार करण्यास बोर्ड मुखत्यार आहे, आणि बोर्डानें तावडतोब स्ट्रीट बनविण्याची योजना तयार करावयास लागलें पाहिजे.

स्ट्रीट बनविण्याबद्दलच्या योजनेबरोबर कोणकोणती तपशीलवार माहिती असली पाहिजे.

३३. (१) स्ट्रीट बनविण्याबद्दलच्या योजनेबरोबर नकाशे व तपशीलवार माहिती असली पाहिजे, आणि तींत—

(अ) नवीन स्ट्रीट बनविण्याबद्दल, किंवा विद्यमान स्ट्रीटांत फेरफार करण्याबद्दल, ते रुंद करण्याबद्दल, वळविण्याबद्दल, उंच करण्याबद्दल, त्यांची पुनः मांडणी करण्याबद्दल अगर ते पुनः बांधण्याबद्दल तजवीज करण्याचा अधिकार आहे;

(ब) सदरील शेवटल्या रकमेच्या कारणांसाठीं लागणाऱ्या जमिनीखेरीज आणखी जी कोणतीहि जमीन, सदरहूप्रमाणें करण्याचा इरादा असलेल्या किंवा विद्यमान स्ट्रीटाच्या बाजूस किंवा त्या स्ट्रीटास लागून असेल व जी घेणें योग्य आहे असें बोर्डास वाटेल ती जमीन, तिजवर कोणत्याही इमारती असल्यास त्यांनिशीं, घेण्याबदल व ती जादा जमीन उंच व सपाट करण्याबदल तजवीज करण्याचा अधिकार आहे ;

(क) बोर्डास प्राप्त झालेल्या किंवा कोणत्याहि वेळीं प्राप्त होणाऱ्या कोणत्याहि जमिनी, इमारती बांधण्याच्या कारणासाठीं, उंच करण्याबदल, सपाट करण्याबद्दल अगर इतर रीतीनें आंखून देण्याबदल तजवीज करण्याचा अधिकार आहे ;

(ड) जे गरीब व मजुरी करणाऱ्या वर्गाचे लोक सदरहू योजनेच्या योगानें उघडे पडतील त्या सगळ्या किंवा त्यांतील कांहीं लोकांसह तशा वर्गाच्या लोकांसाठीं राहण्याचीं घरें बांधण्याबदल, आणि त्या कारणासाठीं लागणारी कोणतीहि जमीन घेण्याबदल, उंच करण्याबदल व सपाट करण्याबदल तजवीज करण्याचा अधिकार आहे.

(५) सदरहू योजनेंत, ज्या जमिनी घ्यावयाच्या असतील त्या निर्दिष्ट केल्या पाहिजेत.

३४. स्ट्रीट बनविण्याबदलची योजना पुरी झाल्यावर, कलमें २९, ३० व ३१ यांतील ठराव, ती योजना सुधारणेसंबंधी योजना असती तर ज्या रीतीनें लागू झाले असते त्याच रीतीनें ते, जरूर असलेल्या सर्व फेरफारांनिशीं, त्या योजनेस लागू आहेत असें समजावें. — स्ट्रीट बनविण्याबदलची योजना पुरी झाल्यावर काम चालविण्याची रीति.

## जमीन नवीन साध्य करण्यासंबंधी योजना.

३५. या आक्टाअन्वयें बोर्डास प्राप्त झालेल्या समुद्रकिनाऱ्याचा भाग असणारें कोणतेंहि क्षेत्र नवीन साध्य करणें या आक्टाच्या कारणांसाठीं योग्य आहे असें जेव्हां जेव्हां बोर्डास वाटेल तेव्हां तेव्हां बोर्ड, वर सांगितल्या प्रकारचें क्षेत्र नवीन साध्य करणें योग्य आहे असा ठराव पसार करण्यास मुखत्यार आहे, आणि बोर्डानें तावडतोब अशा क्षेत्राच्या संबंधानें जमीन नवीन साध्य करण्यासंबंधी योजना तयार करावयास लागलें पाहिजे. — जमीन नवीन साध्य करण्यासंबंधी योजना तयार करण्याचा बोर्डास अधिकार आहे.

३६. जमीन नवीन साध्य करण्यासंबंधी योजनेबरोबर नकाशे व तपशीलवार माहिती असली पाहिजे. आणि तींत— — जमीन नवीन साध्य करण्यासंबंधी योजनेबरोबर कोणकोणती तपशीलवार माहिती असली पाहिजे.

(अ) असें सगळें क्षेत्र किंवा त्याचा कोणताहि भाग नवीन साध्य करण्याबदल, खोदण्याबदल, कुडण्याबदल व उंच करण्याबदल तजवीज करण्याचा अधिकार आहे ;

(ब) नवीन साध्य करावयाचें क्षेत्र, स्ट्रीट बनवून, आंखून देण्याबदल तजवीज करण्याचा अधिकार आहे.

३७. जमीन नवीन साध्य करण्यासंबंधी योजना पुरी झाल्यावर, कलमें २९ (अ), ३० व ३१ यांतील ठराव, ती योजना सुधारणेसंबंधी योजना असती तर ज्या रीतीनें लागू झाले असते त्याच रीतीनें ते, जरूर असलेल्या सर्व फेरफारांनिशीं त्या योजनेस लागू आहेत असें समजावें. — जमीन नवीन साध्य करण्यासंबंधी योजना पुरी झाल्यावर काम चालविण्याची रीति.

## पोलीसाच्या राहण्याच्या वगैरे जागेसंबंधी योजना.

३८. इलाका पोलीसाच्या कोणत्याहि भागास राहण्याकरितां सदरहू शहराच्या कोणत्याहि भागांत राहण्याच्या वगैरे जागेची सोई करणें जरूर आहे असें बोर्डास सरकारकडून लिहून आलें म्हणजे बोर्डानें त्या लिहून आलेल्या मजकुराचा विचार केला — पोलीसाच्या राहण्याच्या वगैरे जागेसंबंधी योजना करण्याचा बोर्डास अधिकार आहे.

पाहिजे, आणि त्या कामासाठीं लागणाऱ्या पैशाच्या उत्पन्नाचें साधन आपल्यापाशीं असल्याबद्दल व तसें करणें इतर प्रकारें योग्य असल्याबद्दल बोर्डाची खात्री झाली तर बोर्डानें, तशा राहण्याच्या वगैरे जागांबद्दलची तजवीज करण्यासंबंधी योजना करणें अवश्य आहे अशा मतलबाचा ठराव केला पाहिजे आणि मग ताबडतोब पोलीसाच्या राहण्याच्या वगैरे जागेसंबंधी योजना करावयास लागलें पाहिजे.

पोलीसाच्या राहण्याच्या वगैरे जागेसंबंधी योजनेबरोबर कोणकोणती तपशीलवार माहिती असली पाहिजे.

(१) पोलीसाच्या राहण्याच्या वगैरे जागेसंबंधी योजनेबरोबर नकाशे व तपशीलवार माहिती असली पाहिजे, आणि तींत, अशा पोलीसाच्या कोणत्याहि किंवा सर्व वर्गांकरितां राहण्याचीं घरें व ( पोलीस स्वारांच्या घोड्यांसाठींचे तबेले धरून ) उपगृहें बांधण्याबद्दल व या कारणांसाठीं लागणारी कोणतीहि जमीन घेण्याबद्दल, उंच करण्याबद्दल व सपाट करण्याबद्दल तजवीज करण्याचा अधिकार आहे.

(२) सदर्हू योजनेंत, ज्या जमिनी घ्यावयाच्या असतील त्या निर्दिष्ट केल्या पाहिजेत.

पोलीसाच्या राहण्याच्या वगैरे जागेसंबंधी योजना पुरी झाल्यावर काम चालविण्याची रीति.

३९. पोलीसाच्या राहण्याच्या वगैरे जागेसंबंधी योजना पुरी झाल्यावर, कलमें २९, ३० व ३१ यांतील ठराव, ती योजना सुधारणेसंबंधी योजना असती तर ज्या रीतीनें लागू झाले असते त्याच रीतीनें ते, जरूर असलेल्या सर्व फेरफारांनिशीं, त्या योजनेस लागू आहेत असें समजावें.

इमारती पुऱ्या झाल्यावर त्या, सरकारास कित्येक शर्तींवर पट्ट्यानें देणें.

४०. (१) कलम ३९ अन्वयें बोर्डानें बांधलेली कोणतीहि इमारत पुरी झाल्यावर, ती इमारत, तिच्या घरठाणासहित, सरकारास बोर्डानें, ती इमारत बांधण्याच्या कामीं लागलेला पैका व सदरहू घरठाण घ्यावयास कांहीं खर्च लागला असेल तर तो खर्च हीं ज्या कर्जाऊ पैक्याचा भाग असतील तो कर्जाऊ पैका फेडण्यासाठीं नेमलेली मुदत पुरी झाल्यावर संपावयाचा अशा, दुरुस्तीच्या अटींनिशीं केलेल्या, पट्ट्यानें दिली पाहिजे, आणि सरकारानें, अशा पट्ट्याच्या मुदतींत दरसाल बोर्डास भाड्याच्या रूपानें (१) सदरहू इमारत व तिचें घरठाण यांच्या संबंधानें बोर्डानें द्यावयाच्या सर्व पट्ट्या व कर दिले पाहिजेत; आणि (२) सदरहू इमारत बांधण्याच्या कामीं झालेल्या खर्चाच्या संबंधानें व सदरहू इमारतीच्या सगळ्या घरठाणाची किंवा त्याच्या कोणत्याहि भागाची कोणतीहि जमीन घेण्यास कोणताहि खर्च आला असल्यास त्या खर्चाच्या संबंधानें बोर्डानें जें व्याज व कर्ज फेडण्याबद्दलचा फंड द्यावयाचा तो सर्व, सदरहू इमारतीचें काम पुरें होईपर्यंतचें व्याज व कर्ज फेडण्याबद्दलचा फंड यांसहित, आणि सदरहू जमिनीवर सदरहू इमारतीचें सगळें घरठाण किंवा त्याचा कोणताहि भाग असून त्या जमिनीचा (अ) परिशिष्ट क याच्या २ ऱ्या भागांत किंवा परिशिष्ट ड यांत निर्दिष्ट केलेल्या जमिनींत समावेश झालेला असल्यास अगर (ब) ती जमीन कलम ९३ (३) अन्वयें बोर्डास प्राप्त झालेली असल्यास, अशा सदरीं शेवटीं सांगितलेल्या जमिनीची जी किंमत कलेक्टरानें, सदरहू (अ) बाबतींत सदरहू परिशिष्टाच्या ७ व्या आसनांत जी जमीन निर्दिष्ट केली आहे त्या जमिनीस लागू असणाऱ्या दराकडे, व सदरहू (ब) बाबतींत ६१ व्या कलमाअन्वयें ठरविलेल्या रकमेकडे लक्ष्य देऊन, ठरवावयाची त्या किंमतीवर दर शेंकडा ३ टक्के दिले पाहिजेत.

(२) अशा कोणत्याहि पट्ट्याची मुदत संपल्यावर, त्यांत नमूद केलेली इमारत सर्वस्वी सरकारास प्राप्त होईल, आणि मग ताबडतोब, सदरहू इमारतीचें सगळें घरठाण किंवा त्याचा कोणताहि भाग ज्या जमिनीवर असेल ती जमीन—

(अ) त्या जमिनीचा, क परिशिष्टाच्या २ ऱ्या भागांत निर्दिष्ट केलेल्या जमिनींमध्यें समावेश केलेला असल्यास, किंवा तिचा त्याप्रमाणें जेथवर समावेश केला असेल तेथवर, अगर ती जमीन कलम ९३ (३) अन्वयें बोर्डास प्राप्त झालेली जमीन असल्यास, सरकारास पुनः प्राप्त झाली पाहिजे,

आणि त्या जमिनीच्या संबंधानें ९९ व्या कलमाअन्वयें बोर्डानें कोणतेंहि मुदत कर्ज देणें असल्यास तें व त्या जमिनीच्या संबंधानें ६१ व्या कलमाअन्वयेंची बोर्डाची जबाबदारी हीं त्या मानानें कमी झाली पाहिजेत.

(ब) त्या जमिनीचा, ड परिशिष्टांत निर्दिष्ट केलेल्या जमिनींमध्यें समावेश केलेला असल्यास, किंवा तिचा त्याप्रमाणें जेथवर समावेश केला असेल तेथवर, बोर्डानें, ९३ व्या कलमाअन्वयें बोर्डास ती जमीन जेवढ्या मुदतीपर्यंत प्राप्त झालेली असेल तेवढ्या मुदतीच्या बाकी राहिलेल्या अवधीपर्यंत सरकारास पट्ट्यानें दिली पाहिजे, आणि सरकारानें त्या जमिनीच्या संबंधानें बोर्डास त्या वेळीं ठरेलतें वार्षिक भाडें दिलें पाहिजे.

(क) ती जमीन बोर्डानें घेतलेली असल्यास, व ती जेथवर घेतलेली असेल तेथवर, सरकारास प्राप्त होईल.

## साधारण

४१. (१) कोणताहि नवीन स्ट्रीट गाड्यांच्या रहदारीसाठीं केला असल्यास तो ४० फुटांहून, व फक्त पायरस्त्याच्याच रहदारीसाठीं केला असल्यास २० फुटांहून, कमी रुंद असतां कामा नये. — नवीन स्ट्रीटांची कमींत कमी रुंदी.

मात्र इतकेंच कीं एकाद्या सुधारणेसंबंधीं किंवा स्ट्रीटासंबंधीं किंवा जमीन नवीन साध्य करण्यासंबंधीं योजनेंत, जेथें जेथें स्ट्रीटच्या सगळ्या लांबीपर्यंत त्याच्या एका किंवा दोन्हीं बाजूंस अखंड बगीच्या करण्याची किंवा अखंड खुली जागा ठेवण्याची तजवीज, अशा जागेवर इमारती बिलकुल बांधावयाच्या नाहींत या शर्तीवर, केली असून अशा बगीच्याच्या किंवा खुल्या जागेच्या रुंदीसह त्या स्ट्रीटच्या दोन्ही बाजूंच्या इमारतींच्या दरमियानच्या जागेची एकंदर रुंदी ४० फुटांहून कमी नसेल, तेथें तेथें अशा इमारतींच्या दरमियानचा स्ट्रीट गाड्यांच्या रहदारीसाठीं केला असल्यास तो २० फुटांहून कमी, व फक्त पायरस्त्याच्याच रहदारीसाठीं केला असल्यास १० फुटांहून ज्यास्त, रुंद असण्याची गरज नाहीं. — स्ट्रीटच्या एका किंवा दोन्ही बाजूंस बगीचा किंवा खुल्या जागा ठेवल्या असतील त्या प्रसंगीं विशेष ठराव.

(२) बोर्डानें बनविलेला कोणताहि स्ट्रीट सरकारानें मंजूर केलेल्या कोणत्याहि योजनेच्या प्लानामध्यें ठरविलेल्या रीतीनें योग्य प्रकारें सपाट केला आहे, त्यास फरसबंदी केली आहे, त्यावर खडी घातली आहे, त्यावर नळ घातले आहेत, त्यांतील पाणी काढून टाकलें आहे, व त्यास गटर केले आहेत अशी आणि त्यांत दिवे लावण्याकरितां जे फाणस, फाणसांचे खांब व इतर सामान कमिशनराच्या मतें जरूर असेल त्या फाणसांची, फाणसांच्या खांबांची व इतर सामानाची बोर्डानें तजवीज केली आहे अशी कमिशनराची खात्री झाल्यावर कमिशनरानें तो स्ट्रीट सार्वजनिक स्ट्रीट आहे असें जाहीर केलें पाहिजे आणि मग तो स्ट्रीट कार्पोरेशनास प्राप्त झाला पाहिजे व त्यानंतर पुढें कार्पोरेशननें तो स्ट्रीट व्यवस्थित ठेवला पाहिजे, तो दुरुस्त ठेवला पाहिजे, त्यांत दिवे लावले पाहिजेत व तो साफसूफ केला पाहिजे. — स्ट्रीट पुरे झाल्यावर ते कार्पोरेशनला प्राप्त होणें व कार्पोरेशननें व्यवस्थित ठेवणें.

(३) सदरहू शहराच्या कोणत्याहि भागांत हवा खेळण्यासाठीं ठेविलेली व या बाबीअन्वयें मंजूर केलेल्या कोणत्याही योजनेचा भाग ह्मणून बोर्डानें ठरविलेली कोणतीहि खुली जागा पुरी झाल्यावर ती कार्पोरेशनच्या खर्चानें व्यवस्थित ठेवली जाण्यासाठीं कमिशनरास तवदील करून दिली पाहिजे, आणि मग ती सदरहू कार्पोरेशनास प्राप्त झाली पाहिजे. — हवा खेळण्यासाठीं राखलेल्या खुल्या जागा कार्पोरेशनास प्राप्त होणें व कार्पोरेशननें व्यवस्थित ठेवणें.

मात्र असें ठरविलें आहे कीं कमिशनरानें बोर्डास अशी कोणतीहि खुली जागा, सदरहूप्रमाणें तवदील करून देण्यांत येण्यापूर्वी, जरूर असल्यास कुडण्याविषयीं आणि जरूर

असल्यास त्या जागेंत दिवे लावण्याकरितां फाणसांची किंवा इतर सरंजामाची तजवीज करण्याविषयीं सांगावें.

या कलमाअन्वयेंच्या वादांचा निकाल सरकारानें करणें.

(४) या कलमांतील कोणत्याहि ठरावाच्या संबंधानें बोर्ड व कमिशनर यांच्या दरमियान कोणताहि वाद उत्पन्न झाल्यास त्याचा निकाल सरकारानें केला पाहिजे, व तो निकाल अखेरचा आहे असें समजलें पाहिजे.

## जमीन घेणें.

बोर्डास कबुलायत करून जमीन घेण्याचा अधिकार आहे.

४२. या आक्टांतील ठरावांस पात्र राहून बोर्डास, या आक्टाच्या कारणांसाठीं बोर्डाला जरूर असलेल्या कोणत्याहि जमिनींच्या, किंवा जमिनींतील कोणत्याहि हितसंबंधाच्या, मालकांशीं अशा जमिनी किंवा जमिनींतील कोणताहि हितसंबंध विकत घेण्याच्या संबंधानें कबुलायत करण्याचा अधिकार आहे असें समजावें.

जमीन घेण्याविषयींचा आक्ट कबुलायत केल्याशिवाय इतर रीतीनें जमीन घेण्याच्या बाबतीस कोठपर्यंत लागू असला पाहिजे.

४३. सन १८९४ चा जमीन घेण्याविषयींचा आक्ट (यास या कलमांत सदरहू आक्ट असें ह्मटलें आहे) यांत कसाहि ठराव असला तथापि सदरहू आक्ट या आक्टाअन्वयें जमीन घेण्याच्या बाबतीस जेवढा लागू आहे ह्मणून अ परिशिष्टांत सांगितलें आहे त्याहून ज्यास्त लागू होतां नये, परंतु सदरहू आक्टावरून, सदरहू परिशिष्टांत सांगितलें आहे तेथवर, कबुलायत केल्याशिवाय इतर रीतीनें जमीन घेण्याच्या बाबतीचें नियमन झालें पाहिजे व तो तेथवर त्या बाबतीस लागू असला पाहिजे, आणि त्या कारणासाठीं तो, तेथवर, या आक्टांत सामील केला असल्याप्रमाणें या आक्टाच्या या भागाचा भाग आहे असें मानलें पाहिजे; मात्र तो या आक्टाच्या या भागांतील ठरावांस व खालीं सांगितलेल्या ठरावांस पात्र असला पाहिजे (ह्मणजे):—

(१) सदरहू आक्टाच्या कोणत्याहि कलमावर दिलेला हवाला, या आक्टाच्या या भागांतील ठरावांवरून सदरहू कलम ज्याप्रमाणें कंपेश केलेलें असेल त्याप्रमाणें त्या कलमावर दिला आहे असें मानलें पाहिजे.

(२) सदरहू आक्टाच्या ४ थ्या कलमाचें पोट-कलम (२) व या आक्टाच्या या भागांतील ठराव यांचा अर्थ करतेवेळीं, सदरहू पोट-कलमांतील ठराव, या आक्टाच्या कारणांसाठीं, या आक्टाच्या २९ व्या, ३२ व्या ३९ व्या किंवा ३८ व्या कलमाअन्वयें एकादा ठराव पसार करण्यांत आला ह्मणजे लगेच लागू होतात असें समजलें पाहिजे, आणि बोर्ड हें स्थानिक सरकार व २४ तासांची नोटीस ही ७ दिवसांची नोटीस आहे असें मानलें पाहिजे.

(३) सदरहू आक्टाचीं सदरीं निर्दिष्ट केलेलीं कलमें व या आक्टाच्या या भागांतील ठराव यांचा अर्थ करतेवेळीं, या आक्टाच्या ३१ व्या, ३४ व्या, ३७ व्या किंवा ३९ व्या कलमाअन्वयें इकरार छापून प्रसिद्ध करणें हें सदरहू आक्टाच्या ६ व्या कलमाअन्वयें इकरार छापून प्रसिद्ध करणें आहे असें मानलें पाहिजे.

(४) सदरहू आक्टाचें कलम ९ (२) व कलम १० आणि या आक्टाच्या या भागांतील ठराव यांचा अर्थ करतेवेळीं ७ दिवसांची मुदत ही १९ दिवसांची मुदत आहे असें मानलें पाहिजे.

बोर्डास जमीन घेण्याविषयींच्या आक्टाअन्वयें स्थानिक अधिकारी मानलें पाहिजे.

(५) सदरहू आक्टाच्या ५० व्या कलमाचें पोट-कलम (२) व या आक्टाच्या या भागांतील ठराव यांचा अर्थ करतेवेळीं बोर्ड हा संबंध असलेला स्थानिक अधिकारी किंवा कंपनी आहे असें मानलें पाहिजे.

कोर्टाचें काम करण्यासाठीं अपील ऐकून घेणाऱ्या न्यायसभेची रचना.

(६) (अ) या आक्टाच्या या भागाच्या कारणांसाठीं सदरहू आक्टाअन्वयें कोर्टाचीं कामें करण्यासाठीं यांत पुढें सांगितलेल्या रीतीनें अपील ऐकून घेणाऱ्या एका न्यायसभेची रचना केली पाहिजे, आणि सदरहू

आक्टाचा व या आक्टाच्या या भागांतील ठरावांचा अर्थ करतेवेळीं ती न्यायसभा ही कोर्ट आहे असें मानलें पाहिजे, आणि त्या न्यायसभेनें केलेला फैसला किंवा, मतभेद पडला असेल त्या प्रसंगीं त्या न्यायसभेंतील निमेहून जास्त सभासदांनीं केलेला फैसला हा कोर्टाचा फैसला आहे असें मानलें पाहिजे, आणि तो फैसला, यांत पुढें दिलेल्या अपील करण्यासंबंधी ठरावांस अनुसरून, अखेरचा असला पाहिजे व त्या न्यायसभेचा अध्यक्ष हा जज्ज आहे असें मानलें पाहिजे.

(ब) कायदा व काम चालविण्याची रीति यांसंबंधी सर्व प्रश्नांचा निकाल करण्याचें काम प्रत्येक बाबतींत फक्त अध्यक्षाच्याच हातीं राहिलें पाहिजे.

(क) अशा अपील ऐकून घेणाऱ्या न्यायसभेंत तीन सभासद, ह्मणजे एक अध्यक्ष ( हा मुद्दाम नेमलेला ज्युडिशियल अमलदार असावा) आणि दोन असेसर असले पाहिजेत. अध्यक्ष व एक असेसर यांना सरकारानें, मुंबई सरकारी ग्याझेटांत जाहीरनामा प्रसिद्ध करून, नेमिलें पाहिजे; दुसऱ्या असेसरास कार्पोरेशननें नेमिलें पाहिजेः मात्र इतकेंच कीं जो कोणताहि मनुष्य या आक्टाअन्वयें ट्रस्टी असेल किंवा जो १६ व्या कलमांतील ठरावांत सांगितलेल्या कारणावरून, ट्रस्टी असण्यास नालायक झाला असेल तो सदरहू न्यायसभेचा सभासद होण्यास नालायक आहे असें समजावें.

(ड) अपील ऐकून घेणाऱ्या न्यायसभेच्या सभासदांना एका वर्षाच्या मुदतीसाठीं नेमलें पाहिजे आणि असा कोणताहि सभासद पुनः नेमला जाण्यास लायक आहे असें समजावें.

(इ) अपील ऐकून घेण्याऱ्या न्यायसभेच्या कोणत्याहि सभासदास, तो असमर्थ असल्यामुळें, त्याच्या गैरवर्तणुकीमुळें किंवा दुसऱ्या चांगल्या व वाजवी कारणामुळें, हुद्यावरून दूर करणें सरकारास योग्य वाटल्यास त्याला हुद्यावरून दूर करण्याचा सरकारास अधिकार आहे.

(फ) अपील ऐकून घेणाऱ्या न्यायसभेंत कोणतीहि जागा खालीं झाली ह्मणजे, किंवा त्या सभेचा कोणताहि सभासद, अजारीपणामुळें किंवा दुसऱ्या अनिवार्य कारणामुळें, कांहीं काळपर्यंत गैरहजर राहिला असेल त्या मुदतींत, ( प्रसंगाप्रमाणें ) सरकार किंवा कार्पोरेशन यांपैकीं ज्या कोणी, त्या न्यायसभेच्या ज्या सभासदाची जागा खालीं झाली असेल त्या सभासदास, नेमला होता त्यानें तावडतोब, ज्याची जागा खालीं झाली असेल त्या सभासदाच्या जागीं किंवा सदरीं सांगितल्याप्रमाणें कांहीं काळपर्यंत गैरहजर राहिलेल्या सभासदाच्या जागीं त्या न्यायसभेचा (कांहीं काळापुरता किंवा कायमचा) सभासद ह्मणून एकाद्या योग्य मनुष्यास नेमिला पाहिजे.

(ग) न्यायसभेच्या प्रत्येक सभासदास, सरकार वेळोवेळीं ठरवील त्याप्रमाणें, माही पगाराच्या रूपानें किंवा फीच्या रूपानें अगर अंशतः माही पगाराच्या रूपानें व अंशतः फीच्या रूपानें, मुशाहिरा मिळण्याचा हक्क आहे असें समजावें.

(ह) रकम (ग) हींत सांगितलेला मुशाहिरा, व विशेष जरूरी असलेल्या कोणत्याहि कारकुनांच्या एस्टाब्लिशमेंटाचा किंवा इतर एस्टाब्लिशमेंटाचा खर्च हीं बोर्डानें दिलीं पाहिजेत.

(आय्) अपील ऐकून घेणाऱ्या न्यायसभेचा कोणताहि हुकुम हें कोर्ट, तो हुकुम त्या कोर्टाचा असता तर त्या कोर्टानें तो ज्याप्रमाणें अमलांत आणला असता त्याप्रमाणें, अमलांत आणण्यास मुख़्त्यार आहे.

(के) अपील ऐकून घेणाऱ्या न्यायसभेनें देवविलेल्या नुकसानीच्या मोबदल्याचा ऐवज रु. ९,००० यांहून जास्त असेल त्या सर्व बाबतींत, किंवा ज्या बाबतींत अपील होणें योग्य आहे असें अध्यक्षानें सर्टिफिकिट दिलें असेल तशा कोणत्याहि बाबतींत, न्यायसभेच्या फैसल्यावर किंवा त्याच्या कोणत्याहि भागावर, त्या फैसल्यांत किंवा त्याच्या कोणत्याहि भागांत,

(१) देवविलेला नुकसानीचा मोबदला घेण्याचा कोणत्याहि विशेष मनुष्याचा किंवा मनुष्यांचा हक्क ठरविला असेल, अगर

(२) हितसंबंध असलेल्या मनुष्यांना नुकसानीचा मोबदला कसकसा वांटून द्यावा तें ठरविलें असेल

तितक्याच पुरतें हें कोर्टास अपिल चालेल.

नुकसानीच्या मोबदल्याच्या संबंधानें विशेष ठराव.

(७) या आक्टाअन्वयें घेतलेल्या कोणत्याहि जमिनीबदल किंवा इमारतीबदल द्यावयाच्या नुकसानीच्या मोबदल्याचा ऐवज ठरवितेवेळीं, आणखी खालीं दिलेले ठराव लागू आहेत असें समजावें:—

(अ) जमीन घेतल्यामुळें, किंवा इमारत घेतल्यामुळें अगर पाडल्यामुळें, हितसंबंध असलेल्या मनुष्याच्या दुसऱ्या कोणत्याहि जमिनीची किंवा इमारतीची किंमत कांहीं वाढेल किंवा कसें या गोष्टीचा कोर्टानें विचार केला पाहिजे.

(ब) सुधारणेसंबंधी किंवा स्ट्रीटासंबंधी योजना केली असल्याची गोष्ट नमूद करून या आक्टाच्या २९ व्या किंवा ३४ व्या कलमाअन्वयें नोटीस प्रसिद्ध केल्याच्या तारखेनंतर जमीन किंवा इमारत वाढविली असेल किंवा तींत कोणतीहि सुधारणा केली असेल तेव्हां जें कांहीं वाढविलें असेल किंवा जी कांहीं सुधारणा केली असेल (ती, सदरहू इमारत योग्य रीतीनें चांगल्या स्थितींत ठेवण्यासाठा नसेल तर,) तिचा समावेश करूं नये व सदरहू तारखेनंतर घेतलेल्या कोणत्याहि व्याजाच्या बाबतींत, सदरहू जमीनीबदल किंवा इमारतीबद्दल द्यावयाच्या नुकसानीच्या मोबदल्यांचा ऐवज वाढविण्यासाठीं म्हणून त्याच्या किंमतीचें कोणतेंहि निराळें अंदाजपत्रक करूं नये.

(क) या आक्टाच्या २९ व्या किंवा ३४ व्या कलमाअन्वयें इमारतीच्या संबंधाचा इकरार छापून प्रसिद्ध करण्याच्या तारखेरोजीं त्या इमारतीच्या बाजारांत येणाऱ्या, किंमतीचा अंदाज काढतेवेळीं कोर्टानें, मिळकतीचा प्रकार व तिची त्या वेळची स्थिती, आणि ती इमारत त्या वेळच्या स्थितींत आणखी सुमारें किती काळपर्यंत राहील तें याकडे, आणि ती दुरुस्त आहे किंवा कसें याकडे व या पोट-कलमाच्या रकमा (ड), (इ) व (फ) यांतील ठरावांकडे योग्य लक्ष्य पुरविलें पाहिजे.

(ड) जमिनीच्या किंवा इमारतीच्या मालकानें, ३१ व्या किंवा ३४ व्या कलमाअन्वयें इकरार छापून प्रसिद्ध करण्यांत आल्याच्या तारखेपूर्वील चोवीस महिन्यांच्या आंत सदरहू म्युनिसिपल आक्टाच्या १९९ व्या कलमाअन्वयें, त्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या भाड्याचें पत्रक केलेलें

असेल तेव्हां त्या जमिनीचें किंवा इमारतीचें भाडें अशा कोणत्याहि प्रसंगीं अशा पत्रकांतील रकमेपेक्षां ज्यास्त आहे असें मानूं नये.

(इ) जमीन किंवा इमारत एकाद्या गैरकायदेशीर कामासाठीं वापरण्यांत येत असल्याच्या, किंवा तींत राहणाऱ्या मनुष्यांच्या आरोग्यास भयप्रद किंवा अपायकारक होई अशा प्रकारें तींत फाजील गर्दी झालेली असल्याच्या, कारणानें तिचें भाडें वाढलेलें आहे असें कोर्टास वाटल्यास, तिचें भाडें, ती जमीन किंवा इमारत फक्त कायदेशीर कामासाठींच वापरली असती, किंवा जितक्या माणसांपुरती तींत फाजील गर्दी केली नाहीं तर निर्धास्तपणें राहण्याच्या जागेची सोई असेल तितकींच फक्त माणसें तींत राहिलीं असतीं तर जें भाडें आलें असतें, त्या भाड्याहून ज्यास्त आहे असें मानूं नये.

(फ) इमारतीची आरोग्यरक्षणसंबंधी स्थिती असावी तशी नाहीं किंवा ती इमारत वाजवी प्रकारें चांगली दुरुस्त नाहीं असें कोर्टास वाटल्यास नुकसानीच्या मोबदल्याची रकम, ती इमारत आरोग्यरक्षणसंबंधी स्थितींत आणल्यानंतर किंवा वाजवी प्रकारें चांगली दुरुस्त केल्यानंतर तिची जी किंमत आकारण्यांत येईल त्या किंमतींतून ती इमारत सदरहू स्थितींत आणण्याचा किंवा सदरहूप्रमाणें दुरुस्त करण्याचा अंदाजलेला खर्च कमी करून जी रकम बाकी राहील त्या रकमेहून ज्यास्त असूं नये.

(ग) जी इमारत मनुष्यांच्या वस्तीसाठीं वापरण्यांत येत असेल किंवा वापरण्याचा इरादा अगर संभव असेल ती इमारत मनुष्यांच्या वस्तीसाठीं वाजवी रीतीनें कायम करतां येण्यासारखी नाहीं असें कोर्टास वाटल्यास नुकसानीच्या मोबदल्याची रकम, तिच्या सामानाच्या किंमतींतून ती इमारत पाडून टाकण्याचा खर्च वजा करून जी रकम बाकी राहील त्या रकमेहून ज्यास्त असूं नये.

४४ कलेक्टरानें सन १८९४ च्या जमीन घेण्याविषयींच्या आक्टाच्या ११ व्या कलमाअन्वयें व या आक्टाच्या या भागांतील ठरावांअन्वयें निवाडा दिला ह्मणजे त्यास जमिनीचा कबजा घेण्याचा अधिकार आहे, आणि मग ती जमीन सर्वस्वी मलिकामाआझमांस, सर्व प्रकारच्या बोजांरहित, प्राप्त झाली पाहिजे, आणि कलेक्टरानें, ती घेण्याचा खर्च देण्यांत आला असतां व ती जमीन घेण्याबदल जो कोणताहि आणखी खर्च करण्यांत आला असेल तो खर्च देण्याचें बोर्डानें कबूल केलें असतां, ती जमीन बोर्डास तबदील करून दिली पाहिजे आणि मग ती जमीन बोर्डास प्राप्त झाली पाहिजे. (कलेक्टरानें निवाडा दिल्या-नंतर जमीन कबज्यांत घेणें व ती बोर्डास तबदील करून देणें.)

### ४.—कर्ज काढण्याचे अधिकार.

४५. बोर्डास, वेळोवेळीं, हिंदुस्थानचे सेक्रेटरी ऑफ् स्टेट इन् कौन्सिल यांजकडून किंवा हिंदुस्थान सरकारची पूर्वीं मंजूरी घेऊन कोणत्याहि इतर मनुष्याकडून, हा आक्ट अमलांत आणण्याच्या कामीं बोर्डानें केलेला किंवा त्यास करावयाचा असलेला कोणताहि खर्च अगर बोजा अदा करण्याच्या कारणासाठीं जरूर असलेली, ६९व्या कलमाअन्वयें खर्चाच्या बाजूची जी शिलक भांडवलाच्या खातीं लिहावयाची ती शिलक धरून, कोणतीहि रकम व्याजानें कर्जी काढण्याचा, पुनः कर्जी काढण्याचा व घेण्याचा अधिकार आहे. (सरकाराकडून किंवा इतर मनुष्यांकडून कर्ज काढण्याचा अधिकार.)

४६. सदरील शेवटच्या कलमाअन्वयें हिंदुस्थानचे सेक्रेटरी ऑफ् स्टेट इन् कौन्सिल खेरीज करून इतर कोणत्याहि मनुष्याकडून बोर्डानें पैका काढण्याच्या कामास सरकारची मंजूरी मिळाली असेल तेव्हां तेव्हां सरकारानें, हिंदुस्थान सरकारची पूर्वीं (इतर मनुष्यांकडून पैका कोणत्या रीतीनें कर्जी काढावा तें सरकारानें फर्मावणें.)

मंजुरी घेऊन, तो पैका कोणत्या रीतीनें काढावयाचा ती रीति फर्माविली व नेमून दिली पाहिजे.

डिबेंचरें काढून कर्जी काढलेल्या पैक्यावरील व्याजाचा बोजा, सेक्रेटरी ऑफ स्टेट किंवा कार्पोरेशन यांना येणें असलेल्या व्याजाच्या बोजापूर्वी होणें.

४७. जर असा पैका, ज्यांचेवर व्याज चालावयाचें असे डिबेंचर काढून काढला असेल तर बोर्डाच्या महसुलावर अशा व्याजाचा बोजा, ६९ व्या कलमाअन्वयें हिंदुस्थानचे सेक्रेटरी ऑफ् स्टेट इन् कौन्सिल यांना किंवा कार्पोरेशनाला द्यावयाच्या व्याजाबद्दलच्या बोजाच्या अगोदर पडला पाहिजे.

कर्जी काढलेला पैका फेडण्यासाठीं त्याबद्दलच्या फंडाची तजवीज करणें.

४८. बोर्डानें, वरील कलमांतील ठरावांअन्वयें कर्जी काढलेला पैका, मुदलाच्या किंवा मुदल व व्याज यांच्या सालीना किंवा साहामाही समान हप्त्यांनीं फेडला पाहिजे, अगर जेवढी रकम किंवा रकमा चक्रवाढ व्याजानें सांचवीत गेलें असतां, मंजूर झालेल्या मुदतीच्या आंत, सर्व प्रकारचे खर्च भागून, सदरहूप्रमाणें कर्जी काढलेला पैका फेडण्यास बस होतील तेवढी रकम किंवा रकमा त्यांणीं, कर्ज फेडण्यासाठींचा फंड म्हणून, दरसाल निराळ्या ठेविल्या पाहिजेत व ती रकम किंवा रकमा, सरकारी सिक्यूरिटी विकत घेण्याच्या कामास लावून, चक्रवाढ व्याजानें सांचविल्या पाहिजेत.

कर्ज फेडण्याबद्दलचे फंड सरकारी सिक्यूरिटी घेण्याच्या कामीं लावण्यासाठीं ठरविलेल्या तारखा.

४९. कर्ज फेडण्याबद्दलच्या फंडाच्या मुद्दलाचा भाग म्हणून निराळी ठेवलेली कोणतीही रकम प्रत्येक वर्षास किंवा प्रत्येक अर्ध्या वर्षास व्याजू लावणें ती, ज्या कर्जाच्या फेडीसाठीं असा फंड स्थापन केला असेल त्या कर्जाच्या संबंधानें बोर्डानें ज्या तारखेस व्याज द्यावयाचें त्या तारखेनंतर १९ दिवसांच्या आंत लाविली पाहिजे; आणि आधींच व्याजू लाविलेल्या, कर्ज फेडण्याबद्दलच्या फंडांतील, पैक्यावरील व्याजाबद्दल बोर्डास मिळालेली कोणतीही रकम, तें व्याज मिळालेल्या दिवसापासून एक महिन्याचे आंत व्याजू लाविली पाहिजे.

कर्जे कोणत्या मुदतींत फेडावीं.

५०. कोणत्याही प्रसंगीं, कोणतेंही कर्ज फेडण्याची मुदत साठ वर्षांहून ज्यास्त असूं नये आणि पूर्वींचें कर्ज फेडण्याच्या कारणासाठीं पैका कर्जी काढला असेल तेव्हां, याप्रमाणें कर्जी काढलेला पैका ज्या वेळीं फेडावयाचा ती वेळ, हिंदुस्थान सरकारच्या मंजुरीवांचून, मूळ कर्ज ज्या मुदतीपर्यंत मंजूर केलेलें असेल त्या मुदतीच्या बाकी राहिलेल्या अवधीपेक्षां ज्यास्त होऊं नये.

सिक्यूरिटींचा नमुना.

५१. डिबेंचर काढून बोर्डानें पैका काढला असेल तेव्हां, ते डिबेंचर व परिशिष्टाच्या नमुन्याप्रमाणें, किंवा सरकारची पूर्वी मंजुरी घेऊन जो दुसरा नमुना बोर्ड वेळोवेळीं ठरवील त्या दुसऱ्या नमुन्याप्रमाणें असले पाहिजेत.

व परिशिष्टाच्या नमुन्याप्रमाणें, किंवा या कलमाअन्वयें योग्य रीतीनें अधिकार दिलेल्या कोणत्याही नमुन्याप्रमाणें, असलेला कोणताही डिबेंचर धारण करणारास त्या डिबेंचराच्याबद्दल, बोर्ड वेळोवेळीं ठरवील त्या शर्तींनिशीं, सदरहूप्रकारें अधिकार मिळालेल्या कोणत्याही इतर नमुन्याप्रमाणें असलेला डिबेंचर मिळण्यास हरकत नाहीं.

बोर्डानें काढलेला प्रत्येक डिबेंचर खालीलप्रमाणें तबदील करून देण्याचा अधिकार आहे,—

(अ) तो व परिशिष्टाच्या नमुन्याप्रमाणें असल्यास त्याजवर शेरा लिहून, आणि

(ब) तो इतर कोणत्याही नमुन्याप्रमाणें असल्यास त्यांत जी रीति स्पष्टपणें सांगितली असेल त्या रीतीनें.

या कलमाअन्वयें डिबेंचर काढून काढलेल्या पैक्याच्या संबंधानें दावा करण्याचा हक्क, अशा डिबेंचरांपैकीं कांहीं डिबेंचरांची तारीख इतर डिबेंचरांच्या तारखेहून अगोदरचीः आहे या कारणामुळें कोणत्याही प्रकारें आवडनिवड न करतां, त्या त्या काळीं त्या त्या डिबेंचरांच्या धारणकरणारांस आहे असें समजावें.

९२. कलम ४९ यांत कसाही ठराव असला तथापि बोर्डास कोणत्याही ब्यांके-कडून, ४९ व्या कलमाअन्वयें मंजूर केलेल्या कोणत्याही कर्जाच्या रकमेंपर्यंत नगदी हिशेबाच्या खातीं–हा हिशेब बोर्डाच्या नांवानें अशा ब्यांकेशीं सुरू करून चालू ठेवावयाचा–उधार पैका घेण्याचा अधिकार आहे; आणि अशा नगदी हिशेबाच्या खातीं वेळोवेळीं किंवा अगाऊ दिलेल्या अशा उधार पैक्याची रकम किंवा त्याप्रमाणें दिलेल्या रकमा, त्यांवरील व्याजासुद्धां, फेडण्यासाठीं तारण ह्मणून, बोर्डास प्राप्त झालेल्या किंवा प्राप्त होणाऱ्या अगर बोर्डाच्या जमिनी व मिळकत, या आक्टाच्या ठरावांस पात्र राहून, गहाण ठेवण्याचा अधिकार आहे.

सरकारानें मंजूर केलेल्या कोणत्याही कर्जाच्या रकमेपर्यंत ब्यांकांकडून पैका अगाऊ घेण्याचा बोर्डास अधिकार असणें.

## ९.—मिळकत व जबाबदाऱ्या.

### बोर्डास मिळकत तबदील करून देणें.

९३. कलम १० अन्वयें जाहीरनामा छापून जी तारीख प्रसिद्ध करण्यांत येईल ती तारीख झाल्यावर लगेच या आक्टाच्या कारणासाठीं बोर्डास खालीं सांगितलेल्या गोष्टी प्राप्त झाल्या पाहिजेतः—

बोर्डास प्राप्त झालेल्या मिळकतीचा तपशील.

(१) क परिशिष्टाच्या १ ल्या भागांत ज्या कित्येक जमिनी निर्दिष्ट केल्या असून ठेविलेल्या प्लानांत दाखविल्या आहेत त्या जमिनींतील मलिका माअफ़मा यांची सर्व एस्टेट, हक्क, वारसा व हितसंबंध;

सरकारी रिकाम्या जमिनी खुल्या जागांप्रमाणें राखून ठेविणें.

मात्र असें ठरविलें आहे कीं—

(१) या पोट-कलमांत ठरविलें आहे त्या प्रसंगीं खेरिज करून बोर्डानें कोणत्याही वेळीं, सदरहू जमिनींवर किंवा त्यांच्या कोणत्याही भागावर इमारत बांधूं नये किंवा कोणत्याही प्रकारें अतिक्रमण करूं नये अगर कोणत्याही दुसऱ्या मनुष्यास इमारत बांधण्याची किंवा अतिक्रमण करण्याची परवानगी देऊं नये; कारण, उद्देश असा आहे कीं सदरहू जमिनी खुल्या जागा राहाव्या व त्या, लोकांच्या करमणुकीसाठीं राखून ठेवाव्या, मात्र त्या सदरहू इरादा चांगल्या रीतीनें शेवटास नेण्यासाठीं वेळोवेळीं जे नियम करणें बोर्डास वाजवी वाटेल त्या नियमांस पात्र असाव्या.

(२) बोर्ड वेळोवेळीं सरकारची मुद्दाम मंजूरी घेऊन, कोणत्याही हंगामी कारणासाठीं सदरहू जमिनींचा कोणताही भाग राखून ठेवण्यास व कुडण्यास मुख़त्यार आहे आणि वेळोवेळीं, एकाद्या ॲथ्लेटिक क्लब किंवा असोसिएशनकडून अर्जी आली असतां, आपल्या नजरेस आल्यास, अशा क्लबच्या किंवा असोसिएशनच्या उपयोगाकरितां सदरहू जमिनींचे भाग, बोर्ड पसंत करील तसें नांवाचें किंवा इतर भाडें ठरवून, देण्यास, राखून ठेवण्यास व परवानगीपट्ट्यानें देण्यास मुख़त्यार आहे;

(३) सदरहू जमिनींकीं ज्या जमिनींस "मैदानें" असें ह्मटलें आहे त्यांच्यांतील पाणी काढून टाकण्यासाठीं जीं कोणतीही कामें, सदरहू शहरांतील, जमिनीखालील, पाण्याची सपाटी कमी करण्यासाठीं कार्पोरेशननें मंजूर केलेल्या कोणत्याहि योजनेचा भाग ह्मणून किंवा त्या योजनेच्या संबंधानें, हातीं घेण्यांत येतील त्या कामांच्या खर्चाबद्दल बोर्ड पात्र होणार नाहीं असें समजावें.

(४) या कलमांतील कोणत्याही ठरावावरून—

(अ) "मैदानें" ह्मटलेल्या सगळ्या जमिनी किंवा त्यांचा कोणताही भाग लागवडीसाठीं किंवा माल सांठवून ठेवण्यासाठीं भाड्यानें देण्याच्या, व अशा मालाच्या संरक्षणाकरितां किंवा मनुष्यवस्ती खेरीजकरून इतर कोणत्याही कारणाकरितां जरूर असतील तीं हंगामी बांधकामें त्यांवर उभारण्याची परवानगी देण्याच्या, बोर्डाच्या;

(ब) क परिशिष्टाच्या पहिल्या भागांत ज्या क्षेत्रास प्लॉट "क" असें ह्मटलें आहे तें क्षेत्र राखून ठेवून त्याचा लष्करी कारणांसाठीं उपयोग करण्याच्या, लष्करी अधिकाऱ्यांच्या,

हक्कास व्यत्यय येतो किंवा त्यावरून त्याची मर्यादा होते असें समजूं नये.

इतर सरकारी रिकाम्या जमिनी व कार्पोरेशनची जमीन.

(२) क परिशिष्टाच्या २ऱ्या भागांत ज्या कित्येक जमिनी (त्या परिशिष्टांत कित्येक ठिकाणांची कांहीं काळपर्यंत सरकारानें वहिवाट करण्याचा जो हक्क राखून ठेविला आहे त्या हक्कास पात्र करून) निर्दिष्ट केल्या असून ठेविलेल्या प्लानांत दाखविल्या आहेत त्या जमिनींतील मलिका माआझमा यांची सर्व एस्टेट, हक्क, वारसा व हितसंबंध; आणि ड परिशिष्टांत ज्या कित्येक जमिनी निर्दिष्ट केल्या आहेत त्यांतील कार्पोरेशनास प्राप्त झालेली सर्व एस्टेट, हक्क, वारसा व हितसंबंध, वर शेवटीं सांगितलेल्या सगळ्या जमिनी बोर्डाकडून पट्ट्यानें देण्यांत येत तोंपर्यंत, किंवा त्या जमिनींच्या कोणत्याही भागाच्या संबंधानें ह्मटलें ह्मणजे तो भाग सदरहूप्रमाणें देण्यांत येई तोंपर्यंत, आणि त्यानंतर त्या सगळ्या जमिनीच्या किंवा सदरहू कोणत्याही भागाच्या संबंधानें ह्मटलें ह्मणजे जी कोणतीही आणखी मुदत खालीं सांगितलेल्या वेळीं ठरविण्यांत येईल त्या आणखी मुदतीपर्यंत—

(अ) जेथें बोर्डानें दिलेला पट्टा नवीन करून न देण्याजोगा असेल तेथें त्या पट्ट्याची मुदत संपल्यावर;

(ब) जेथें बोर्डानें करून दिलेल्या पट्ट्यांत तो पट्टा नवीन करून देण्याबद्दलची रकम दाखल केली असेल तेथें—

(१) नवीन करून द्यावयाचा पट्टा करून दिला असेल तेव्हां त्या नवीन करून दिलेल्या पट्ट्याची मुदत संपल्यावर;

(२) नवीन करून द्यावयाचा पट्टा करून दिला नसेल तेव्हां दिलेल्या पट्ट्यांत ज्या परमावधीच्या मुदतीपर्यंत पट्टा नवीन करून देण्यांत येईल असें ह्मटलें असेल त्या मुदतीइतकी मुदत संपल्यानंतर;

एकंदर किती मुदतीपर्यंत अशा जमिनी पट्ट्यानें देण्याचा बोर्डास अधिकार आहे त्यासंबंधानें विशेष ठराव.

(१) मात्र असें ठरविलें आहे कीं नवीन करून द्यावयाचा नाहीं असा कोणताही पट्टा ९९ वर्षांहून ज्यास्त मुदतीपर्यंत देऊं नये आणि नवीन करून द्यावयाच्या पट्ट्याची मुदत आणि असा पट्टा ज्या मुदतीपर्यंत नवीन करून देण्यांत येईल असें ह्मटलें असेल ती मुदत या दोन्ही मुदती मिळून एकंदर मुदत कोणत्याही प्रसंगीं ९९ वर्षांहून ज्यास्त असूं नये.

सार्वजनिक, किंवा म्युनिसिपल खात्यासंबंधी, कारणासाठीं लागणाऱ्या जमिनी परत घेण्याबद्दलच्या अनुक्रमें सरकारच्या व कार्पोरेशनच्या अधिकारासंबंधी विशेष ठराव.

(२) मात्र असेंही ठरविलें आहे कीं क परिशिष्टांत निर्दिष्ट केलेल्या जमिनींच्या ज्या कोणत्याही भागाची एकाद्या सार्वजनिक कारणासाठीं सरकारास गरज लागेल तो भाग, किंवा ड परिशिष्टांत निर्दिष्ट केलेल्या ज्या कोणत्याही भागाची कोणत्याही म्युनिसिपल खात्यासंबंधी कारणासाठीं गरज लागेल तो भाग, कोणत्याही वेळीं, परत घेण्यास प्रसंगाप्रमाणें सरकार किंवा कार्पोरेशन मुखत्यार आहे, आणि याप्रमाणें परत घेतलेल्या जमिनींसंबंधी बोर्डाच्या सर्व दाव्यांची फेड, बोर्डाचें भांडवलासंबंधी कर्ज त्या मानानें कमी करून (याप्रमाणें जी रकम कमी करावयाची ती अनुक्रमें परिशिष्टें क व ड यांच्या ७ व्या आसनांत अशा जमिनीस जो दर लागू केला आहे त्या दराकडे लक्ष्य देऊन, कलेक्टरानें ठरवावयाची) आणि याप्रमाणें परत घेतलेल्या जमिनीवर किंवा त्या जमिनीच्या संबधानें ज्या ज्या सुधारणा बोर्डानें केल्या असतील त्या सर्व सुधारणांच्या खर्चाबद्दल बोर्डास वाजवी अलावन्स देऊन, केली पाहिजे.

(३) पट्टा या शब्दाचा अर्थ, या पोट-कलमाच्या व लगत पुढील पोट-कलमाच्या कारणांसाठीं नोंदण्याविषयींच्या आक्टाअन्वयें नोंदावा लागणारा पट्टा असा आहे असें मानावें.

(३) इ परिशिष्टांत निर्दिष्ट केलेल्या हद्दींच्या आंतील, मलिका माआझमा यांची मिळकत असणाऱ्या, समुद्राच्या तळाची जमीन नवीन साध्य करण्याचा हक्क आणि वर निर्दिष्ट केलेल्या हद्दींच्या आंतील ज्या जमिनी बोर्डानें नवीन साध्य केल्या असतील त्या जमिनींतील मलिका माआझमा यांची सर्व इस्टेट, हक्क, वारसा आणि हितसंबंध, नवीन साध्य केलेलीं सगळीं क्षेत्रें बोर्डाकडून पट्टयानें देण्यांत येत तोंपर्यंत, किंवा त्या क्षेत्रांच्या कोणत्याही भागासंबंधानें म्हटलें म्हणजे तो भाग सदरहूप्रमाणें देण्यांत येई तोंपर्यंत आणि त्यानंतर त्या सगळ्या क्षेत्रांच्या किंवा सदरहू कोणत्याही भागाच्या संबंधानें म्हटलें म्हणजे जी कोणतीही आणखी मुदत रकमा (अ) व (ब) आणि पोटकलम (२) यांतील १ ला विशेष ठराव यांत ठरविलेल्या रीतीनें ठरविण्यांत येईल त्या आणखी मुदतीपर्यंत;

*जमीन नवीन साध्य करण्याचे बोर्डाचे मार्ग.*

मात्र असें ठरविलें आहे कीं—

(१) जी तारीख १० व्या कलमाअन्वयें जाहिरनामा देऊन प्रसिद्ध करण्यांत येईल त्या तारखेपासून २० वर्षांची मुदत संपल्यावर जर बोर्ड, सदरीं निर्दिष्ट केलेल्या हद्दींच्या आंतील कोणतेंही क्षेत्र नवीन साध्य करून घेण्याला सुरवात करण्यास चुकेल किंवा तशी सुरवात करून तें काम पुढें सोडून देईल तर या पोट-कलमाअन्वयें सदरीं शेवटीं सांगितलेल्या क्षेत्राच्या संबंधानें बोर्डास प्राप्त होणारे हक्क व मिळकत हीं तावडतोब नाहींशीं होऊन सर्वस्वी मलिका माआझमांस पुन्हां प्राप्त होतील असें समजावें.

*असे हक्क चालविण्याच्या कामीं उशीर झाला असतां त्यासंबंधी विशेष ठराव.*

(२) कोणत्याहि नवीन साध्य केलेल्या क्षेत्राच्या ज्या कोणत्याहि भागाची एखाद्या सार्वजनिक कारणासाठीं सरकारास गरज लागेल तो भाग कोणत्याहि वेळीं कबज्यांत घेण्याचा सरकारास अधिकार आहे, आणि वर सांगितल्याप्रमाणें कबज्यांत घेतलेल्या भागासंबंधीं बोर्डाच्या सर्व दाव्यांची फेड, वर सांगितल्याप्रमाणें नवीन साध्य केलेलें क्षेत्र नवीन साध्य करण्याचा खर्च ( यांत आरंभींचे खर्च, देखरेखीबद्दलचा खर्च व नवीन साध्य करण्याचें काम चालत असतां त्या मुदतीबद्दलच्या व्याजाबद्दल सूट, हीं येतात ) यांचें सरासरी मान काढून येईल त्या दरानें सदरहू भाग नवीन साध्य करण्यास जो खर्च लागला असेल त्या खर्चाइतकी रकम बोर्डास देऊन, केली पाहिजे, आणि अशा भागाच्या संबंधानें ६१ व्या कलमाअन्वयें सरकाराशीं बोर्डाची कोणतीहि जबाबदारी असल्यास ती कमी होईल.

*कोणत्याहि नवीन साध्य केलेल्या जमिनीची सार्वजनिक कारणासाठीं गरज लागल्यास ती कबज्यांत घेण्याबद्दलच्या सरकारच्या अधिकाराबाबत विशेष ठराव.*

(३) नवीन साध्य केलेल्या कोणत्याहि क्षेत्रावर किंवा त्या क्षेत्राच्या संबंधानें बोर्डानें केलेल्या कोणत्याहि हुकुमाची किंवा ठरावाची अमलबजावणी, अगर बोर्डाकडून किंवा बोर्डाच्या वतीनें जें कोणतेंहि कृत्य करण्यांत येत असेल किंवा केलें जाण्याच्या बेतांत असेल तें कृत्य, डिफेन्सिसच्या किंवा मुंबईंत ठेवलेल्या लष्कराच्या आरोग्यरक्षणसंबंधी स्थितीच्या सुरक्षितपणास अपायकारक रीतीनें बाधक होत आहे किंवा बाधक होण्याचा संभव आहे असें सरकारास वाटेल तर, सरकारची पूर्वीं मंजूरी घेतल्यावांचून तशा हुकुमाची अमलबजावणी करतां नये किंवा तसें कृत्य करतां नये.

*डिफेन्सिस किंवा लष्कराची आरोग्यरक्षणसंबंधी स्थिती यांच्या सुरक्षितपणास अपायकारक रीतीनें बाधक होण्याचा संभव असलेलें कोणतेंहि कृत्य करण्यास आपली पूर्वी मंजूरी घेण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार सरकारास देण्याबाबत विशेष ठराव.*

(४) कोणत्याहि बाटरीच्या तोफांच्या, हिंदुस्थान सरकारानें ठरविलेल्या, गोळीच्या माराच्या आंत किंवा कोणत्याहि बाटरीच्या, हिंदुस्थान सरकार ठरवील तशा, वर सांगितल्या प्रकारच्या अंतराच्या आंत, नवीन साध्य केलेल्या कोणत्याहि जमिनीवर कोणतीहि इमारत बांधूं नये.

*हिंदुस्थान सरकाराकडून ठरविण्यांत येईल त्या हद्दींच्या आंत बाटरींच्या शेजारीं कोणतीहि इमारत न बांधण्याबाबत विशेष ठराव.*

(५) सदरील शेवटल्या दोन विशेष ठरावांतील ठरावांअन्वयें सरकारानें काढलेल्या कोणत्याहि हुकुमामुळें किंवा मनाईच्या हुकुमामुळें बोर्डाच्या हितसंबंधांस जो कोणताहि तोटा किंवा खराबी तावडतोब किंवा पुढें होईल त्या तोट्याच्या किंवा खराबीच्या नुकसानीच्या मोबदल्याबद्दल बोर्डाचा सरकारावर कोणत्याहि प्रकारें दावा चालणार नाहीं.

*सदरील शेवटल्या दोन विशेष ठरावांअन्वयें काढलेल्या कोणत्याहि हुकुमांच्या संबंधानें बोर्डाचा कोणताहि दावा न चालण्याबाबत विशेष ठराव.*

बोर्डानें दिलेल्या पट्ट्यांची मुदत संपल्यावर मिळकत अनुक्रमें सरकारास व कार्पोरेशनास पुनः प्राप्त होणें.

९४. वरील शेवटल्या कलमाच्या (२) ऱ्या व (३) ऱ्या पोट-कलमांत सांगितलेली आणखी मुदत संपल्यावर, क परिशिष्टाच्या २ ऱ्या भागांत, व ड परिशिष्टांत, निर्दिष्ट केलेल्या जमिनींच्या, आणि इ परिशिष्टांत निर्दिष्ट केलेल्या हद्दींच्या आंत नवीन साध्य केलेल्या जमिनींच्या, कोणत्याहि भागांत या कलमाअन्वयें जी मिळकत बोर्डास प्राप्त झाली असेल ती, सदरहू जमिनींच्या ज्या भागाच्या संबंधाची सदरहू आणखी मुदत संपली असेल त्या भागापुरती, लगेच नाहींशी होईल, आणि त्या जमिनींचा तो भाग प्रसंगाप्रमाणें मलीका मोअज्जमा यांस किंवा कार्पोरेशनास सर्वस्वी पुनः प्राप्त होईल, व ८९ व्या कलमाअन्वयेंचें बोर्डाचें भांडवलासंबंधी कर्ज आणि ९१ व्या कलमाअन्वयेंची बोर्डाची जबाबदारी हीं त्या मानानें कमी होतील असें समजावें.

## मिळकतीसंबंधी साधारण अधिकार.

बोर्डास मिळकत घेण्याचा व धारण करण्याचा अधिकार.

९५. बोर्डास या आक्टाच्या कारणांसाठीं जंगम व स्थावर मिळकत, ती मग सदरहू शहराच्या आंत असो किंवा बाहेर असो, घेण्याचा व धारण करण्याचा अधिकार आहे आणि तसाच बोर्डास या आक्टांतील ठरावांच्या कारणांसाठीं व त्या ठरावांस पात्र राहून खालीं सांगितल्याप्रमाणें करण्याचा अधिकार आहे:—

(१) क परिशिष्टाच्या १ ल्या भागांत निर्दिष्ट केलेल्या जमिनी खेरीजकरून जी कोणतीही जंगम किंवा स्थावर मिळकत बोर्डास प्राप्त झाली असेल किंवा बोर्डानें घेतली असेल ती मिळकत भाड्यानें किंवा पट्ट्यानें देण्याचा;

(२) क व ड परिशिष्टांत निर्दिष्ट केलेल्या जमिनी व इ परिशिष्टांत निर्दिष्ट केलेल्या हद्दींच्या आंत नवीन साध्य केलेल्या कोणत्याही जमिनी खेरीजकरून जी कोणतीही इतर जंगम किंवा स्थावर मिळकत बोर्डास प्राप्त झाली असेल किंवा बोर्डानें घेतली असेल ती मिळकत विकण्याचा व इतर रीतीनें कन्व्हे करण्याचा.

बोर्डास प्राप्त झालेल्या जमिनींच्या किंवा इमारतींच्या विक्रीच्या उत्पन्नाचा व्यय.

९६. या आक्टाअन्वयें बोर्डास प्राप्त झालेल्या किंवा प्राप्त होणाऱ्या जमिनींच्या किंवा इमारतींच्या कोणत्याही भागाच्या विक्रीचें उत्पन्न, मुद्दलसंबंधी चालू खर्च भागविण्याच्या कामीं किंवा ४६ व्या व ४७ व्या कलमांअन्वयें बोर्डानें काढलेल्या कोणत्याही कर्जाची मुद्दल रकम किंवा तिचा कोणताही भाग त्या वेळीं देणें असल्यास ती मुद्दल रकम फेडण्याच्या कामीं किंवा सदरहू कलमांत सांगितलेल्या कर्ज फेडण्याबद्दलच्या फंडास ४८ व्या कलमाअन्वयें जी रकम द्यावयाची त्या रकमेंत घालण्याच्या कामीं लाविलें पाहिजे.

बोर्डास प्राप्त झालेल्या कित्येक जमिनी या आक्टाअन्वयेंच्या कोणत्याही योजनेच्या कारणांस लावण्याचा अधिकार.

९७. बोर्डाला, या आक्टांतील ठरावांस अनुसरून, क परिशिष्टाच्या १ ल्या भागांत निर्दिष्ट केलेल्या जमिनी खेरीज करून ९३ व्या कलमाअन्वयें बोर्डास प्राप्त झालेल्या जमिनींपैकीं कोणतीही जमीन या आक्टाअन्वयेंच्या कोणत्याही योजनेच्या कारणांस लावण्याचा अधिकार आहे असें समजावें.

सदरहूप्रमाणें कामीं लावलेल्या जमिनींच्या किंमतीची व्यवस्था.

९८. क परिशिष्टाच्या २ ऱ्या भागांत किंवा ड परिशिष्टांत निर्दिष्ट केलेल्या जमिनींच्या कोणत्याही भागाचा खुली जागा करण्याच्या कामीं किंवा स्ट्रीट बनविण्याच्या कामीं बोर्डानें उपयोग केला असेल तेव्हां अनुक्रमें हिंदुस्थानचे सेक्रेटरी आफ् स्टेट इन् कौन्सिल यांस किंवा कार्पोरेशनास बोर्डानें देणें असलेल्या भांडवलासंबंधी कर्जांत या प्रमाणें उपयोग केलेल्या जमिनीच्या किंमती ( ही किंमत कलेक्टरानें अनुक्रमें क परिशिष्टाच्या २ ऱ्या भागाच्या, किंवा ड परिशिष्टाच्या, ७ व्या आसनांत जो दर निर्दिष्ट केला आहे त्या दराकडे लक्ष्य देऊन ठरविली पाहिजे ) इतकी रकम कमी केली पाहिजे.

## जबाबदाऱ्या.

सेक्रेटरी आफ् स्टेट व कार्पोरेशन यांस बोर्डानें देणें असलेल्या भांडवलासंबंधी कर्जाचा तपशील.

९९. (१) या आक्टावरून बोर्डास प्राप्त झालेल्या मिळकतीबद्दल बोर्डानें देणें असलेलीं भांडवलासंबंधी कर्जें खालीं सांगितल्याप्रमाणें आहेत:—

(अ) हिंदुस्थानचे सेक्रेटरी आफ् स्टेट इन् कौन्सल यांस, क परिशिष्टांत सांगितलेल्या रकमा;

(ब) कार्पोरेशनास, ड परिशिष्टांत सांगितलेल्या रकमा.

(२) (अ) क परिशिष्टाच्या १ ल्या भागांत निर्दिष्ट केलेल्या जमिनींबद्दल बोर्डानें देणें असलेल्या भांडवलासंबंधी कर्जावर, कलम ६९ (३) यांत ठरविला आहे तो प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, कोणतेंही व्याज बोर्डानें दिलें पाहिजे असें समजूं नये.

खुल्या जागा म्हणून राखून ठेविलेल्या सरकारी जमिनींबद्दलच्या भांडवलासंबंधी कर्जावर, कलम ६९ (३) यांत ठरविलें आहे त्या प्रसंगीं खेरीज करून, कोणतेंही व्याज न घेणें.

(ब) क परिशिष्टाच्या २ ऱ्या भागांत व ड पारीशिष्टांत सांगितलेल्या रकमांवर सन १९०८ च्या एप्रिल महिन्याच्या १ ल्या तारखेस (परंतु त्या तारखेपूर्वी नाहीं) दरसाल दरशेंकडा ३ टक्के या दरानें व्याज चालू होण्याचें सुरू होईल, आणि बोर्डानें, वर सांगितलेलें व्याज अनुक्रमें हिंदुस्थानचे सेक्रेटरी आफ् स्टेट इन् कौन्सिल यांस व कार्पोरेशनास सन १९०९ च्या व त्यापुढील प्रत्येक वर्षाच्या एप्रिल महिन्याच्या १ ल्या तारखेरोजीं दिलें पाहिजे.

दुसऱ्या सरकारी जमिनी व कार्पोरेशनच्या जमिनी याबद्दलच्या कर्जावरील व्याजाबद्दलची जबाबदारी.

(१) मात्र असें ठरविलें आहे कीं हिंदुस्थान सरकारास योग्य वाटल्यास तें सरकार, क परिशिष्टाच्या २ ऱ्या भागांत किंवा ड परिशिष्टांत निर्दिष्ट केलेल्या जमिनींचा जो कोणताही भाग सन १९०८ च्या एप्रिल महिन्याच्या १ ल्या तारखे रोजीं पट्टयानें देण्यांत आल्यावांचून राहील त्या भागाच्या संबंधानें या कलमाअन्वयें बोर्डानें द्यावयाचें व्याज चालू होण्याच्या सुरवातीची तारीख, (अशा भागाच्या संबंधानें बोर्डाकडून जो कोणताही पट्टा करून देण्यांत येईल त्या पट्ट्याच्या तारखेहून उशिरां नाहीं अशा) सरकार ठरवील त्या तारखेपर्यंत लांबणीवर घालण्यास मुखत्यार आहे.

व्याजाबद्दलची जबाबदारी सुरू होण्याची तारीख सरकारास लांबणीवर घालतां येण्याबाबत विशेष ठराव.

(२) मात्र असेंही ठरविलें आहे कीं प्रसंगाप्रमाणें हिंदुस्थानचे सेक्रेटरी आफ् स्टेट इन् कौन्सिल यांस, किंवा कार्पोरेशनास देणें असलेल्या भांडवलासंबंधी कर्जांत ५४ व्या कलमांत ठरविल्याप्रमाणें किंवा इतर प्रकारें कोणतीही रकम कमी करण्यांत आल्यावर, या पोट-कलमाअन्वयें बोर्डानें द्यावयाचें व्याज, भांडवलासंबंधी कर्जांत सदरहू रकम कमी केल्याच्या तारखेपासून, त्या कमी केलेल्या रकमेच्या मानानें, कमी केलें पाहिजे.

पट्ट्यांची मुदत संपल्यावर किंवा इतर प्रकारें, व्याजाची रकम कमी करण्याबाबत विशेष ठराव.

६०. हिंदुस्थानचे सेक्रेटरी आफ् स्टेट इन् कौन्सिल यांस येणें असलेल्या भांडवलासंबंधी कर्जांत, सन १८९६ च्या आगष्ट महिन्याच्या १ ल्या तारखेपासून १० व्या कलमाअन्वयें जाहिरनामा छापून जी तारीख प्रसिद्ध करण्यांत येईल त्या तारखेपर्यंत क परिशिष्टाच्या २ ऱ्या भागांत चौपटी एस्टेट या नांवानें वर्णन केलेली जमीन आंखून देण्याच्या कामीं किंवा काटन ग्रीन या नांवानें वर्णन केलेल्या जमिनीवर आगीपासून संरक्षण करण्यासाठीं पाण्याचे नळ घालण्याच्या कामीं हिंदुस्थानचे सेक्रेटरी आफ् स्टेट यांस जो खर्च झाला असेल त्या खर्चाचा, आणि वर सांगितल्याप्रमाणें जी तारीख प्रसिद्ध करावयाची त्या तारखेच्या अगोदर या आक्टाच्या कारणांसाठीं सरकारच्या मंजुरीनें जो आरंभींचा खर्च करण्यांत आला असेल त्या खर्चाचा समावेश होतो असें समजावें.

सेक्रेटरी आफ् स्टेट यांस येणें असलेल्या भांडवलासंबंधी कर्जांत, सरकारास आलेले कित्येक खर्च व या आक्टाअन्वयें झालेले प्रारंभींचे खर्च यांचा समावेश होणें.

सदरीं सांगितलेल्या खर्चाबद्दल, जी तारीख १० व्या कलमाअन्वयें जाहिरनामा देऊन प्रसिद्ध करण्यांत येईल त्या तारखेरोजीं (मात्र त्यापूर्वीं नाहीं) दरसाल दरशेंकडा ३½ टक्के या दरानें व्याज चालू होण्याचें सुरू झालें पाहिजे, आणि बोर्डानें सदरीं सांगितलेल्या रकमा, सदरीं सांगितलेल्या व्याजासहित, या आक्टांत वर ठरविल्याप्रमाणें या आक्टाच्या कारणांसाठीं बोर्डानें कर्ज काढलें म्हणजे लगेच परत दिल्या पाहिजेत.

६१. १० व्या कलमाअन्वयें जी तारीख प्रसिद्ध करण्यांत येईल त्या तारखेपासून पहिल्या तीस वर्षांपर्यंत बोर्डास, कलम ९३ (३) अन्वयें नवीन साध्य केलेल्या क्षेत्रांपासून, जो माल किनाऱ्यावर उतरण्यांत येईल किंवा किनाऱ्यावरून तारवांत चढविण्यांत येईल

बोर्डानें नवीन साध्य केलेल्या क्षेत्रांच्या भाड्यांचा व त्यांपासून होणाऱ्या फायद्यांचा पहिल्या ३० वर्षांपर्यंत स्वतंत्रपणें उपभोग

येणें आणि त्यानंतर बाजारांत येणाऱ्या किंमतींतून जमीन नवीन साध्य करण्याचा खर्च वजा करून बाकी राहिलेल्या किंमतीवर व्याज देणें.

त्या मालावर उत्पन्न होणाऱ्या पट्ट्या नव्हत अशा सर्व भाड्यांचा व फायद्यांचा स्वतंत्र उपभोग घेण्याचा अधिकार आहे असें समजावें.

त्यानंतर बोर्डानें दरसाल एप्रिल महिन्याच्या १ ल्या तारखेरोजीं हिंदुस्थानचे सेक्रेटरी आफ् स्टेट यांस, नवीन साध्य केलेल्या क्षेत्रांच्या बाजारांत येणाऱ्या किंमतींतून तीं क्षेत्रें नवीन साध्य करण्याबद्दलचा खर्च वजा करून जी रकम ठरेल त्या रकमेवर शेंकडा ३ टक्के दिले पाहिजेत.

सदरील शेवटल्या कलमाच्या कारणांसाठीं "बाजारांत येणारी किंमत" व "नवीन साध्य करण्याबद्दलचा खर्च" या संज्ञांच्या व्याख्या.

६२. वरील कलमांच्या कारणांसाठीं—

(१) "बाजारांत येणारी किंमत" याचा अर्थ व्याजाचा पहिला हप्ता ज्या वेळीं देणें होतो त्या वेळीं कलेक्टर, इमारती बांधण्याच्या कारणांसाठीं अशा जमिनींची जी रास्त मिरासंबंधी किंमत ह्मणून ठरवील ती बाजारांत येणारी किंमत असा आहे: मात्र रस्त्यांनीं; धक्क्यांनीं व घोडे-रस्त्यांनीं व्यापिलेलीं क्षेत्रें किंवा समुद्रकिनाऱ्याच्या बाजूनें जें कोणतेंही क्षेत्र संरक्षणाच्या कारणासाठीं खुली जागा ह्मणून राखून ठेवणें जरूर असेल तें क्षेत्र, हीं सदर्हू किंमत ठरवितेवेळीं वगळलीं पाहिजेत.

(२) "तीं नवीन साध्य करण्याबद्दलचा खर्च" या संज्ञेचा अर्थ, बोर्डाच्या तपासलेल्या ज्या हिशोबांत, आरंभींच्या खर्चाच्या संबंधानें, देखरेखीसंबंधानें व जमीन नवीन साध्य करण्याचें काम चालत असतां त्या मुदतींतील व्याजाच्या रकमेच्या संबंधानें, सदरहू काम पुरें झाल्याच्या तारखेपर्यंत, आकारण्यांत येईल तो खर्च धरून, नवीन जमीन साध्य करण्यासंबंधी प्रत्येक योजनेचा खर्च निरनिराळा दाखविला असेल त्या तपासलेल्या हिशोबांवरून ठरविलेला खर्च असा आहे.

## ६.—महसूल व खर्च.

### म्युनिसिपल फंडांतून मदतीदाखल द्यावयाची रकम.

म्युनिसिपल फंडांतून दरसाल दोन हप्त्यांनीं मदतीदाखल पैका घेण्याचा बोर्डास अधिकार.

६३. (१) बोर्डाला, ह्या आक्टाचे उद्देश सिद्धीस नेण्याच्या कामीं होणारा खर्च भागविण्यासाठीं, म्युनिसिपल फंडांतून वार्षिक मदत मागण्याचा अधिकार आहे; आणि कमिशनरानें, अशी मागणी करण्यांत आली ह्मणजे, म्युनिसिपल फंडांतून तशी मदत बोर्डाच्या जमेकडे दिली पाहिजे:

(२) ही मदत दोन हप्त्यांनीं दिली पाहिजे:

पहिल्या हप्त्याची रकम, मुंबई शहरांतील इमारतींच्या व जमिनींच्या एकंदर आकारणीच्या किंमतीवर शेकडा दोन टक्क्यांहून जास्त नाहीं इतकी उक्ती रकम असेल.

सन १९०० सालाच्या व त्यापुढील दरेक सालाच्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेस द्यावयाच्या पहिल्या हप्त्याची रकम ह्मटली ह्मणजे, म्युनिसिपल आक्टाच्या १९६ व्या कलमाअन्वयें ठेविलेल्या लगत गेल्या वर्षाच्या कमिशनरच्या असेसमेंट बुकांत मुंबई शहरांतील ज्या इमारती व जमिनी साधारण करास पात्र नाहात ह्मणून दाखल केलेल्या असतील त्या इमारतींची व जमिनींची आकारणीची किंमत न धरतां त्या बुकांत दाखल केलेल्या इमारतींच्या व जमिनींच्या आकारणीच्या किंमतीवर आकारलेली शेंकडा २ टक्क्यांहून जास्त नाहीं इतकी उक्ती रकम असेल.

सन १९०० सालाच्या व त्यापुढील दरेक सालाच्या आक्टोबर महिन्याच्या पहिल्या तारखेस द्यावयाच्या दुसऱ्या हप्त्याची रकम ह्मटली ह्मणजे, खालील धोरणानें हिशोबाचा विभाग केला असतां निघणाऱ्या रकमे इतकीच असेल: ह्मणजे:— . दुसरा हप्ता हिशोबाचे विभाग करून ठरवावयाचा.

(अ) जमेच्या बाजूस खालील रकमा लिहाव्या— विभाग करतांना जमेकडच्या रकमा हिशोबीं धरावयाच्या त्या.

(१) ह्या आक्टाअन्वयें बोर्डास ज्या जमिनी व मिळकती प्राप्त झाल्या असतील, किंवा ज्या जमिनी व मिळकती बोर्डानें नवसाध्य करून तयार केलेल्या असतील अगर ह्या आक्टाच्या कारणांसाठीं मिळविलेल्या असतील (मग ह्या जमिनी किंवा मिळकती बोर्डाच्या भोगवट्यांत असोत किंवा बोर्डाच्या कुळांस पट्ट्यानें दिलेल्या असोत) त्या जमिनींवर व मिळकतींवर, म्युनिसिपल आक्ट कलम १४० (ब) व (क) याखालील मिळकतीवरील करांच्या संबंधानें (परंतु कलम ६१ रकम (के) व बाब १४ वी ह्यांअन्वयें उत्पन्न होणाऱ्या कार्पोरेशनच्या कर्तव्यांच्या बजावणीस जरूर लागणारा खर्च भागवण्यासाठीं बसविलेला कर वगळून) गेल्या मार्च महिन्याच्या ३१ व्या तारखेस संपणाऱ्या बारा महिन्यांमध्यें कार्पोरेशनानें किंवा कार्पोरेशनाच्या वतीनें वसूल केलेल्या पैक्याची रकम.

(२) ज्या जमिनी किंवा इमारती, बोर्डानें तयार केलेल्या कोणत्याही नवीन रस्त्याच्या दोन बाजूंपैकीं कोणत्याही बाजूस ८० फूट अंतराच्या आंत सर्वांशीं किंवा अंशत: असतील त्या जमिनींवर व इमारतींवर, म्युनिसिपल आक्टाचें कलम १४० (ब) व (क) याखालील मिळकतीवरील करांच्या (परंतु कलम ६१ रकम (के) व बाब १४ वी ह्यांअन्वयें उत्पन्न होणाऱ्या कार्पोरेशनच्या कर्तव्यांच्या बजावणीस जरूर लागणारा खर्च भागविण्यासाठीं बसविलेला कर वगळून) वेळोवेळीं अमलांत असलेल्या दरांप्रमाणें वसूल करावयाच्या रकमेंतून, असा नवीन रस्ता ज्या योजनेंत दाखल केलेला असेल त्या योजनेस मंजुरी मिळण्यासाठीं केलेल्या अर्जाबरोबर कलम ३० (२), रकम (फ) किंवा कलम ३४ यांत सांगितल्याप्रमाणें ठेविलेल्या परिशिष्टांत, दाखल केलेल्या सदहू हद्दींच्या आंत ज्या जमिनी व इमारती होत्या त्यांच्या आकारणीच्या किंमतीस सदहू प्रकारच्या करांबद्दलचे सदहू प्रकारचे दर लागू करून येईल ती रकम वजा करतां जी बाकी राहील तितकी रकम.

(३) ज्या इमारती किंवा जमिनी साधारण करास पात्र नसल्याबद्दल म्युनिसिपल आक्टाच्या १९६ व्या कलमाअन्वयें चालू सालासाठीं ठेविलेल्या कमिशनराच्या असेसमेंट बुकांत नोंद केलेली असेल, त्या जमिनींच्या किंवा इमारतींच्या आकारणीच्या किंमतीव्यतिरिक्त आणि गेल्या शेवटल्या रकमांपैकीं कोणत्याही रकमेंत हिशोबीं धरलेली नाहीं अशी, जमिनींच्या व इमारतींच्या आकारणीच्या किंमतीची त्या बुकांत दाखल केलेली जी एकंदर रकम तीवर शेंकडा २ टक्क्यांप्रमाणें होणारी रकम.

(ब) खर्चाच्या बाजूस खालील रकमा लिहाव्या:— खर्चाकडील रकमा अशा हिशोबीं धरावयाच्या त्या.

(१) ह्या कलमांत उल्लेख केलेल्या रकमा वसूल करण्याच्या खर्चाबद्दल वाजवी रकम.

(२) कलम ४१ अन्वयें कार्पोरेशनच्या स्वाधीन केलेले नवीन रस्ते चांगल्या स्थितींत ठेवण्याबद्दल, त्यांवर दिवे लावण्याबद्दल, व पाणी शिंपण्याबद्दल आणि ते साफ करण्याबद्दल, गेल्या मार्च महिन्याच्या ३१ व्या तारखेस

संपणाऱ्या बारा महिन्यांत कार्पोरेशनास किंवा कार्पोरेशनच्या तर्फेनें झालेला खर्च.

(३) ह्या आक्टाअन्वयें बोर्डास प्राप्त झालेल्या किंवा बोर्डानें नवसाध्य करून तयार केलेल्या किंवा ह्या आक्टाच्या कारणांसाठीं मिळविलेल्या प्रदेशांतील ड्रेन व ड्रेनेजची कामें व सार्वजनिक शेतखाने, मुतऱ्या व त्यांसारख्या सोईच्या संस्था चांगल्या स्थितींत ठेवण्याबद्दल व साफ करण्याबद्दल आणि गटारांतलें पाणी पंप करण्याचीं स्टेशनें असल्यास तीं चालू ठेवण्याबद्दल गेल्या मार्च महिन्याच्या ३१ व्या तारखेस संपणाऱ्या बारा महिन्यांमध्यें कार्पोरेशनास किंवा कार्पोरेशनच्या तर्फे झालेल्या खर्चाबद्दल वाजवी रकम.

(४) म्युनिसिपल आक्टाचें कलम ६१, रकमा (क) व (प) ह्यांअन्वयें अशा क्षेत्रांसंबंधानें कार्पोरेशनास सांगितलेलीं अवश्य कर्तव्यें करण्याबद्दल वाजवी रकम.

ह्या जमेच्या रकमांची एकंदर आणि खर्चाच्या रकमांची एकंदर ह्यांच्या तफावतींतून ह्या कलमाच्या (२) व्या पोटकलमाअन्वयें एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेस अदा केलेली रकम वजा जाऊन कांहीं शिलक राहिल्यास, ती, दरसाल द्यावयाच्या दुसऱ्या हप्त्याची मर्यादा समजावी.

मदतीदाखल रकम न दिल्यास त्याबद्दल विशेष ठराव.

मात्र, ह्या कलमांत जी रकम कमिशनरानें अदा करावी ह्मणून फर्माविलें आहे ती कोणतीही रकम कमिशनरानें अदा केली नाहीं तर, सरकारास, म्युनिसिपल फंड किंवा कार्पोरेशनानें वसूल करावयाचा कोणताही कर जप्त करण्याचा अधिकार आहे; आणि मग म्युनिसिपल आक्टाच्या ९९ व्या कलमांच्या (२) व्या व (३) व्या पोटकलमांतील ठराव, जरूर असलेल्या सर्व फेरफारांनिशीं, त्या जप्तीस लागू होतील असें समजावें;

वादाचा निकाल करण्याविषयीं विशेष ठराव.

आणखी असेंही ठरविलें आहे कीं, ह्यांत ठरविलें आहे त्याप्रमाणें हिशोबाचे विभाग करतांना, खर्चीं घालावयाच्या व जमा करावयाच्या निरनिराळ्या रकमांबद्दल बोर्ड व कमिशनर ह्यांच्या दरम्यान वाद पडल्यास, त्या प्रकरणाचा निकाल सरकार करील, व त्यानें सांगितलेला निकाल अखेरचा समजला पाहिजे.

## सरकारानें द्यावयाच्या रकमा.

सन १८९७च्या आगस्ट महिन्यानंतर विवक्षित जमिनींपासून झालेला नफा सरकारानें बोर्डास द्यावयाचा.

६४. परिशिष्ट फ ह्यांत निर्दिष्ट केलेल्या जमिनींपासून, सरकारास तारीख ३१ आगस्ट सन १८९७ नंतरचें जें काय भाडें व नफा मिळेल, तें सर्व भाडें व नफा कलम १० अन्वयें जाहीर करण्यांत येईल त्या तारखेपासून ९९ वर्षेंपर्यंत सरकाराकडून बोर्डास देण्यांत येईल.

## हिशोबाचे विभाग.

व्यवस्थेचा खर्च कांहींकालपर्यंत भांडवलखातीं लिहावा, आणि तदनंतर भांडवल व महसूल यांच्या दरम्यान वांटून द्यावा.

६५. (१) कलम १० अन्वयें जाहीर करण्यांत येईल त्या तारखेपासून पंधरा वर्षांच्या मुदतीपर्यंत, किंवा, हिंदुस्थान सरकार पसंत करील त्या जास्त मुदतीपर्यंत, चेअरमन, आक्टिंग चेअरमन, ट्रस्टी व यादींत दाखल केलेली नोकरमंडळी यांचे पगार व अलावन्स, आणि कलम ४३, रकम (६) (ग), यांत सांगितलेला खर्च व इतर सगळा आनुषंगिक खर्च धरून व्यवस्थेबद्दलचा खर्च, भांडवल खातीं लिहिला पाहिजे.

तदनंतर, सदरहू प्रकारचा खर्च, सरकारच्या मंजुरीस पात्र राहून बोर्ड ठरवील त्याप्रमाणें भांडवल खातें व महसूल खातें यांमध्यें वांटून दिला पाहिजे.

भांडवलाच्या हिशोबांत, दरेक योजनेबद्दलचा खर्च आणि सरकारी व कार्पोरेशनच्या जमिनी सुधारण्याबद्दलचा व जमीन नवसाध्य करण्याबद्दलचा खर्च निरनिराळा दाखविला पाहिजे.

(२) भांडवलाच्या हिशोबांत, दरेक योजनेच्या संबंधानें बोर्डास झालेला एकंदर खर्च (व्यवस्थेबद्दलचा त्या मानाचा खर्च धरून) पृथक पृथक दाखवून,

(अ) बोर्डास प्राप्त झालेल्या असून परिशिष्ट क याच्या २ ऱ्या भागांत निर्दिष्ट केलेल्या जमिनींची सुधारणा,

(ब) बोर्डास प्राप्त झालेल्या असून परिशिष्ट ड यांत निर्दिष्ट केलेल्या जमिनींची सुधारणा,

(क) परिशिष्ट इ यांत निर्दिष्ट केलेल्या मर्यादांच्या आंतील कोणतेंहि क्षेत्र नवीन साध्य करणें,

यांच्या संबंधानें झालेला खर्च निरनिराळा दाखविला पाहिजे.

६६. कलम ६३ अन्वयें वसूल केलेल्या रकमा आणि ह्या आक्टाअन्वयें बोर्डास प्राप्त झालेल्या किंवा होणाऱ्या जमिनींचें अगर इमारतींचें भाडें व विक्रीच्या उत्पन्नाव्यतिरिक्त इतर उत्पन्न, हीं धरून बोर्डास पावलेला सर्व पैका, साधारण हिशोबाच्या खातीं जमा करावा. बोर्डास पावलेला सर्व पैका साधारण हिशोबाच्या खातीं जमा करावा.

६७. (१) साधारण हिशोबाच्या खातीं खालील रकमा खर्ची घालाव्या :— साधारण हिशोबाच्या खातीं खर्ची घालावयाच्या खर्चाचा तपशील.

(अ) कलमें ४१ ते ४९ (दोन्ही धरून) यांअन्वयें देणें असलेल्या व्याजाच्या व कर्जाच्या फेडीबद्दलच्या फंडाच्या सर्व रकमा आणि कलमें ९९ (२) (ब) व ६१ यांअन्वयें देणें असलेल्या व्याजाच्या सर्व रकमा ;

(ब) ह्या आक्टाअन्वयें बोर्डास प्राप्त झालेल्या किंवा होणाऱ्या जमिनींचीं भाडीं व त्यांपासून होणारें इतर उत्पन्न वसूल करण्यासाठीं ठेविलेलें निराळें एस्टाब्लिशमेंट चालू ठेवण्यास खर्च झालेला असल्यास तो ; आणि

(क) कलम ६९ यांत ठरविल्याप्रमाणें, व्यवस्थेबद्दलचा जो खर्च बोर्डानें महसूल खातीं लिहिला असेल, त्या खर्चाची रकम.

(ड) बोर्डास प्राप्त झालेल्या जमिनींवर व इमारतींवर म्युनिसिपल आक्टाअन्वयें बसविलेल्या करांसंबंधानें व पट्टयांसंबंधानें बोर्डानें दिलेल्या सर्व रकमा.

(२) साधारण हिशोबाच्या खातीं जमा असलेल्या कोणत्याही रकमा, भांडवलासंबंधी चालू खर्च भागविण्यासाठीं देण्याचा बोर्डास अधिकार आहे ; आणि ह्याप्रमाणें दिलेल्या रकमांचा ऐवज, त्या ज्या सालीं दिलेल्या असतील त्या सालाच्या हिशोबांत दाखविला पाहिजे. साधारण हिशोबाच्या खातीं जमा असलेल्या रकमा, भांडवलासंबंधी चालू खर्च भागविण्यासाठीं देण्याचा अधिकार.

६८. साधारण हिशोबांत समावेश केलेल्या ज्या रकमा खालील बाबतींच्या संबंधाच्या असतील, त्या सर्व, त्या हिशोबांत निरनिराळ्या दाखवाव्या :— साधारण हिशोबांत, सरकारी जमिनींसंबंधाच्या, कार्पोरेशनच्या जमिनींसंबंधाच्या व नवसाध्य केलेल्या जमिनींसंबंधाच्या रकमा निरनिराळ्या दाखवाव्या.

(अ) बोर्डास प्राप्त झालेल्या असून परिशिष्ट क याच्या २ ऱ्या भागांत निर्दिष्ट केलेल्या जमिनी;

(ब) बोर्डास प्राप्त झालेल्या असून परिशिष्ट ड यांत निर्दिष्ट केलेल्या जमिनी;

(क) परिशिष्ट इ यांत निर्दिष्ट केलेल्या मर्यादांच्या आंत असलेलें क्षेत्र नवसाध्य करणें.

## शिलकेची व्यवस्था.

६९. (१) कोणत्याही सालाच्या अखेरीस, साधारण हिशोबांत जमेकडे जी कोणतीही शिल्क निघेल, तिचा उपयोग, ह्यांत पुढें दिलेला विशेष ठराव लागू राहून, कलम ९६ ह्यांत ह्या आक्टाअन्वयें बोर्डास प्राप्त झालेल्या किंवा प्राप्त होणाऱ्या जमि- जमेकडील शिलकेचा उपयोग भांडवलासंबंधाचा चालू खर्च भागवण्याच्या कामीं किंवा कर्जी काढलेला पैका फेडण्याच्या कामीं करावा.

नींच्या विक्रीनें उत्पन्न होणाऱ्या पैक्याचा उपयोग करण्याची जी रीत सांगितली आहे, त्या रीतीनें करावा.

खर्चाकडील शिलक भांडवल खातीं लिहावी.

(२) साधारण हिशोबांत, कोणत्याही सालाच्या अखेरीस खर्चाकडे जी कोणतीही शिल्लक निघेल ती भांडवल खातीं लिहावी, आणि ती कलमें ४९ ते ४७ ( दोन्ही धरून ) ह्यांतील ठरावांअन्वयें त्यानंतर काढावयाच्या लोनांत तिचा समावेश करून भरून काढावी; मात्र, ह्या कलमाअन्वयें भांडवलखातीं लिहावयाच्या रकमांची बेरीज, बोर्डानें ह्या कलमाच्या कारणांसाठीं केलेल्या एकंदर भांडवलसंबंधी खर्चाच्या शेंकडा १९ टक्क्यांहून जास्त होऊं नये.

दहाव्या वर्षांनंतर नफा कसा वांटावा ह्यासंबंधानें विशेष ठराव.

(३) मात्र, अशा सर्व खर्चाकडील व जमेकडील शिल्कांचा एक निराळा हिशोब ठेवावा, आणि कलम १० ह्याअन्वयें जाहीर करण्यांत येईल त्या तारखेनंतरचें दहावें सरकारी वर्ष संपल्यावर जेव्हां जेव्हां आणि जितके वेळां, मागील सरकारी वर्षाच्या अखेरीपर्यंत केलेल्या सदहू प्रकारच्या हिशोबांत जमेकडे नक्की शिलक निघेल तेव्हां तेव्हां व तितके वेळां, त्या नक्की शिल्केचा खालीं लिहिल्याप्रमाणें विनियोग करावा :—

(अ) जी रकम दरसाल दिली असतां, ती पहिल्यानें दिल्याच्या तारखेपासून ६० वर्षांमध्यें, परिशिष्ट क, भाग १, यांत निर्दिष्ट केलेल्या जमिनींसंबंधाचें बोर्डास भांडवलादाखल असलेलें कर्ज, दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याजासह, फिटून जाईल, अशी रकम, तें सगळें भांडवलादाखल कर्ज व्याजासह फिटे तोंपर्यंत, हिंदुस्थानचे सेक्रेटरी आफ् स्टेट यांस अदा करण्याच्या कामीं.

(ब) अशा जमेकडील नक्की शिल्केपैकीं कांहीं रकम बाकी राहिल्यास तिची व्यवस्था खालीं लिहिल्याप्रमाणें करावी :—

(१) ती बाकी, कलम ६३ अन्वयें त्या सालीं कार्पोरेशननें बोर्डाला दिलेल्या एकंदर रकमेहून ज्यास्त नसल्यास, ती कार्पोरेशनास दिली पाहिजे.

(२) ती बाकी, कार्पोरेशनानें बोर्डाला सदहूप्रमाणें दिलेल्या एकंदर रकमेहून ज्यास्त असल्यास, ती, पहिल्यानें, कार्पोरेशनाकडून बोर्डास सदहूप्रमाणें मिळालेल्या एकंदर रकमेइतकी रकम कार्पोरेशनास देण्याच्या कामीं लावावी, आणि ह्यानंतर जास्त रकम राहील ती सरकार व कार्पोरेशन ह्यांच्या दरम्यान सारखी वांटून द्यावी: मात्र इतकेंच कीं, सरकारास द्यावयाची रकम, कोणत्याही प्रसंगीं, बोर्डास प्राप्त झालेल्या व परिशिष्ट क याच्या २ ऱ्या भागांत निर्दिष्ट केलेल्या जमिनींबद्दल व परिशिष्ट ड यांत निर्दिष्ट केलेल्या मर्यादांच्या आंत नवसाध्य केलेल्या कोणत्याही क्षेत्राबद्दल, त्या वर्षामध्यें बोर्डास भाड्याच्या योगानें जो निवळ नफा झालेला असेल त्याच्या अर्ध्याहून जास्त असूं नये; आणि जेव्हां, ह्या विशेष ठरावाअन्वयें सरकारास द्यावयाची रकम सदहू जास्त राहिलेल्या रकमेच्या अर्ध्याहून कमी असेल तेव्हां, ती जास्त राहिलेल्या रकमेची शिलक, कार्पोरेशनास दिली पाहिजे.

मात्र ह्याप्रमाणें, अदा केलेल्या सर्व रकमा, सदरील निराळ्या हिशोबांत, त्या त्या सालीं अदा केल्या असतील त्या सालपैकीं ह्मणून लिहिल्या पाहिजेत.

### जबाबदाऱ्यांप्रमाणें वर्तन होण्याविषयीं हमी.

व्याज न दिल्यास किंवा कर्ज फेडण्यासंबंधी फंडाच्या रकमा व्याजीं न लाविल्यास काम चालविण्याची रीत.

७०. कलमें ४६ व ४७ ह्यांअन्वयें बोर्डानें द्यावयाचें व्याज अगर कलम ६९ अन्वयें बोर्डानें हिंदुस्थानचे सेक्रेटरी आफ् स्टेट इन् कौन्सिल यांस किंवा कार्पोरेशनास द्यावयाची कोणतीही रकम बोर्डानें दिली नाहीं तर, किंवा कलम ४८ ह्यांत ठरविल्या-

प्रमाणें बोर्डानें कोणतीही रकम दिली नाहीं किंवा निराळी काढून व्याजीं लाविला नाहीं तर, मुंबईच्या अकौंटंट जनरलानें किंवा सदहू अकौंटंट जनरलाच्या हुद्याचें त्या त्या वेळीं काम पाहणाऱ्या दुसऱ्या अमलदारानें, सदहूप्रमाणें जी रकम अदा करणें किंवा निराळी काढून व्याजीं लावणें अवश्य असेल, ती रकम अदा केली पाहिजे किंवा निराळी काढून व्याजीं लाविली पाहिजे, आणि जी रकम सदहूप्रमाणें सदहू अकौंटंट जनरलाकडून अदा करण्यांत येईल किंवा निराळी काढून व्याजीं लावण्यांत येईल, ती रकम कमिशनरानें, तावडतोब, म्युनिसिपल फंडांतून काढून सदहू अकौंटंट जनरलास दिली पाहिजे, आणि मग, सदरीं ठरविल्याप्रमाणें कमिशनरानें जी रकम म्युनिसिपल फंडांतून काढलेली असेल त्या रकमेची भरपाई करण्यास पुरेसा होईल असा, सरकार ह्यासंबंधानें पसत करील तो विशेष कर वसूल करण्यास कार्पोरेशन मुखत्यार आहे, आणि सरकारानें हुकूम केल्यास कार्पोरेशननें तसा कर वसूल केला पाहिजे.

असा विशेष कर, म्युनिसिपल आक्टाअन्वयें वसूल करतां येणाऱ्या करांशिवाय आणखी असेल असें समजावें.

७१. गेल्या शेवटल्या कलमांत फर्माविल्याप्रमाणें कमिशनरानें पैका दिला नाहीं तर म्युनिसिपल फंड किंवा कार्पोरेशनानें वसूल करावयाजोगा कोणताही कर सरकारानें जप्त केला असतां चालेल; आणि मग म्युनिसिपल आक्टाच्या ९९ व्या कलमापैकीं (२) ऱ्या व (३) ऱ्या पोटकलमांतील ठराव, जरूर असतील त्या फेरफारांनिशीं, अशा जप्तीस लागू होतील असें समजावें.

गेल्या शेवटल्या कलमांत सांगितल्याप्रमाणें कमिशनरानें पैका दिला नाहीं तर काम चालविण्याची रीत.

७२. कलम ७० ह्यांत निर्दिष्ट केल्याप्रमाणें, बोर्डानें रकमा अदा केल्या नाहींत किंवा निराळ्या ठेवून पुनः व्याजीं लाविल्या नाहींत, तर बोर्डाचें भाडें व इतर उत्पन्न सरकारानें जप्त केलें असतां चालेल; आणि मग म्युनिसिपल आक्टाच्या ९९ व्या कलमापैकीं (२) ऱ्या व (३) ऱ्या पोटकलमांतील ठराव, जरूर असतील त्या फेरफारांनिशीं अशा जप्तीस लागू होतील असें समजावें.

बोर्डानें द्यावयाच्या रकमा न दिल्यास बोर्डाचा महसूल जप्त करण्याचा सरकारास अधिकार.

## वार्षिक अंदाज.

७३. दरसाल फेब्रुआरी महिन्यांत भरावयाच्या बोर्डाच्या एका विशेष सभेंत, चेअरमनानें, पुढच्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेपासून सुरू होणाऱ्या वर्षाबद्दलचा बोर्डाच्या जमेचा व खर्चाचा अंदाज बोर्ड वेळोवेळीं फर्मावील त्या नमुन्याप्रमाणें व त्या तपशिलानिशीं, बोर्डापुढें मांडिला पाहिजे.

वार्षिक जमाखर्चाचा अंदाज चेअरमन यानें तयार करावा.

अशा अंदाजांत, बोर्डाच्या सर्व जबाबदाऱ्या योग्य रीतीनें पुऱ्या करण्याकरितां आणि हा आक्ट योग्य रीतीनें अमलांत आणण्याकरितां तजवीज केलेली असली पाहिजे, आणि तो ज्या सभेच्या पुढें मांडावयाचा, ती भरावयाच्या आधीं निदान दहा दिवस, पुरा करून छापला पाहिजे आणि त्याची एक एक प्रत प्रत्येक ट्रस्टीकडे पोस्टमार्फत किंवा इतर रीतीनें पाठविली पाहिजे.

७४. बोर्डापुढें ह्याप्रमाणें ठेविलेल्या अंदाजाचा बोर्डानें विचार करून, तो, फेरफारांशिवाय किंवा आपल्यास योग्य वाटतील त्या फेरफारांनिशीं, मंजूर केला पाहिजे.

असा अंदाज बोर्डानें मंजूर करावा किंवा फिरवावा.

७५. बोर्डाकडून तो अंदाज जसा मंजूर करण्यांत येईल, तसा तो, सरकाराकडे रुजू केला पाहिजे; आणि सरकारास योग्य वाटल्यास त्याला, तो अंदाज पोंचल्याच्या तारखेपासून एका महिन्याच्या आंत कोणत्याही वेळीं, तो किंवा त्याचा कोणताही भाग नामंजूर करून सुधारण्यासाठीं परत पाठविण्याचा अधिकार आहे. अंदाज ह्याप्रमाणें सरकाराकडून परत पाठविण्यांत आल्यास बोर्डानें तो सुधारला पाहिजे आणि सुधारलेला अंदाज सरकाराकडे पुनः रुजू केला पाहिजे.

अंदाज मंजुरीसाठीं सरकारास रुजू केले पाहिजेत.

बोर्डाची स्थापना झाल्यानंतरचा पहिला अंदाज रुजू करण्याविषयीं व त्याची व्यवस्था करण्याविषयीं हंगामी ठराव.

७६. कलम १० अन्वयें जी तारीख जाहीर करण्यांत येईल त्या तारखेच्या कारणास्तव, सदर्हू प्रकारची विशेष सभा सन १८९८ च्या फेब्रुवारी महिन्यांत भरणें अशक्य किंवा अयोग्य आहे असें आढळून आलें तर, त्यानंतर योग्य असेल तितक्या लवकर एक विशेष सभा भरवावी, आणि चेअरमनानें, अशा शेवटीं सांगितलेल्या विशेष सभेच्या वेळीं, प्रसंगाप्रमाणें, तारीख १ माहे एप्रिल सन १८९८ पासून सुरू होणाऱ्या सगळ्या वर्षाबद्दलचा किंवा त्या विशेष सभेच्या तारखेच्या दिवशीं त्या वर्षाचा जो भाग बाकी राहिलेला असेल त्या भागाबद्दलचा अंदाज त्या बोर्डापुढें मांडिला पाहिजे; आणि मग गेल्या शेवटल्या तीन कलमांत ठरविल्याप्रमाणें त्या अंदाजाची व्यवस्था केली पाहिजे.

जरूर असेल तेव्हां पुरवणीचे अंदाज तयार करून रुजू करावे.

७७. असा कोणताही अंदाज ज्या कोणत्याही वर्षाबद्दल मंजूर केलेला असेल, त्या वर्षांत कोणत्याही वेळीं एकादा पुरवणीचा अंदाज तयार करून तो आपणापुढें रुजू करविण्यास बोर्डाला अधिकार आहे, असा दरेक पुरवणीचा अंदाज अवल वार्षिक अंदाज असल्याप्रमाणेंच, त्याचा बोर्डानें विचार करून तो मंजूर केला पाहिजे आणि सरकाराकडे रुजू केला पाहिजे.

अत्यंत निकडीचा प्रसंग असेल किंवा हे कोर्टाचा हुकुमनामा झालेला असेल तेव्हां शिवायकरून इतर प्रसंगीं ५,००० रुपयांहून ज्यास्त अशी कोणतीही रकम अंदाजांत दाखल केलेली असल्याशिवाय खर्चूं नये.

७८. अत्यंत निकडीचा प्रसंग शिवाय करून इतर प्रसंगीं, पांच हजार रुपयांहून जास्त अशी कोणतीही रकम त्या वेळीं अमलांत असलेल्या व सरकारानें अखेर मंजूर केलेल्या कोणत्या तरी अंदाजांत दाखल केलेली असल्यावांचून किंवा हे कोर्टाच्या एकाद्या हुकुमनाम्याअन्वयें बोर्डानें द्यावयाच्या रकमेंत धरलेली असल्यावांचून, ती बोर्डानें किंवा बोर्डाच्या तर्फेनें खरचिती कामा नये.

पांच हजार रुपयांहून जास्त अशी कोणतीही रकम सदर्हूप्रमाणें अत्यंत निकडीच्या प्रसंगीं खर्चण्यांत आली तर, त्याबद्दलची हकीकत चेअरमनानें सरकाराला ताबडतोब कळवून, त्याबरोबर, असा जादा खर्च भरून काढण्याबद्दल बोर्डानें जो विचार केलेला असेल त्याचा खुलासाही पाठविला पाहिजे.

## हिशोबांची तपासणी.

हिशोब सरकारी हिशोब-तपासनिसांनीं दरसाल दोनदां तपासले पाहिजेत.

७९. बोर्डाच्या जमाखर्चाचे हिशोब, दरसाल दोनदां सरकाराकडे रुजू केले पाहिजेत, आणि ते सरकार वेळोवेळीं जे हिशोबतपासनीस नेमतील त्यांकडून तपासण्यांत येतील.

दस्तऐवज हजर करण्यास हुकुम करण्याचा हिशोब-तपासनिसांस अधिकार आहे.

अशा तपासणीच्या कारणांसाठीं, हिशोबतपासनिसांस ज्या कोणत्याही पुस्तकांची, खतांची, करारपत्रांची, पावत्यांची व इतर कोणत्याही दस्तऐवजांची जरूरी आहे असें वाटेल तीं सर्व पुस्तकें, खतें, वगैरे आपल्याकडे हजर करण्याविषयीं समन्स करून हुकुम करण्याचा, आणि अशीं कोणतींही पुस्तकें, खतें, करारपत्रें, पावत्या, हिशोब, दस्तऐवज किंवा कागदपत्र ज्या कोणत्याही मनुष्यांच्या स्वाधीन असतील किंवा जो कोणताही मनुष्य त्यांविषयीं जबाबदार असेल, त्या मनुष्यास अशा कोणत्याही तपासणीच्या वेळीं किंवा ती ज्या वेळावर तहकूब ठेविली असेल त्या वेळीं हजर राहण्याविषयीं, आणि त्यासंबंधानें इकरार करून त्यावर सही करण्याविषयीं हुकुम करण्याचा अधिकार आहे.

त्याचा मेहनताना सरकारानें ठरविला पाहिजे. त्याचा रिपोर्ट, हिशोबाच्या तेरिजासहित सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध केला पाहिजे.

बोर्डानें, सदर्हू तपासनिसांस, सरकार ठरवील तो मेहनताना दिला पाहिजे, आणि ती रकम साधारण हिशोबाच्या खातीं खर्च घातली पाहिजे. आणि त्या तपासनिसांनीं, तपासणी पुरी झाल्यानंतर चवदा दिवसांच्या आंत, बोर्डाच्या हिशोबाबद्दलचा आपला रिपोर्ट, बोर्डाकडे पाठविला पाहिजे आणि बोर्डानें तो रिपोर्ट, हिशोबाच्या तेरिजासहित मुंबई सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध करविला पाहिजे.

## ७.—बोर्डाचे अमलदार व नोकरलोक यांविषयीं.

### अमलदार व नोकरलोक यांची संख्या.

८०. सदर्हू बोर्डास, ह्या आक्टाच्या कारणासाठीं जे अमलदार व नोकरलोक ठेवणें जरूर व योग्य वाटेल त्यांची एक यादी, त्या बोर्डानें वेळोवेळीं तयार करून मंजूर केली पाहिजे. अशा यादींत, त्या प्रत्येक अमलदाराच्या किंवा नोकरमनुष्याच्या बाबतींत जो जो पगार, फ़ी व अलावन्स बोर्डानें मंजूर केलेला असेल त्या त्या पगाराची, फ़ीची किंवा अलावन्सची रकम व प्रकार हीं देखील दाखल केलीं पाहिजेत : — अमलदार व नोकरलोक आणि त्यांचा पगार व अलावन्स यांच्या यादीस बोर्डाची मंजुरी मिळाली पाहिजे.

मात्र नेहमीं असें समजावें कीं, कारागीर, हमाल व मजूरलोक यांस आणि हमाल व मजूरलोक यांच्या मुकादमांस, ह्या कलमाच्या अर्थाअन्वयें किंवा याच्या पुढच्या कलमाच्या (त्याच्या रकमा (५), (६) व (७) खेरीज करून) अर्थाअन्वयें किंवा कलम ८२ ह्याच्या अर्थाअन्वयें, अमलदार किंवा नोकरलोक समजूं नये. — कांहीं वर्गाच्या लोकास, विवक्षित कारणांशिवाय इतर कारणांसाठीं अमलदार व नोकर समजूं नये.

८१. बोर्डानें, वेळोवेळीं, खालील बाबतींच्या संबंधानें नियम केले पाहिजेत : — बोर्डास कानू करण्याचा अधिकार आहे.

(१) बोर्डाच्या अमलदारांस व नोकरलोकांस रजा देण्याचें नियमन करण्याकरितां ; — रजा देण्याचें नियमन करण्याबद्दल.

(२) सदर्हू अमलदारांस व नोकरलोकांस किंवा त्यांतल्या विवक्षित मनुष्यांस, ते रजेवर असतांना अलावन्स देण्याचा अधिकार देण्याकरितां ; — रजेचें अलावन्स देण्यास अधिकार देण्याबद्दल.

(३) असे कोणतेही अमलदार किंवा नोकरलोक रजेवर गैरहजर असतांना त्यांच्याबदला काम करण्यास नेमलेल्या मनुष्यांस द्यावयाचा मेहनताना ठरविण्याकरितां ; — आक्टिंग] अलावन्स ठरविण्याबद्दल.

(४) अशा सर्व अमलदारांच्या व नोकरलोकांच्या नोकरीच्या मुदतीचें नियमन करण्याकरितां ; — नोकरीची मुदत ठरविण्याबद्दल.

(५) ज्या शर्तींवर अशा अमलदारांस व नोकरांस किंवा त्यांपैकीं कोणासही, चाकरी सोडतांना पेन्शनें, ग्राचुइट्या किंवा कंप्याशनेट अलावन्स देण्यांत येतील त्या शर्ती ठरविण्याकरितां आणि अशा पेन्शनांच्या, ग्राचुइट्यांच्या व कंप्याशनेट अलावन्साच्या रकमा ठरविण्याकरितां : — पेन्शन देण्याची शर्त ठरविण्याबद्दल.

मात्र असें ठरविलें आहे कीं, नोकरी सोडल्यावर असें कोणतेंही पेन्शन किंवा ग्राच्युइटी किंवा कंप्याशनेट अलावन्स मिळण्याचा हक्क अशा सर्व अमलदारांस व नोकरलोकांस असेल किंवा त्यांपैकीं कांहींजणांस असल्यास तो कोणास असेल, तें ठरविण्याचें बोर्डाच्या नजरेवर राहील.

(६) जो कोणताही प्राव्हिडेंट फंड, बोर्डाच्या पसंतीनिशीं, ह्या आक्टाअन्वयें नेमिलेल्या अमलदारांकडून व नोकरलोकांकडून स्थापण्यांत येईल त्या फंडास, किंवा कोणताही प्राव्हिडेंट फंड अशा अमलदारांच्या व नोकरलोकांच्या फायद्यासाठीं बोर्डाकडून स्थापण्यांत आल्यास त्या फंडास, ठरीव दरांप्रमाणें ठरीव शर्तींवर वर्गणी देण्यास अधिकार देण्याकरितां : — प्राव्हिडेंट फंडास वर्गणी देण्याचा अधिकार देण्याबद्दल.

(७) सदर्हू प्रकारच्या अमलदारांपैकीं किंवा नोकरलोकांपैकीं जो कोणताही मनुष्य आपलें कर्तव्य करतांना इजा पावेल त्या मनुष्यास किंवा मरेल त्याच्यामागें राहिलेल्या नातेवाइकांस ज्या शर्तींवर पेन्शनें, ग्राच्युइट्या अगर कंप्याशनेट अलावन्स द्यावयाचा त्या शर्ती ठरविण्याकरितां : — जखमांकरितां पेन्शनें किंवा कंप्याशनेट अलावन्स द्यावयाच्या शर्ती ठरविण्याबद्दल.

### नेमणुका करण्याचे अधिकार वगैरे.

८२. सदरहू नियमांतील आणि कलम ८० अन्वयें बोर्डानें तयार केलेल्या व त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या यादींतील ठराव लागू राहून, दर महिना तीनशें रुपयांहून जास्त पगार नसणाऱ्या बोर्डाच्या अमलदारांस व नोकरलोकांस नेमण्याचा, बढती — नेमणुका वगैरे कोणीं कराव्या.

देण्याचा, सस्पेंड करण्याचा, बर्तर्फ करण्याचा, दंड करण्याचा, कमी पगारावर घालण्याचा किंवा रजा देण्याचा अधिकार चेअरमन चालवितील, आणि इतर दरेक बाबतींत ते अधिकार बोर्ड चालवील.

बोर्डाच्या कोणत्याही अमलदारास किंवा नोकरास, त्या अमलदाराच्या किंवा नोकराच्या गैरवर्तणुकीशिवाय इतर कोणत्याही कारणावरून नोकरींतून काढून टाकण्याचा किंवा अशा अमलदारास किंवा नोकरास पेन्शन, ग्राच्युइटी किंवा कंप्याशनेट अलावन्स घेऊन नोकरी सोडण्याची परवानगी देण्याचा अधिकार, सदरील ठराव लागू राहून, फक्त बोर्डानें मात्र चालविला पाहिजे.

विषक्षित अमलदारांच्या पगार वगैरे संबंधाचे हुकुम सरकारच्या मंजुरीस पात्र राहातील.

८३. बोर्डानें, सदरील शेवटल्या तीन कलमांपैकीं कोणत्याही कलमाअन्वयें केलेला प्रत्येक हुकुम किंवा नियम, तो बोर्डाचा सेक्रेटरी किंवा एन्जिनियर किंवा चीफ अकौंटंट ह्याच्या संबंधाचा असेल तेथपर्यंत, सरकारच्या आगाऊ मंजुरीस पात्र राहील.

एंजिनियर शब्दाची व्याख्या.

ह्या कलमांत "एन्जिनियर" ह्या शब्दाचा अर्थ, बोर्डाच्या नोकरमंडळींतला सगळ्यांत मोठ्या दर्जाचा एन्जिनियर असा, आणि त्याचप्रमाणें, ज्या कोणत्याही वरिष्ठ अमलदारास बोर्डाचा कन्सल्टिंग एन्जिनियर ह्मणून नेमलेला असेल त्याचा समावेश होतो.

## ८.—पोट-कानू.

पोटकानू करण्याचा अधिकार बोर्डास दिला आहे.

८४. बोर्डाला, खालील बाबतींसंबंधानें वेळोवेळीं पोट-कानू करण्याचा अखत्यार आहे:

(अ) ह्या आक्टाअन्वयें बोर्डानें कामावर ठेविलेल्या लोकांच्या वहिवाटीकरितां;

(ब) कलम ९३ (१) अन्वयें बोर्डास प्राप्त झालेल्या जमिनींच्या व्यवस्थेकरितां;

(क) कोणत्याही योजनेप्रमाणें गरीब स्थितींतल्या कामकरीलोकांसाठीं बांधिलेल्या राहावयाच्या घरांची व्यवस्था, त्यांचा वापर व त्यांचें नियमन यांकरितां;

(ड) साधारणपणें, ह्या आक्टाचे उद्देश सिद्धीस नेण्याकरितां.

सदर्हूप्रमाणें बोर्डानें केलेल्या कोणत्याही पोट-कानू वेळोवेळीं फिरवण्याचा, बदलण्याचा किंवा रद्द करण्याचाही बोर्डास अखत्यार आहे.

पोटकानू पसंत करणें व प्रसिद्ध करणें.

८५. कोणतीही पोटकानू किंवा कोणत्याही पोटकानूंत केलेला फेरफार अगर ती रद्द करण्याचा ठराव सरकाराकडून पसंत करण्यांत येऊन ती पसंती मुंबई सरकारी गझेटांत जाहीर करण्यांत येई तोंपर्यंत, अमलांत येणार नाहीं; आणि कोणतीही पोटकानू किंवा कोणत्याही पोटकानूंत केलेला फेरफार अगर ती रद्द करण्याचा ठराव, सदरील गझेटांत एकामागून एक तीन आठवडेपर्यंत प्रसिद्ध करण्यांत येई तोंपर्यंत सरकाराकडून पसंत केला जाणार नाहीं.

सदर्हू गझेटांत जाहिरनामा देऊन त्याच्याद्वारें, ह्या कलमाच्या व गेल्या शेवटल्या दोन कलमांच्या ठरावांअन्वयें करून प्रसिद्ध केलेली कोणतीही पोटकानू किंवा नियम कोणत्याही वेळीं रद्द करणें सरकारास कायदेशीर होईल.

पोटकानू मोडल्याबद्दल शिक्षा.

८६. बोर्डास, कलम ८४ अन्वयें केलेल्या पोटकानूंमध्यें, त्या पोटकानूंच्या भंगाबद्दल ज्या शिक्षा करणें त्यांस योग्य वाटेल, त्या शिक्षा ठरविण्याचा अखत्यार आहे: मात्र इतकेंच कीं, कोणत्याही पोटकानूच्या कोणत्याही भंगाबद्दलची शिक्षा शंभर रुपयांच्या दंडाहून जास्त असूं नये, आणि एकसारख्या चालू ठेविलेल्या भंगाच्या बाबतींत, अशा भंगाबद्दलची नोटीस तो भंग केल्याचा गुन्हेगार असणाऱ्या मनुष्यास बोर्डानें दिल्यानंतरच्या दरेक दिवसाबद्दलचा दंड पन्नास रुपयांहून जास्त असूं नये.

८७. बोर्डानें सदरहू पोटकानू इंग्रजी, मराठी व गुजराथी भाषांत छापवून, सोईवार ठिकाणीं टांगून ठेवविल्या पाहिजेत. पोटकानू दर्शविल्या पाहिजेत.

## ९.—शिक्षा.

८८. जो कोणताही मनुष्य बोर्डाचा ट्रस्टी अगर अमलदार किंवा नोकर असून बोर्डाबरोबर किंवा बोर्डानें केलेल्या किंवा बोर्डातर्फेच्या कोणत्याही कंत्राक्टांत किंवा कामांत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें, कोणताही हिसा किंवा हितसंबंध मिळवील, त्यानें हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याबाबद कायदा ह्याच्या १६८ व्या कलमाअन्वयें शिक्षेस पात्र असा अपराध केला आहे असें समजलें पाहिजे : बोर्डानें दिलेल्या कंत्राक्टांत संबंध.

मात्र, जो कोणताही मनुष्य कलम १६ याच्या दुसऱ्या पोटकलमाअन्वयें, कोणत्याही कंत्राक्टांत किंवा कामांत हिसा किंवा हितसंबंध असण्यास नालायक नाहीं असें, किंवा ज्याचा तसा हिसा किंवा हितसंबंध आहे ह्मणून समजूं नये असें ठरविलेलें आहे, त्याला ह्या कलमांतील कोणताही ठराव लागू होणार नाहीं.

८९. हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याबाबद कायदा याच्या २१ व्या कलमाअन्वयें सरकारी नोकर नाहीं असा, ह्या आक्टाअन्वयें कामावर ठेविलेला जो कोणताही मनुष्य, कोणतेंही हुद्यासंबंधाचें काम करण्यावदल किंवा न करण्याबदल अगर आपल्या हुद्याच्या अमलबजावणीच्या कामीं कोणत्याही मनुष्यावर मेहरबानी किंवा इतराजी करण्याबद्दल किंवा न करण्याबद्दल अगर बोर्डाकडे, किंवा सरकारी नोकर या नात्यानें कोणत्याही सरकारी नोकराकडे किंवा सरकाराकडे कोणत्याही मनुष्याच्या तर्फेनें किंवा त्याच्याविरुद्ध वग चालविण्याबद्दल किंवा चालविण्याचा प्रयत्न केल्याबद्दल, कोणत्याही मनुष्याकडून आपल्या स्वतःकरितां किंवा इतर कोणत्याही मनुष्याकरितां कायदेशीर मेहनतान्याखेरीज इतर कोणताही ऐवज घेईल किंवा मिळवील, किंवा घेण्याचें कबूल करील किंवा मिळविण्याचा प्रयत्न करील, तो, सरकारी नोकरानें केलेल्या तशाच अपराधाबदल हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याबाबद कायदा यांत जी शिक्षा सांगितली आहे, त्याच शिक्षेस पात्र होईल. कायद्याविरुद्ध ऐवज घेण्याबद्दल.

९०. ज्या कोणत्याही मनुष्यास कलम ७९ अन्वयें कोणत्याही हिशोब तपासनिसाकडून, आपल्यापुढें हजर राहण्यास किंवा कोणतींहीं बुकें, खतें, करारपत्रें, हिशोब, पावत्या, दस्तऐवज अगर कागद हजर करण्यास किंवा कोणताही इकरार करण्यास अगर त्यावर सही करण्यास हुकूम करण्यांत येईल त्यानें तसें करण्यास नाकारिलें किंवा हयगय केली तर त्यास अशा दरेक हयगयीबद्दल किंवा इनकाराबद्दल शंभर रुपयेपर्यंत दंड होईल. हिशोबतपासनिसापुढें वगैरे हजर होण्यास नाकारण्याबद्दल किंवा हयगय करण्याबद्दल शिक्षा.

९१. ह्या आक्टाच्या किंवा कलम ८४ ह्याअन्वयें केलेल्या कोणत्याही पोटकानूच्या विरुद्ध केलेल्या सर्व अपराधांचा इन्साफ करण्याचा अधिकार प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटास आहे. आक्टाविरुद्ध केलेल्या अपराधांचा इन्साफ करण्याचा अधिकार.

कोणत्याही गुन्हेगाराकडून वसूल केलेल्या सर्व दंडाच्या व नुकसानीच्या मोबदल्याच्या रकमा बोर्डास अदा केल्या पाहिजेत.

## १०.—किरकोळ.

९२. जेव्हां जेव्हां कोणत्याही कारणासाठीं या आक्टाअन्वयें नेमलेला कोणताही दिवस रविवारीं किंवा सार्वजनिक सुटीच्या दिवशीं येईल, तेव्हां तेव्हां, त्या दिवशीं करावयाचें ह्मणून नेमिलेलें काम त्या रविवारच्या किंवा सार्वजनिक सुटीच्या पुढच्या दिवशीं करण्यांत येईल. कोणत्याही कारणासाठीं नेमिलेला दिवस रविवारीं येईल किंवा सार्वजनिक सुटीच्या दिवशीं येईल तेव्हां त्याबद्दल ठराव.

९३. ह्या आक्टांत सांगितलेलीं अंतरें आडव्या सपाटीवर सरळ रेषेनें मोजिलीं पाहिजेत. अंतरें मोजण्याबाबद.

९४. ह्या आक्टाअन्वयें केलेल्या किंवा केलें आहे असें ह्मणणें असलेल्या कोणत्याही कृत्यासंबंधानें कोणत्याही मनुष्यावर चालवावयाचा दावा किंवा इतर काम, त्या मनुष्यास त्या योजिलेल्या दाव्याबद्दल किंवा इतर कामाबद्दल आणि त्याच्या कारणाबद्दल दाव्यांची मुदत.

एका महिन्याची लेखी नोटीस दिल्याशिवाय, व त्याचप्रमाणें, अशा दाव्याचें किंवा इतर कामाचें कारण उत्पन्न झाल्यापासून साहा महिन्यांनंतर, सुरू करतां कामा नये.

ह्या आक्टाअन्वयें नेमिलेल्या कोणत्याही अमलदारानें किंवा नोकरानें कोणतेंही कायदेशीर कृत्य अयोग्य रीतीनें केल्याबद्दल, किंवा कोणतेंही बेकायदेशीर कृत्य केल्याबद्दल किंवा कोणतेंही करावयाचें कृत्य वगळल्याबद्दल बोर्ड जबाबदार होणार नाहीं; व त्याचप्रमाणें, सदहू अमलदारांपैकीं किंवा नोकरांपैकीं कोणींही ह्या आक्टाअन्वयें इमानें-इतबारें केलेल्या किंवा करण्यास हुकुम दिलेल्या कोणत्याही कृत्यापासून झालेल्या नुकसानीचा मोबदला देण्यास बोर्ड किंवा ते अमलदार अगर नोकर पात्र होणार नाहींत.

---

## परिशिष्ट अ.

(कलम ४३ पहा.)

### या आक्टाअन्वयें जमिनी घेण्याच्या कामाचें नियमन करण्याबाबदचे सन १८९४ च्या जमीन घेण्याविषयींच्या आक्टाचे भाग.

**भाग १.**—प्रारंभींचे ठराव ; ३ ऱ्या कलमाच्या रकमा (ड), (ई) व (फ) खेरीज करून.

**भाग २.**—जमीन घेणें ; कलम ४, पोट-कलम (१), कलम ६ आणि कलम १७, पोट-कलम (२) हीं खेरीज करून.

**भाग ३.**—कोर्टास लिहून पाठविणें व त्यावर काम चालविण्याची रीति ; कलम २३, पोट-कलम (२) आणि कलम २४, रकमा (६) व (७) हीं खेरीज करून.

**भाग ४.**—नुकसानीच्या मोबदल्याची वांटणी.

**भाग ५.**—पैका देणें.

**भाग ६.**—जमिनीचा थोडक्या मुदतीपर्यंत भोगवटा.

**भाग ८.**—किरकोळ ; कलम ५४ खेरीज करून.

---

## परिशिष्ट ब.

(कलम ५१ पहा.)

### डिबेंचराचा नमुना.

मुंबई शहर सुधारण्यासाठींचे ट्रस्टी.

तारीख माहे सन १८ .

मुंबईचे गव्हर्नर साहेब बहादुर यांच्या कायदे व कानू करणाऱ्या कौन्सिलाचा सन १८९८ चा आक्ट नंबर ह्मणजे सन १८९८ चा मुंबई शहर सुधारण्याबाबत आक्ट यापरत्वें आह्मी मुंबई शहर सुधारण्यासाठींचे ट्रस्टी हे, **अ. ब. राहणार** यानें आह्मांस दिलेल्या रुपयांच्या रकमेचा मोबदला सदरहू यास, किंवा त्याच्या हुकुमाप्रमाणें, रुपयांची सदरहू रकम या डिबेंचराच्या तारखेनंतर दरसाल दरशेंकडा टक्कयांप्रमाणें व्याजासुद्धा देण्याचें वचन देतों. सदरहू व्याज दर साहा महिन्यांनीं ह्मणजे माहे-न्याच्या तारखेस आणि महिन्याच्या तारिखेस देण्याचें कबूल करतों.

आमच्या सामायिक शिक्यानिशीं दिला असे ; आज तारीख माहे सन १८९ .

(शिक्का)

( चेअरमन व दोन ट्रस्टी यांच्या सह्या.)

## परिशिष्ट क.

### ज्या जमिनी मलीका माआझमांची मिळकत असून बोर्डास प्राप्त झाल्या आहेत त्या जमिनी दाखविणारें.

### भाग १.

**खुल्या जागांदाखल राखून ठेवावयाच्या जमिनी**

(कलम ९३ (आय्) पहा.)

| अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | स्थळ व वर्णन. | क्षेत्रफळ. | एकंदर क्षेत्रफळ. | किंमत. | | | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | प्रत्येक चौरस वाराचा दर. | रकम. | एकंदर किंमत. | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | **केनेडी सी फेस.** | चौरस वार. | चौरस वार. | रु. | रु. | रु. | |
| १ | ... | ८४२६ | (अ) याच्या चतुःसीमाः **उत्तरेस, चर्नी रस्त्यावरील** लेव्हल क्रासिंगास जाणारा रस्ता; **दक्षिणेस,** नेटिव्ह इन्फन्ट्री इसपितळाच्या दाक्षिण बाजूच्या सीमेची रेषा वाढवून पश्चिमेकडेस काढलेली रेषा; **पूर्वेस.** मुंबई आणि **बडोदा** रेलवे आणि **पश्चिमेस,** ब्याककबेचा किनारा— | | | | | | |
| | | | घोडेरस्ता व पायरस्ता यांचें क्षेत्रफळ ... | २३,९१४ | ... | ... | ... | ... | |
| | | | घोडे रस्त्याच्या पश्चिमेकडील क्षेत्रफळ ... | * २२४,७३१ | ... | ५.०० | ११,२३,६५५ | ... | *यांत, चर्नी रस्त्यावरील बगीचा, पारशी, मुसलमान व हिंदु जिमखान्यांकडे परवानगीवरून असलेल्या जागा, |
| | | | (ब) याच्या चतुःसीमाः **उत्तरेस,** सदरहू जमीनीचा भाग (अ) हिच्या दक्षिण बाजूची सीमेची रेषा; **दक्षिणेस, चर्च गेट स्ट्रीट** स्टेशनाच्या | | | | | | |

परिशिष्ट क.—(पुढें चालू.)

भाग १.—(पुढें चालू.)

| अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | स्थळ व वर्णन. | क्षेत्रफळ. | एकंदर क्षेत्रफळ. | किंमत. प्रत्येक चौरस वाराचा दर. | रकम. | एकंदर किंमत. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | चौरस वार. | चौरस वार. | रु. | रु. | रु. | आणि सरकारी रि-माउण्ट स्टेबल्स यांनीं तात्पुरती व्यापलेली ज-मीन यांचा समावेश होतो. |
| | | | पश्चिमेकडील रस्ता; पूर्वेस मुंबई आणि बडोदा रेलवे; आणि पश्चिमेस, ब्याकबेचा किनारा. | ६६,६२७ | ३१९,२७२ | ... | ... | ११,२३,६९९ | घोडेरस्ता व पायरस्ता यांनीं व्यापलेला. |
| | | | **मरीन लैन्स एस्टेट.** | | | | | | |
| २ | ... | ८४९३ | याच्या चतुःसीमा : उत्तरेस, हार्सपिटल लेन; दक्षिणेस, चर्च गेट स्ट्रीट; पूर्वेस, एस्प्लनेड व मेयो रस्ते; आणि पश्चिमेस, मरीन लैन्स रस्ता (मरीन स्ट्रीट), मात्र यांत (म्युनिसिपल वार्ड नंबर ३९२८ च्या) सरकारी बंगला नंबर ४१ याच्या घरठाणाचा व या परिशिष्टाचा भाग २ (रकम १) यांत वर्णन केलेल्या, मरीन लैन्स रस्त्यापुढील क्षेत्राचा समावेश होत नसून, सरकारचा ठराव नंबर २ सी. डब्ल्यू—४, तारीख ३ री जानेवारी सन १८८१ यावरून लष्करी कारणांसाठीं ह्मणून | | | | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | राखून ठेवलेल्या सदर्हू ठरावांत प्लाट क या नांवानें उल्लेख केलेल्या क्षेत्राचा समावेश होतो ... ... ... ... | † १४१,२२९ | १४१,२२९ | १०.०० | १४,१२,२९० | १४, २,२९० | † या परिशिष्टाच्या २ ऱ्या भागांतील १ ल्या नंबरांत दाखविलेल्या क्षेत्रफळासहित एकंदर क्षेत्रफळ १७७,२२९ चौरस वार आहे. |
| | | | **कूपरेज प्लाट.** | | | | | | |
| ३ | ... | ५९६३ | याच्या चतुःसीमा : उत्तरेस, व्यांडस्टाण्ड सर्कल; दक्षिणेस, वूड हौस रस्ता; पूर्वेस मेयो रस्त्याची पश्चिम बाजू दक्षिणेकडेस वाढवून काढलेली रेषा; आणि पश्चिमेस, कीन्स परेड रस्ता ... ... ... ... | ‡ ६६,१७८ | ६६,१७८ | १०.०० | ६,६१,७८० | ६६१,७८० | ‡ या परिशिष्टाच्या २ ऱ्या भागांतील २ ऱ्या रकमेंत दाखविलेल्या क्षेत्रफळासहित एकंदर क्षेत्रफळ ९८,३४९ चौरसवार आहे. |
| | | | **सेक्रेटेरियटच्या दक्षिणेकडील प्लाट.** | | | | | | |
| ४ | ... | ८४३४ | याच्या चतुःसीमा : उत्तरेस, एल्फिन्स्टन कालेज व न्यू सेक्रेटरियट; दक्षिणेस व पश्चिमेस, मेयो रस्ता; आणि पूर्वेस, हार्नबी रस्ता ... | १७,७०० | १७,७०० | २५.०० | ४,४२,५०० | ४,४२,५०० | |
| | | | **मैदानाच्या जागा.** | | | | | | |
| ५ | ... | ... | यांत खालीं सांगितलेल्या चतुःसीमेंतील मलीका माआझमांस प्राप्त झालेली खुली जमीन येते, ह्मणजे : उत्तरेस जी. आय्. पी. रेलवेच्या परळ स्टेशनापासून उरळी गांवास जाणारा रस्ता; दक्षिणेस अंशतः महालक्ष्मी व अंशतः बेलासिस रस्ता; पूर्वेस बी. बी. आण्ड सी. आय्. रेलवे; आणि पश्चिमेस समुद्र ... | ... | ... | ... | ... | ... | आंकडे भरावयाचे आहेत. |
| | | | एकूण. | ... | ९,४०,३७९ | ... | ... | ३६,४०,१६४ | |

## परिशिष्ट क.—(पुढें चालू.)

### भाग २.

### इतर जमिनी.

(कलम ९३ (२) पहा.)

| अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | स्थळ व वर्णन. | क्षेत्रफळ. | एकंदर क्षेत्रफळ. | किंमत. | | | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | प्रत्येक चौरस वाराचा दर. | रकम. | एकंदर किंमत. | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | चौरस वार. | चौरस वार. | रु. | रु. | रु. | |
| | | | **मरीनलैन्स एस्टेट.** | | | | | | |
| १ | ... | ८४९२, ८४९३ | यांत, मरीन लैन्स रस्ता (मरीन स्ट्रीट) च्या पूर्वेकडील बाजूचा १८० फूट रुंदीचा आणि सरकारी बंगला नंबर ४१ (म्युनिसिपल वार्ड नंबर ३९२८) याच्या कंपौंडाच्या दक्षिण बाजूपासून पूर्वी सरकारी बंगला नंबर ४३ (म्युनिसिपल वार्ड नंबर ३९०९) हा ज्या ठिकाणीं होता त्या ठिकाणाच्या दक्षिण बाजूपर्यंत असलेला जमिनीचा तुकडा येतो ... ... | * ३६,१०० | | १०.०० | ३,६१ ००० | | * या परिशिष्टाच्या १ ल्या भागांतील २ ऱ्या नंबराखालीं दाखविलेल्या क्षेत्रफळानिशीं एकंदर १७७,३२९ चौरस वार क्षेत्रफळ आहे |
| | | | **कूपरेज प्लाट (स्ट्रेंजर्स लैन्स).** | | | | | | |
| २ | ... | ९९६२, ९९६३ | याच्या चतुःसीमा : उत्तरेस, मेयो रस्ता ; दक्षिणेस, वूडहौस रस्ता ; पूर्वेस, हार्न्बी रस्ता, आणि पश्चिमेस, मेयो रस्त्याची पश्चिमबाजू दक्षिणेकडेस वाढविली ह्मणजे जी रेषा, या | | | | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | परिशिष्टाच्या १ ल्या भागाच्या ३ ऱ्या नंबराखालीं वर्णन केलेल्या प्लाटची पूर्वेकडील हद्द होते ती रेषा. ... ... .. | † ३२२१७ | ३२,२१७ | १०.०० | ३,२२,१७० | ३,२२,१७० | † या परिशिष्टाच्या १ल्या भागाच्या ३ ऱ्या नंबराखालीं दाखविलेल्या क्षेत्रफळानिशीं एकंदर ९८,३४५ चौरस वार क्षेत्रफळ आहे. |
| | | | **वूडहौस रोड प्लाट.** | | | | | | |
| ३ | ... | ९५६१ | वूडहौस रस्ता व कुलाबा येथील काझवे (धक्क्याचे) रस्ते यांच्या दरमियान असून, उत्तरेस हे रस्ते जेथें एकमकांस मिळाले आहेत तेथपासून दक्षिणेस मुंबई आणि बडोदा रेलवे व ग्रे. इं. पे. रेलवेचीं सायडिंग्स आणि ट्रामवे कंपनीचें आवार यांच्या हद्दींपर्यंत पसरलेला ; मात्र यांत एल्फिन्स्टन कालेजांतील विद्यार्थ्यांच्या राहण्याची जागा ज्या ठिकाणीं आहे तें ठिकाण येत नाहीं ... ... ... ... | ५३,७३२ | ५३,७३२ | १०.०० | ५,३७,३२० | ५,३७ ३२० | |
| | | | **काटन ग्रीन.** | | | | | | |
| ४ | ... | ... | ज्याच्या चतुःसीमा म्हटल्या म्हणजे, उत्तरेस मुंबई व बडोदा रेलवेचें आवार, दक्षिणेस खासगी जमीन, व पूर्वेस कुलाबा येथील काझवे हीं आहेत तो त्रिकोणाकृति प्लाट ... ... | १३,१०५ | १३,१०५ | १०.०० | १,३१,०५० | १,३१,०५० | |
| | | | **जुनी साल्यूटिंग बाटरीची जागा.** | | | | | | |
| ५ | ... | २५६० | याच्या चतुःसीमा : उत्तरेस अपालो बंदराचा रस्ता ; दक्षिणेस लान्सडौन रस्ता ; पूर्वेस बाटरी स्ट्रीट ; आणि पश्चिमेस कुलाबा येथील काझवे ... ... ... | ५,६०० | ५,६०० | ५०.०० | २,८०,००० | २,८०,००० | |

## परिशिष्ट क.—(पुढें चालू.)

## भाग २.— (पुढें चालू.)

| अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | स्थल व वर्णन. | क्षेत्रफळ. | एकंदर क्षेत्रफळ. | किंमत. | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | प्रत्येक चौरस वाराचा दर. | रकम. | एकंदर किंमत. | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | चौरस वार. | चौरस वार. | रु. | रु. | रु. | |
| | | | **क्रिसेंट सैट.** | | | | | | |
| ६ | ... | ८४३३ | ज्याच्या समोर सेलर्स होम व एल्फिन्स्टन कालेज हीं असून उत्तरेस राम्पार्ट रो आहे तो अर्ध वर्तुलाकाति प्लाट ... ... ... | ३१,९९७ | ३१,९९७ | २५.०० | ७,९८,९२५ | ७,९८,९२५ | |
| | | | **जुन्या शहर बराकच्या दक्षिणेकडील प्लाट.** | | | | | | |
| ७ | ... | ९३०९ | याच्या चतुःसीमाः उत्तरेस ज्यांत कमिसेरियट व पे आफिसें आहेत तीं शहर बराक्स; दक्षिणेस व पूर्वेस टांकसाळेचा रस्ता; आणि पश्चिमेस बझार गेट स्ट्रीट ... | २,०४८ | २,०४८ | ३०.०० | ६१,४४० | ६,१४४० | |
| | | | **हार्नबी रोड प्लाट.** | | | | | | |
| ८ | ... | ८४६३, ८४६४ | वाडबी व हार्नबी रस्ते यांच्या दरमियान असून सदर्हू रस्ते व्हिक्टोरिया टर्मिनसच्या समोर उत्तर बाजूस जेथें एकमेकांस मिळतात तेथ- | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पासून फ्रीअर फौन्टनच्या समोर दक्षिण बाजूस जेथें एस्प्लेनेड व हार्नबी रस्ते एकमेकांस मिळतात तेथपर्यंत असलेला ; मात्र त्यांत खालीं सांगितलेल्या इमारतींच्या जागा येत नाहींत, ह्मणजे—<br><br>जॉन कानन हैं स्कूल,<br>फ्रीयर फ्रेचर स्कूल,<br>अलेक्झान्ड्रा नेटिव्ह गर्ल्स इंग्लिश इन्स्टिट्यूशन,<br>टेलिग्राफ सिग्नलर्स कार्टर्स, ... ...<br>काथेड्रल बॉय्ज हैं स्कूल, ... ...<br>कित्ता गर्ल्स कित्ता ... ...<br>कित्ता चापूलेन्स कार्टर्स. ...<br><br>व सरकारी कोंडवाडे आणि एन्जिनीयर्स स्टोअर्स हे हल्लीं ज्या ठिकाणीं आहेत तीं ठिकाणें येतात ; मात्र सदहू कोंडवाडे व स्टोअर्स दुसरी एखादी जी जागा सरकार पसंत करील त्या जागीं बोर्डाच्या खर्चानें नेण्यांत येतील तोंपर्यंत सदहूं ठिकाणांचा निर्विवाद उपयोग करण्याचा हक्क सरकारास आहे—येणेंप्रमाणें बोर्डास प्राप्त झालेलें क्षेत्रफळ खालीं सांगितल्याप्रमाणें आहे— | | | | | | |
| पट्ट्यानें दिलेलें क्षेत्रफळ ... | ४८,०५२ | | ... | ... | | |
| रस्त्यांनीं व्यापलेल्या जागेचें क्षेत्रफळ... | १९,७५२ | | ... | ... | | |
| खुल्या जागेचें क्षेत्रफळ... | ५३,८९७ | | २०.०० | १०,७७,९४० | | |
| | | १२१,७०१ | | | १०,७७,९४० | |

## परिशिष्ट क (पुढें चालू.)

### भाग. २.—(पुढें चालू)

| अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | स्थल व वर्णन. | क्षेत्रफळ. | एकंदर क्षेत्रफळ. | किंमत. | | | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | प्रत्येक चौरस वाराचा दर. | रकम. | एकंदर किंमत. | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | चौरस वार. | चौरस वार. | रु. | रु. | रु. | |
| | | | **चौपटी एस्टेट.** | | | | | | |
| ९ | ... | ७२९८ | याच्या चतुःसीमा : **उत्तरेस** कांहीं अंशीं गिब्स रस्त्यास जाऊन मिळणारा सार्वजनिक मार्ग व कांहीं अंशीं खासगी मिळकती ( **सर्व्हे नंबर** ७२९९-७३०२ ); **दक्षिणेस** कांहीं अंशीं **क्विन्स रस्ता** व कांहीं अंशीं सिरी रस्ता ; **पूर्वेस** गांवदेवी रस्ता ; आणि **पश्चिमेस** उत्तरेकडील हद्दीचा मार्ग जेथें गिब्स रस्त्याला मिळतो तेथून सिरी रस्त्यापर्यंत जाणारी विषम रेषा :— | | | | | | |
| | | | (अ) टेंकडीच्या उतरणीची जमीन... | ५५,३६७ | | ... | ... | | |
| | | | (ब) इमारती जमीन ... ... | ९२,६९८ | | १०.०० | ९,२६,९८० | | |
| | | | | | १४८,०२५ | | | ९२६९८० | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | क्राफर्ड मार्केटच्या दक्षिणेचा त्रिकोणाकृति प्लाट. | | | | |
| १० | ... | ८४७४ | याच्या चतुःसीमा : दक्षिणेस क्राफर्ड मार्केट; पूर्वेस पालटन रस्ता ; आणि पश्चिमेस ... | ५,३०० | ५,३०० | २०.०० | १,०६,००० | १,०६,००० |
| | | | दवाखान्याचा प्लाट. | | | | |
| ११ | ... | ८४७८ | याच्या चतुःसीमा: उत्तरेस जाफर सुलेमानचा दवाखाना; दक्षिणेस मुक्ति फौजेचें ठिकाण; पूर्वेस जी. आय् पी. रेलवे ; आणि पश्चिमेस हार्नबी रस्ता ... ... ... | १६४२ | १६४२ | २०.०० | ३३,८४० | ३३,८४० |
| | | | म्युनिसिपल कचेरीच्या उत्तरेचा प्लाट. | | | | |
| १२ | ... | ८४७३ | याच्या चतुःसीमा: उत्तरेस अंशतः पोलीस म्याजिस्ट्रेटचें कोर्ट व अंशतः सार्वजनिक रस्ता ; दक्षिणेस खासगी रस्ता ; पूर्वेस हार्नबी रस्ता, आणि पश्चिमेस क्रूकशांक रस्ता. | ६,८०० | ६,८०० | ३०.०० | २,०४,००० | २,०४,००० |
| | | | दादर येथील पोलीस लैनींचा प्लाट. | | | | |
| १३ | ... | ... | याच्या चतुःसीमा: उत्तरेस व पूर्वेस खासगी जमिनी; दक्षिणेस दादर रस्ता ; आणि पश्चिमेस जी. आय्. पी. रेलवे ... | ९,२३४ | ९,२३४ | १०.०० | ९२,३४० | ९२,३४० |
| १४ | ... | ... | परळ एस्टेट ... ... ... ... | ३,३०,४३९ | ३,३०,४३९ | ३.०० | ९,९१,३१७ | ९,९१,३१७ |
| | | | एकूण...... | ... | ७९३,९०० | ... | ... | ९६,८३,९२२ |

## परिशिष्ट ड.

(कलम ९३ (२) पहा.)

**ज्या जमिनी कार्पोरेशनची मिळकत असून बोर्डास प्राप्त झाल्या आहेत त्या दाखविणारें.**

